ISSN-0971-8397

विकास समर्पित मासिक

# योजना

वर्ष ४५ अंक १ पाने ५६ ऑगस्ट २०१७ मूल्य २२रु.

## वस्तू आणि सेवा कर

GST

वस्तू व सेवा कर आणि ग्राहक
सूरज जैसवाल

वस्तू आणि सेवा करामुळे झालेले आमूलाग्र बदल
अरुण गोयल

जीएसटी: नव्या युगाची पहाट
उपेंद्र गुप्ता

वस्तू आणि सेवा कर - काही वैशिष्टये
रेश्मा घाणेकर

विशेष लेख
तंत्रज्ञान आणि वस्तू सेवा करप्रणाली
प्रकाश कुमार

फोकस
जीएसटी आणि राज्य सरकारे
जयंत रॉय चौधरी

मराठी मासिक

# योजना

## योजना घरी आणा.
## आजच वर्गणी भरा.




विकासाचे सर्व पैलू, सर्व सामाजिक प्रश्न आणि चालू घडामोडी प्रसिध्द करणारे योजना हे एकमेव मासिक आहे. या मासिकात सर्व क्षेत्रातील तज्ज्ञांनी लिहिलेले अभ्यासपूर्ण व अचूक माहिती देणारे लेख असतात. त्यामुळे आपल्याला प्रत्येक क्षेत्रातील बिनचुक माहिती मिळते.

हे मासिक विद्यार्थीवर्ग व विद्वत्‌जनांचे आवडते आहे .स्पर्धात्मक परीक्षांना बसणाऱ्यांनी योजना वाचणे आवश्यक आहे. यातील माहिती साधारणत: इतरत्र प्रकाशित होण्याआधीच आपल्यापर्यंत येते.

### वर्गणीचे दर

| | |
|---|---|
| नियमित अंक मूल्य | २२.०० रुपये |
| विशेषांक | ३०.०० रुपये |
| वार्षिक वर्गणी | २३०.०० रुपये |
| द्विवार्षिक वर्गणी | ४३०.०० रुपये |
| त्रिवार्षिक वर्गणी | ६१०.०० रुपये |

वर्गणी, मनीऑर्डर
किंवा डिमांड ड्राफ्टद्वारे संपादक,योजना (मराठी)यांचे नावाने
७०१, "बी" विंग (७ वा मजला) केन्द्रीय सदन,
बेलापूर, नवी मुंबई - ४०० ६१४
या पत्त्यावर पाठवावी. किंवा www.bharatkosh.gov.in/product
येथे ऑनलाईन भरावी.

**वर्गणी मनीऑर्डरने पाठविताना आपले नाव, पत्ता व संपर्क क्रमांक कूपनमध्ये सुवाच्य अक्षरात लिहा.**

विक्रीचे ठिकाण : ७०१ सी, ७०१बी, केंद्रीय सदन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई - ४०० ६१४

योजना मासिक भारत सरकारच्या माहिती व प्रसारण मंत्रालयाच्या प्रकाशन विभागातर्फे प्रसिध्द केले जाते.

# योजना

## विकास समर्पित मासिक

❖ वर्ष ४५ ❖ ❖ अंक १ ❖ ❖ ऑगस्ट २०१७ ❖ ❖ मूल्य २२ रु. ❖

मुख्य संपादक
**दिपीका कच्छल**

संपादक
**उमेश उजगरे**

उप संपादक
**अभिषेक कुमार**

मुखपृष्ठ
**जी.पी. धोपे**

**'योजना' हे निती आयोगाच्या वतीने, केंद्र सरकारच्या माहिती व प्रसारण मंत्रालयाच्या प्रकाशन विभागातर्फे हिंदी, इंग्रजी, मराठी, गुजराती, कन्नड, तेलुगू, पंजाबी, उर्दू, बंगाली, तमिळ, मल्याळम, उडिया व आसामी भाषांतून प्रकाशित होते. देशाच्या सर्वांगीण विकासाची खुली चर्चा करणारे ते व्यासपीठ आहे. 'योजना'त प्रसिद्ध होणाऱ्या लेखांतील मते त्या त्या लेखकांची असतात.**

**जाहिरात दर पत्रक**

| | |
|---|---|
| ब्लॅक ॲंड व्हाईट पूर्ण पान: | रु. १०,००० |
| ब्लॅक ॲंड व्हाईट अर्धे पान: | रु. ६,००० |
| बॅक कव्हर पूर्ण पान: | रु. २०,००० |
| सेकंड कव्हर पूर्ण पान: | रु. १७,००० |
| थर्ड कव्हर पूर्ण पान: | रु. १५,००० |

## अनुक्रमणिका

| | | |
|---|---|---|
| वस्तू व सेवा कर आणि ग्राहक | - सूरज जैसवाल | ५ |
| वस्तू आणि सेवा करामुळे झालेले आमूलाग्र बदल | - अरुण गोयल | १० |
| वस्तू व सेवा कर आणि व्यापारी सहजतेवरील प्रभाव | - दानिश ए. हाशिम व वर्षा कुमारी | १४ |
| वस्तू आणि सेवा कर - काही वैशिष्टये | - रेश्मा घाणेकर | २१ |
| तंत्रज्ञान आणि वस्तू सेवा करप्रणाली (विशेष लेख) | - प्रकाश कुमार | २७ |
| जीएसटी : नव्या युगाची पहाट | - उपेंद्र गुप्ता | ३३ |
| जीएसटी आणि राज्य सरकारे (फोकस) | - जयंत रॉय चौधरी | ३८ |
| जीएसटी - भारतीय कर इतिहासातील महत्वाचा टप्पा | - टी.एन. अशोक | ४१ |
| नफेखोरी: जीएसटीच्या अंमलबजावणीतील एक आव्हान | - गिरीश चंद्र प्रसाद | ४७ |
| वस्तू व सेवा कर आणि महाराष्ट्राची अर्थव्यवस्था | - प्रा. जीवन बिरादार | ५१ |

योजना मासिकासाठी लेख, वर्गणी, जाहिरात इ. सर्व पत्रव्यवहारासाठी पत्ता :
**योजना मासिक कार्यालय**
७०१, 'बी' विंग (७वा मजला), केंद्रीय सदन, सेक्टर १०, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४. दुरध्वनी - योजना -०२२-२७५६६५८२
email - myojanadpd@gmail.com

ISSN-0971-8397
विकास समर्पित मासिक
योजना

## संपादकीय

# एक देश एक कर

भारतात १ जुलै २०१७ पासून वस्तू व सेवा कर लागू झाल्यामुळे देशाच्या इतिहासात २०१७ हे वर्ष खूपच महत्वाचे ठरणार आहे. भारताच्या कर इतिहासात वस्तू व सेवा कर ही प्रणाली क्रांतिकारी पाऊल म्हणून ओळखले जाणार आहे. योग्य कर धोरणे ही कोणत्याही देशाच्या मजबूत प्रशासन आणि शाश्वत विकासाचे निदर्शक मानली जातात. यासाठी अगदी इतिहासकालीन दाखले देता येतील. उत्तम प्रशासक म्हणून ज्यांचे इतिहासात नाव घेतले जाते अशा सर्व राज्यकर्त्यांनी आपल्या शासन काळात महसूल संकलनाची कार्यक्षम यंत्रणा उभी केल्याचे आपणास दिसून येईल. मौर्य, गुप्त, अल्तमश किंवा अकबर, या सर्व राजांनी त्यांच्या कार्यकाळात महसूल संकलनाची चोख यंत्रणा राबविली होती.

कर हे महसूल आणि प्रगतीचा स्त्रोत तर आहेतच, शिवाय करांमुळे सत्ताधाऱ्यांचे करदात्याप्रतीचे उत्तरदायित्वही वाढीस लागते. कार्यक्षम करप्रणालीमुळे सामाजिक उद्दिष्ट्ये आणि आर्थिक वृद्धीस चालना मिळण्यासाठी आवश्यक सार्वजनिक निधीची दीर्घकालीन सुनिश्चितता मिळवता येते. भारतातील करप्रणालीतील जटिलता नेहमीच चर्चेचा आणि चिंतेचा विषय राहिली आहे. केंद्र सरकार,राज्य सरकारे आणि स्थानिक स्वराज्य संस्था या सर्वांना विविध प्रकारचे कर आकारणीचे अधिकार असल्यामुळे सामान्य नागरिकांसह, व्यापारी आणि उत्पादकांनाही एकाच वस्तू अथवा सेवेसाठी अनेक कर भरावे लागत असत.मालाच्या मूळ उत्पादन ठिकाणापासून त्याची वाहतूक आणि ग्राहकाच्या प्रत्यक्ष हातात पडेपर्यंतच्या अनेक टप्प्यावर कर आकारणी होत असे. त्यामुळे अनेकदा एकाच वस्तू किंवा सेवेसाठी अनेकवेळा कर भरावा लागे. मालाची एका राज्यातून दुसऱ्या राज्यात वाहतूक करताना राज्यांच्या सीमेवर असलेल्या नाक्यांवर विविध प्रकारचे कर भरताना कित्येक तास वाया जात तसेच त्यामुळे नाशवंत मालाचेही नुकसान होई. जकात वसुली सुरु असलेल्या शहरांच्या वेशीवरही असेच चित्र दिसे. त्यामुळे वाहतुकीचा खर्च मोठ्या प्रमाणावर वाढत असे.

वस्तू व सेवा कररुपी नव्या कर यंत्रणेत ही स्थिती बदलणार आहे. संपूर्ण देशभरात आता कोणत्याही वस्तू अथवा सेवेसाठी एकदाच कर भरावा लागेल. 'डेस्टिनेशन टॅक्स' असे नाव देण्यात आलेल्या वस्तू व सेवा करामुळे आता वस्तू अथवा सेवा जिथे पुरविली जाणार आहे, अशा एकाच ठिकाणी कराची आकारणी केली जाईल. उदा. कपड्यावरील कर कपडे प्रत्यक्ष जिथे विकले जाणार आहेत, अशाच ठिकाणी आकारला जाईल. पूर्वी याच कपड्यासाठी उत्पादनाच्या ठिकाणी, वाहतुकीच्या वेळी आणि शेवटी ग्राहकाला विकताना अशा अनेक ठिकाणी कर आकारला जाई. ग्राहकाच्या नकळत या सर्व गोष्टी घडत. परंतु आता नव्या करप्रणालीत करांची पुनरुक्ती टळल्यामुळे ग्राहकाला कमी दारात वस्तू अथवा सेवा मिळेल. त्यामुळे सामान्य नागरिकांसाठी नवी करयंत्रणा लाभदायक ठरणार आहे. या कारयंत्रणेची रचना पारदर्शक असल्यामुळे सरकारला त्यावर देखरेख ठेवणेही सुलभ ठरणार आहे. 'मेक इन इंडिया' आणि 'ईझ ऑफ डुईंग बिझीनेस' यासारख्या सरकारी योजना आणि धोरणांनाही नव्या करप्रणालीमुळे पाठबळ मिळेल. नजीकच्या भविष्यकाळात जागतिक अर्थकारणात भारताची भूमिका महत्वाची असणार आहे. अशावेळी वस्तू व सेवा कर 'गेम चेंजर' ठरेल. कारण, या कर यंत्रणेमुळे भारतात उत्पादित वस्तू देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत स्पर्धात्मक किमतीला विकणे शक्य होईल आणि परिणामी भारताच्या निर्यातीत वाढ होईल.

वस्तू व सेवा कराच्या या विशाल यंत्रणेच्या परिचालनासाठी गुड्स अँड सर्व्हिस टॅक्स नेटवर्क (जी.एस. टी. एन.) ची निर्मिती करण्यात आली आहे. या नव्या कररचनेमुळे देशाचा शाश्वत विकास घडून येणार असून 'एक देश, एक कर, एक बाजारपेठ' हे स्वप्न प्रत्यक्षात उतरणार आहे.

■■■

# वस्तू व सेवा कर आणि ग्राहक

**-सूरज जैसवाल**



*या कराची दोन प्रमुख वैशिष्टये अशी की, काही मोजके अपवाद वगळता सर्व वस्तू व सेवांवर देशातील सर्व राज्यांत आता केवळ एकच कर लागू होईल. पेट्रोलिअम, अल्कोहोल, व रिअल इस्टेट या क्षेत्रांना मात्र वस्तू व सेवा कराच्या परिघाबाहेर ठेवण्यात आले असून यांतील वस्तू व सेवांवर पूर्वीच्या करपध्दतीप्रमाणेच कर आकारणी केली जाईल.*


कर कोण भरतो आणि तो कशा पध्दतीने आकारला जातो, यानुसार करांची दोन भागांत विभागणी केली जाते- प्रत्यक्ष कर आणि अप्रत्यक्ष कर. व्यक्ती किंवा संस्थेचे उत्पन्न, व्यवसायातील नफा, किंवा संपत्ती वर आकारले जाणारे कर म्हणजे आयकर, महानगरपालिका कर, मालमत्ता कर इ. काही प्रत्यक्ष कराची उदाहरणे देता येतील. याउलट, अप्रत्यक्ष कर हा वस्तू व सेवांच्या देवाणघेवाणीच्या व्यवहारात विक्रेता किंवा ग्राहकांना काही प्रमाणात वस्तूच्या किंमतीतून अप्रत्यक्षरित्या भरावा लागतो. बरेचदा विक्रेते ग्राहकांकडूनच अप्रत्यक्ष कराचे मूल्य वसूल करतात. अप्रत्यक्ष कराची काही उदाहरणे म्हणजे परदेशी वस्तूंच्या आयातीसाठी सीमा शुल्क, व्यावसायिक संस्थेमार्फत प्रदान करण्यात आलेल्या सेवेवरील सेवा कर, वस्तूंच्या उत्पादनावरील अबकारी कर, व विक्री कर इ. वस्तू आणि सेवा कर हा पण एक अप्रत्यक्ष कर असून केंद्र व राज्य सरकारद्वारे आकारल्या जाणाऱ्या अप्रत्यक्ष करांच्या जागी हा एकच कर आता सर्व वस्तू व सेवांवर लागू होईल.

वस्तू व सेवा कर भारतात अधिकृतरित्या १ जुलै २०१७ पासून लागू करण्यात आला. या कराची दोन प्रमुख वैशिष्टये अशी की, काही मोजके अपवाद वगळता सर्व वस्तू व सेवांवर देशातील सर्व राज्यांत आता केवळ एकच कर लागू होईल. पेट्रोलिअम, अल्कोहोल, व रिअल इस्टेट या क्षेत्रांना मात्र वस्तू व सेवा कराच्या परिघाबाहेर ठेवण्यात आले असून यांतील वस्तू व सेवांवर पूर्वीच्या करपध्दतीप्रमाणेच कर आकारणी केली जाईल. तसेच सीमा शुल्क कर वस्तू व सेवा करातच समाविष्ट करण्यात आला असून ग्रामपंचायत, नगर परिषद व महानगरपालिका यांसारख्या स्थानिक संस्थांद्वारे वस्तू सेवांवर आकारले जाणारे विविध अप्रत्यक्ष कर वस्तू व सेवा कराच्या रचनेतून वगळण्यात आले आहेत. हे अपवाद वगळता बाकी सर्व अप्रत्यक्ष कर वस्तू व सेवा या एकाच करात समाविष्ट करण्यात आले आहेत. यामध्ये

अबकारी कर, सेवा कर, राज्यांचे मूल्य वर्धित कर, राज्यांचे सेवा कर, मनोरंजन कर, प्रवेश कर, लक्झरी कर, सीमा शुल्कावर आकारले जाणारे विशेष अतिरिक्त मूल्य इ.चा समावेश होतो. अर्थव्यवस्थेतील तीन प्रमुख भागीदार -शासन, ग्राहक व उद्योगजगत, वस्तू व सेवा कराच्या अंमलबजावणीमुळे प्रभावित होणार आहेत. प्रस्तुत लेखात वस्तू व सेवा कर हा पूर्वीच्या करपध्दतीच्या तुलनेने कसा वेगळा आहे, व या करपध्दतीचा ग्राहकांवर काय व कसा प्रभाव पडेल, याचे विश्लेषण मांडण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

**पूर्वीच्या करप्रणालीच्या तुलनेत वस्तू व सेवा कर पध्दतीचे वेगळेपण**

कोणतीही वस्तू व सेवा उत्पादन आणि पुरवठा साखळीदरम्यान विविध टप्पे पार करून शेवटी ग्राहका पर्यंत पोहचते. या विविध टप्प्यांत त्या त्या वस्तू व सेवांवर एकापेक्षा अधिक अप्रत्यक्ष कर लागू होतात. या करांमध्ये केंद्र व राज्य सरकारांच्या करांचाही समावेश असतो. उदाहरणार्थ, भारतातील एखाद्या कारखान्यात तयार करण्यात आलेला दूरचित्रवाणी संच कारखान्यातून बाहेर पडतांना त्यावर अबकारी कर लागू होतो. जर या संचाच्या निर्मितीत काही परदेशातून मागवलेले सुटे भाग वापरले असतील तर त्या त्या यंत्रांवर सीमा शुल्क लागू झालेले असते. उत्पादकांपासून घाऊक विक्रेत्यापर्यंत या संचावर विक्री कर लागू होतो. व शेवटी घाऊक विक्रेत्याकडून किरकोळ विक्रेत्यापर्यंत संच जातो तेव्हा त्यावर मूल्य वर्धित कर लागू होतो. ही प्रक्रिया जर संच एका राज्यातून दुसऱ्या राज्यात जात असेल, तर अधिक गुंतागुंतीची असते कारण त्यावर केंद्रिय सेवा कर लागू होतोच तसेच राज्यांप्रमाणे केंद्राच्या या कराचा दर वेगळा असतो. उदाहरणार्थ, वस्तू व सेवा कर लागू होण्यापूर्वी, वस्तू वरील मूल्यवर्धित कर महाराष्ट्रात १२.५% होता तर हाच दर गुजरातमध्ये १५% होता. तसेच बरेचदा काही वस्तू व सेवांवर लक्झरी कर, मनोरंजन कर इ. सारखे विशेष करही लावले जायचे. अशा प्रकारे विविध टप्प्यांवर एकापेक्षा अधिक कर व गुंतागुंतीची कररचना यामुळे दोन समस्या निर्माण झाल्या. एक म्हणजे करदात्यासाठी कर भरणे अधिक त्रासदायक व खर्चिक गोष्ट बनली व त्यातून कर चुकवेगिरी वाढीस लागली. दुसरी समस्या म्हणजे, प्रत्येक नवा कर हा वस्तूच्या विक्रीच्या किंमतीत समाविष्ट होत असल्यामुळे आधीच्या टप्प्यात भरलेल्या कराचा दरही यात समाविष्ट होत गेला. याचाच अर्थ असा की, आधीच्या टप्प्यातील कराच्या दरावर लागलेला कर म्हणजे करवाढीचा परिणाम, वस्तूच्या मूळ किंमतीत वाढ होण्यात दिसून आला. ही संपूर्ण प्रक्रिया समजावणारे उदाहरण पुढीलप्रमाणे-




वरील आकृतीनुसार, ए हा घाऊक व्यापारी आहे, तर बी हा किरकोळ विक्रेता आहे आणि सी हा ग्राहक आहे. जेव्हा सी १३० रूपये किंमतीवर २० टक्के कर भरतो, तेव्हा या करात बी ने ए कडून ती वस्तू घेतांना भरलेल्या कराची रक्कमही समाविष्ट झालेली असते. याचाच अर्थ सी वस्तूच्या मूळ किंमतीवरील कराचे मूल्य (रू.१००+रू.२०) तर भरतोच आहे, पण त्याबरोबरच सी हा बी ने भरलेल्या करावरचा करही भरतोय (रू.१० आणि रू.१० वर २०%). अशा प्रकारे करावर कर भरण्याच्या पध्दतीतून ग्राहकाला भरावे लागणारी वस्तूची मूळ किंमती वाढते. वस्तू व सेवा कराच्या नवीन करप्रणालीत, वस्तू व सेवांवर केवळ एकच कर आकारला जाईल आणि या कराचा दर सर्व राज्यांत एकसमान असेल. तसेच प्रत्येक उत्पादक विक्रेता किंवा उद्योगाला इनपुट टॅक्स क्रेडिट योजनेचा लाभ मिळेल. हे अधिक सोप्या शब्दांत वरील उदाहरणाला अनुसरून सांगायचे तर, जेव्हा बी रूपये ११० चा इनपुट खरेदी करतो त्यात रूपये १० ची कर आकारणी होते. जेव्हा ए ही रूपये १० ची रक्कम व कर भरणाऱ्या

बी चा तपशील शासनाकडे जमा करेल, तेव्हा बी ला रूपये १० चे टॅक्स इनपुट क्रेडिट मिळेल. जेव्हा बी तीच वस्तू ग्राहक सी ला रूपये १३० ने विकेल, त्यावेळी बी ला शासनाकडे रूपये १३ चा कर भरावा लागणार होता परंतु, वस्तू व सेवा कराच्या रचनेनुसार, बी कडे रूपये १० चा कर सवलत असल्यामुळे त्याला त्यावरची उरलेली रक्कम केवळ रूपये तीनच शासनाला द्यावे लागतील. अशाप्रकारे, वस्तू व सेवा करप्रणालीमुळे अप्रत्यक्ष करांतील गुंतागुंत दूर झाली असून वस्तू व सेवांवरील एकूण कर भारही कमी झाला आहे व त्यामुळे संपूर्ण व्यावसायिक उलाढाल अधिक किफायतशीर झाली आहे.

### वस्तू व सेवा कराचे ग्राहकांना होणारे संभाव्य फायदे व तोटे

वस्तू व सेवा कराचा ग्राहकांवर दोन प्रकारे प्रभाव दिसून येईल. एक म्हणजे, प्रत्येक वस्तू व सेवेवर नवीन प्रकारे, सुयोग्य असा एकच कर दर लागू होईल व आधीच्या करप्रणालीच्या तुलनेने हा नवा कर दर ज्याप्रकारे वेगळा असेल त्यानुसार, वस्तू वा सेवेचे मूल्य कमी होईल किंवा वाढेल. दुसरा वस्तू व सेवा कराचा अप्रत्यक्ष परिणाम जो केवळ काही काळानंतरच स्पष्ट होउ शकेल, तो वस्तू वा सेवाच्या उत्पादन व पुरवठा साखळीतील प्रक्रियांवरील कराबाबत असेल.

वस्तू व सेवा कर प्रणालीअंतर्गत प्रत्येक वस्तू व सेवेला ५%, १२%, १८%, व २८% या चार प्रकारच्या कर दरांपैकी एक लागू होईल किंवा काही अपवादात्मक वस्तू अगर सेवा यांवर वस्तू व सेवा कर लागू होणार नाही. अशाप्रकारे, वस्तू व सेवा करामुळे किंमतीत होणारा बदल हा वस्तू व सेवांचे विभाजन चार वेगळ्या कर दरात केल्यामुळे दिसून येईल, जे पूर्वीच्या कर प्रणालीत घडत नव्हते. उदाहरणार्थ, एक्स हे उत्पादन उत्पादित झाल्यानंतर लगेचच ग्राहकाला विकण्यात आले, तर यात पूर्वीच्या करप्रणालीनुसार, अबकारी कर, सीमा शुल्क, राज्यांचा मूल्य वर्धित कर, प्रवेश कर इ. सारखे काही कर लागू झाले. त्यानुसार या उत्पादनावरील सर्व करांची एकूण रक्कम १५% झाली. आता, वस्तू व सेवा कराअंतर्गत, जर हेच उत्पादन १८% च्या करदर श्रेणीत मोडत असेल तर त्याची किंमत पूर्वीपेक्षा जास्त राहिल. पण जर हेच उत्पादन आता ५% किंवा १२% करदराच्या श्रेणीत येत असेल तर त्याची किंमत पूर्वीपेक्षा कमी होईल.

**वस्तू व सेवा कराचा ग्राहकांवर दोन प्रकारे प्रभाव दिसून येईल. एक म्हणजे, प्रत्येक वस्तू व सेवेवर नवीन प्रकारे, सुयोग्य असा एकच कर दर लागू होईल व आधीच्या करप्रणालीच्या तुलनेने हा नवा कर दर ज्याप्रकारे वेगळा असेल त्यानुसार, वस्तू वा सेवेचे मूल्य कमी होईल किंवा वाढेल. दुसरा वस्तू व सेवा कराचा अप्रत्यक्ष परिणाम जो केवळ काही काळानंतरच स्पष्ट होउ शकेल, तो वस्तू वा सेवाच्या उत्पादन व पुरवठा साखळीतील प्रक्रियांवरील कराबाबत असेल.**

कृषी उत्पादने जसे, फळे, भाजीपाला, कडधान्ये, दूध तसेच शिक्षण व आरोग्य क्षेत्राला वस्तू व सेवा करपध्दतीतून वगळण्यात आले आहे. या सर्व वस्तू व सेवा सर्वसामान्य ग्राहकाच्या एकूण दैनंदिन खर्चाच्या ४० ते ४५ टक्के खर्चात मोडतात. तर बाकी आवश्यक उत्पादने जसे, कोळसा, साखर, खाण्याचे तेल, कॉफी यांवर वस्तू व सेवा करप्रणालीत ५ टक्के कर लागू होईल. सेवांवरील कराचा दर हा सर्वसामान्यपणे १८ टक्के एवढा असेल, जो पूर्वीच्या करप्रणालीच्या तुलनेने ३ ते ४ टक्क्यांनी वाढवण्यात आला आहे. काही अर्थतज्ञांच्या मते, वस्तू व सेवा कर लागू झाल्यानंतर ५० टक्के वस्तूंवरील कराचा दर पूर्वीप्रमाणेच राहिल, ३० टक्के वस्तूंचे दर काही प्रमाणात कमी होतील तर २० टक्के वस्तूंच्या किंमतीत वाढ होईल. परंतु, एकूणच ग्राहकांना वस्तू व सेवा करामुळे नेमका किती कर भरावा लागतोय, हे नक्की समजू शकेल.

अजून एका कारणाने वस्तू व सेवा करपध्दतीत किंमतीत बदल दिसून येतील ते म्हणजे इनपुट क्रेडिट योजना. यापूर्वी वर नमूद केलेल्या विश्लेषणानुसार, इनपुट क्रेडिट मुळे वारंवार भराव्या लागणाऱ्या कराच्या किंमती कमी होतात त्यामुळे विक्रेत्याला भरावी



लागणारी कराची एकूण रक्कम कमी होते. यामुळे ग्राहकाला मिळणाऱ्या वस्तू अगर सेवेचा दरही कमी होतो. शासनाने वस्तू व सेवा कर प्रणाली लागू करतांनाच नफेखोरी विरोधी कायद्याची तरतूद केली असून, जे विक्रेते, करांची रक्कम वस्तूच्या किंमतीतून कमी करून तसे लाभ ग्राहकांना देणार नाहीत, त्यांच्यावर योग्य ती कारवाई केली जाईल. दळणवळण व सेवांच्या ने-आणीतील काही घटकांमुळे सेवांच्या बाजारमूल्यातील वृध्दी अथवा घट आताच नेमकी सांगता येणे शक्य नाही. वस्तू व सेवा करप्रणालीमुळे लगेचच्या काळात महागाईत वाढ होईल असा तर्कही काही अर्थतज्ञांनी मांडली आहे. या अनुमानामागे दोन संभाव्य कारणे असू शकतात. एक म्हणजे, जपान, ऑस्ट्रेलिया, कॅनडा, इ. देशांत जेव्हा वस्तू व सेवा कर लागू करण्यात आला, तेव्हा तेथील अर्थव्यवस्थेत महागाई वाढली होती. त्यानुसार भारतातही सुरूवातीच्या काळात नव्या करप्रणालीमुळे महागाईचा स्तर वाढण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. तसेच महागाई वाढण्याची दुसरी शक्यता मध्यम व लघु उद्योग चालवण्यासाठी लागणाऱ्या एकूण घटकांच्या किंमतीत वाढ होण्यामुळे निर्माण होते. या उद्योगांचा एकूण अनुपालन खर्च वाढणार आहे. त्यामुळे उत्पादन, व्यापार व वितरण साखळीच्या सर्व टप्प्यांत वस्तू व सेवांच्या किंमती कशा बदलतील व त्यातून महागाई वाढेल का, हे येणाऱ्या काळात स्पष्ट होऊ शकेल.

वस्तू व सेवा कराचा सर्वाधिक प्रभाव लघु व मध्यम स्वरूपातील उद्योगांवर दिसून येण्याची शक्यता आहे. सध्या भारतात मोठ्या संख्येने लघु व मध्यम भांडवल असलेले उद्योग अर्थव्यवस्थेच्या मुख्य परिघापासून दूर देशाच्या कानाकोपऱ्यात इतस्तत: विखुरलेल्या पध्दतीने अस्तित्वात आहे. म्हणजेच, अनेक लहानसहान उद्योग व्यापारी कायदे व उद्योगांवरील करनियमांना चुकवून व्यापार करीत आहेत. करचुकवेगिरीमुळे या उद्योगांना एकूण खर्च कमी लागतो. पण हे कायद्याला अनुसरून ठरत नाही.

**वस्तू व सेवा कराचा सर्वाधिक प्रभाव लघु व मध्यम स्वरूपातील उद्योगांवर दिसून येण्याची शक्यता आहे. सध्या भारतात मोठ्या संख्येने लघु व मध्यम भांडवल असलेले उद्योग अर्थव्यवस्थेच्या मुख्य परिघापासून दूर देशाच्या कानाकोपऱ्यात इतस्तत: विखुरलेल्या पध्दतीने अस्तित्वात आहे. म्हणजेच, अनेक लहानसहान उद्योग व्यापारी कायदे व उद्योगांवरील करनियमांना चुकवून व्यापार करीत आहेत.**

एखाद्या लघु उद्योजकाने दुसऱ्या वस्तू व सेवा कराच्या नेटवर्कमध्ये नोंदणी केलेल्या लघु उद्योजकाकडून, माल खरेदी केला व योग्य कर भरला तर वस्तू व सेवा करातील इनपुट क्रेडिट योजनेचे लाभ मिळतील व या तरतूदीमुळे ग्राहकही केवळ वस्तू व सेवा कराच्या व्यापारी साखळीत नोंदणी केलेल्या व्यापाऱ्यांकडूनच वस्तू विकत घेण्याचे प्रमाण वाढेल. यामुळे सर्वच स्तरातील व्यापाऱ्यांना वस्तू व सेवा कराच्या नेटवर्कमध्ये आपल्या उद्योगाची नोंदणी करणे अनिवार्य होईल, यातून करचुकवेगिरीला आळा बसून अर्थव्यवस्थेतील सर्व घटकांना नव्या करपध्दतीचे त्यांच्या वाटयाचे सर्व लाभ मिळतील.

देशात बरेचसे लघु व मध्यम उद्योग असेही आहेत जे पूर्वीपासूनची करप्रणाली नियमितपणे पाळत आहेत. हे उद्योग जेव्हा आता वस्तू व सेवा करप्रणालीत नोंदणी करतील तेव्हा सुरूवातीच्या टप्प्यात या उद्योगांचा एकूण खर्च अधिक राहिल. परंतु, असे असले तरिदेखील यामुळे देशाच्या करपध्दतीचा पाया अधिक व्यापक होऊन त्यामुळे शासनाला कराच्या माध्यमातून मिळणारे उत्पन्न वाढेल. ज्याप्रकारे संपूर्ण करप्रक्रियेत मूल्यवर्धन होईल. त्यानुसार मालाच्या किंमतीही वाढतील व त्याचे लाभ उद्योगांना मिळतील.

वस्तू व सेवा कराचा सर्वात महत्वाचा परिणाम हा वस्तूंच्या दळणवळणावर विशेषत: राज्याराज्यांतील उत्पादनांच्या



वाहतूकीवर दिसून येईल. आजवर राज्यांच्या सीमांवरील तपासणी नाक्यांवर माल वाहतूक करणाऱ्या ट्रक्सची रांग लागलेली दिसायची. परंतु, आता वस्तू व सेवा करांमुळे सर्व राज्यांत एकसमान कर लागू होणार असल्याने ही वाहनांची रांग दिसणार नाही. आतापर्यंत सुमारे २२ राज्यांनी राज्यसीमेवरील वाहन तपासणी कक्ष बंद केले आहेत. यामुळे मालवाहतूकीचा वेळ वाचून त्यातून वाहतूकीचा खर्चही खूप कमी होणार आहे. परिणामी, वस्तूंच्या किंमतीही कमी झालेल्या दिसतील.

**निष्कर्ष**

वस्तू व सेवा कराला स्वतंत्र भारतातील एक सर्वात ऐतिहासिक सुधारित करप्रणाली म्हणून वाखाणण्यात येत आहे आणि काही चांगल्या कारणांमुळे सर्वसामान्य जन अशी अपेक्षा नक्कीच करू शकतात की, या करप्रणालीचे लाभ दिर्घकालीन ठरतील. असे असले तरिही, ग्राहकांच्या दृष्टीकोनातून, वस्तू व सेवा करामुळे विविध वस्तू व सेवांच्या किंमतींतील बदल कशाप्रकारे कमी किंवा जास्त असतील, याबाबत अजूनही संभ्रम कायम आहे. वस्तू व सेवा करपध्दतीत अनेक आवश्यक वस्तू व सेवांवर योग्य प्रमाणात असे कमी कर दर ठेवण्यात आले असून पुरवठा साखळीतील सुधारणा व इनपुट टॅक्स क्रेडिट इ. घटकांमुळे वस्तू व सेवांचे दर कमी होण्यास मदत होईल. याउलट, काही विशिष्ट वस्तू व सेवांवर लावण्यात आलेल्या अधिक कराचा दर, लघु व मध्यम उद्योगांसाठी लागणाऱ्या घटकांच्या किंमतींतील वाढ यामुळे काही वस्तू व सेवांच्या किंमती वाढणार आहेत. तसेच नजीकच्या भविष्यात विविध वस्तू व सेवांचे दर नेमके कसे आणि किती प्रमाणात बदलतील याचे भाकित करणे अनेक परस्परविरोधी घटकांमुळे कठिण आहे. याचवेळी इतर देशातील वस्तू व सेवा करांचे स्वरूप व भारतातील वस्तू व सेवा करांची विविध प्रकारे केलेल्या वर्गवारीमुळे खूप वेगळे असल्याने त्या त्या देशांशी आपल्या देशातल्या नव्या करप्रणालीची तुलना करणे शक्य होऊ शकत नाही. या पार्श्वभूमीवर, विविध घटकांचा परिणाम व वस्तू व सेवा कर ग्राहकांना किती लाभदायक ठरेल हे येणाऱ्या काळातच स्पष्ट होउ शकेल.

**सर्वसामान्य जन अशी अपेक्षा नक्कीच करू शकतात की, या करप्रणालीचे लाभ दिर्घकालीन ठरतील. असे असले तरिही, ग्राहकांच्या दृष्टीकोनातून, वस्तू व सेवा करामुळे विविध वस्तू व सेवांच्या किंमतींतील बदल कशाप्रकारे कमी किंवा जास्त असतील, याबाबत अजूनही संभ्रम कायम आहे. वस्तू व सेवा करपध्दतीत अनेक आवश्यक वस्तू व सेवांवर योग्य प्रमाणात असे कमी कर दर ठेवण्यात आले असून पुरवठा साखळीतील सुधारणा व इनपुट टॅक्स क्रेडिट इ. घटकांमुळे वस्तू व सेवांचे दर कमी होण्यास मदत होईल**


■ ■ ■

*लेखक सेंटर फॉर बजेट अ‍ॅन्ड गव्हर्नन्स अकौंटॅबिलिटी, नवी दिल्ली येथे कार्यरत आहेत*

Email: suraj@cbgaindia.org

# वस्तू आणि सेवा करामुळे झालेले आमूलाग्र बदल

**- अरुण गोयल**




***जागतिक अनुभव पाहता असे दिसून येते की, वस्तू आणि सेवा करामुळे प्रत्येक भागधारकाचा लाभ झालेला आहे. भारतात वस्तू आणि सेवा कराच्या अंमलबजावणीमुळे ग्राहकाला लाभ होणार आहे. तसेच देशभर एकच अप्रत्यक्ष कर प्रणालीचा व्यापारी आणि उद्योगजगतालाही लाभ होणार आहे.***

एक जुलैच्या मध्यरात्री संसदेच्या केंद्रीय सभागृहात झालेल्या कार्यक्रमात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आणि राष्ट्रपती प्रणव मुखर्जी यांच्या उपस्थितीत देशभर वस्तू आणि सेवा कर लागू करण्यात आला. हा एक ऐतिहासिक क्षण होता आणि एक देश, एक दर, एक बाजारपेठ या दिशेने वाटचाल करण्यासाठी झालेला हा आमूलाग्र बदल होय. जागतिक अनुभव पाहता असे दिसून येते की, वस्तू आणि सेवा करामुळे प्रत्येक भागधारकाचा लाभ झालेला आहे. भारतात वस्तू आणि सेवा कराच्या अंमलबजावणीमुळे ग्राहकाला लाभ होणार आहे. तसेच देशभर एकच अप्रत्यक्ष कर प्रणालीचा व्यापारी आणि उद्योगजगतालाही लाभ होणार आहे. राज्यांतर्गत असलेल्या करसीमा नष्ट झाल्या, अतिशय सुलभ कर प्रणाली, व्यवहार्य खर्च कमी, माहिती तंत्रज्ञानाचा वापर आणि कर अधिकाऱ्यांचा कमीत कमी हस्तक्षेप होणार आहे. कच्च्या मालाची खरेदी, उत्पादनाचे ठिकाण, गोदामाची सुविधा याविषयी उत्पादक आता सारासार विचार करतील. केंद्र आणि राज्य सरकारांना आता कर उत्साह दिसून येईल आणि करवसूलीचा खर्चही कमी झालेला असेल. निर्यातीमध्ये अधिक स्पर्धा निर्माण होईल. सर्वात महत्त्वाचे म्हणजे वस्तू आणि सेवा करामुळे 'मेक इन इंडिया' कार्यक्रमाला अधिक बळकटी मिळेल. कारण, व्यापारसुलभता आणि एकात्मिक जीएसटीमुळे अतिशय हलक्या दर्जाच्या निर्यातीपासून संरक्षण मिळेल. या सर्वांचा एकत्रित परिणाम म्हणजे देशाच्या जीडीपीमध्ये वाढ होईल.

घटनात्मक दुरुस्तीची आवश्यकता: ज्या ज्या देशांमध्ये वस्तू आणि सेवा कराची अंमलबजावणी झाली आहे, त्या देशांमध्ये जीएसटी एकाग्र असून केंद्र अथवा राज्य सरकारांकडून भार उचलला जातो. भारतात जीएसटी लागू करण्यासाठी घटनात्मक दुरुस्तीची आवश्यकता आहे. कारण केंद्र सूची आणि राज्य सूचीच्या माध्यमातून केंद्र आणि राज्य सरकारांच्या आर्थिक अधिकारांची विभागणी करण्यात

आली आहे. केंद्र सरकार वस्तू उत्पादनावर कर आकारते (मद्य, अफू आणि मानवी सेवनासाठीचे मादक द्रव्य इ. याशिवाय) तर, राज्य सरकार वस्तूच्या विक्रीवर कर आकारते. राज्यांतर्गत वस्तू विक्रीबाबत कर आकारणीचा अधिकार केंद्र सरकारला आहे पण करवसूली ही पूर्णत: राज्य सरकारच्या अखत्यारित आहे. सेवा कराची आकारणी करण्याचा अधिकार फक्त केंद्र सरकारला आहे. केंद्र आणि राज्य सरकारांच्या अधिकारांची स्पष्टपणे विभागणी केली असल्यामुळे दोघांनाही स्रोत उभे करण्याची आवश्यकता आहे. म्हणून, राज्यघटनेत दुरुस्ती आवश्यक आहे.

**देशात जीएसटीच्या अंमलबजावणीपर्यंतचा प्रवास:** सध्या १६० देशांमध्ये वस्तू आणि सेवा कर प्रणाली आहे. सर्वप्रथम फ्रान्सने १९५४ मध्ये वस्तू आणि सेवा कर प्रणाली लागू केली. जीएसटीमुळे अर्थव्यवस्थेत बरेच परिवर्तन घडून येणार आहे शिवाय जीएसटी हा बराच काळ राजकीय पक्षांचाही अजेंडा होता. भारतात जीएसटीचा प्रवास बराच दीर्घ आहे आणि यात सर्वच राजकीय पक्षांचा सहभाग आहे. तत्कालीन पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांच्या कारकिर्दीत २००० साली सर्वप्रथम जीएसटीची संकल्पना समोर आली आणि पश्चिम बंगालचे अर्थमंत्री असीम दासगुप्ता यांच्या अध्यक्षतेखाली जीएसटी प्रारुपाविषयी समिती नेमण्यात आली. २००३ मध्ये वाजपेयी सरकारने विजय केळकर यांच्या अध्यक्षतेखाली कर सुधारणाविषयक कार्यदलाची स्थापना केली. २८ फेब्रुवारी २००६ रोजी तत्कालीन अर्थमंत्र्यांनी २००६-०७ च्या अर्थसंकल्पात जाहीर केले की, १ एप्रिल २०१० पासून जीएसटी लागू करण्यात येईल. राज्यांच्या अर्थमंत्र्यांच्या अधिकारीता समितीला जीएसटीचा आराखडा बनवण्यास सांगण्यात आले. राज्य सरकारचे अधिकारी आणि केंद्र सरकारचे अधिकारी यांनी संयुक्तरित्या जीएसटीच्या विविध पैलूंविषयी अभ्यास केला, अहवाल दिले. तपशीलवार चर्चेअंती, अधिकारीता समितीने नोव्हेंबर २००९ मध्ये प्रथम चर्चा पत्र (फर्स्ट डिस्कशन पेपर) प्रकाशित केला. यात प्रस्तावित जीएसटी आणि सद्यस्थिती यावर आधारित चर्चा झाली.

***सध्या १६० देशांमध्ये वस्तू आणि सेवा कर प्रणाली आहे. सर्वप्रथम फ्रान्सने १९५४ मध्ये वस्तू आणि सेवा कर प्रणाली लागू केली. जीएसटीमुळे अर्थव्यवस्थेत बरेच परिवर्तन घडून येणार आहे शिवाय जीएसटी हा बराच काळ राजकीय पक्षांचाही अजेंडा होता. भारतात जीएसटीचा प्रवास बराच दीर्घ आहे आणि यात सर्वच राजकीय पक्षांचा सहभाग आहे. तत्कालीन पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांच्या कारकिर्दीत २००० साली सर्वप्रथम जीएसटीची संकल्पना समोर आली***

जीएसटीसाठी घटनात्मक दुरुस्तीची आवश्यकता असल्याने दीर्घकाळ राजकीय मतैक्य होत नव्हते. सध्याचे केंद्र सरकार सत्तेत आल्यानंतर जीएसटीच्या अंमलबजावणीसाठी वेगाने घडामोडी घडत गेल्या. लोकसभेत १९ डिसेंबर २०१४ रोजी घटनादुरुस्ती विधेयक (१२२ वी दुरुस्ती) मांडण्यात आले आणि मे २०१५ मध्ये लोकसभेने हे विधेयक संमत केले. राज्यसभेत हे विधेयक मांडण्यात आल्यानंतर १४ मे २०१५ रोजी हे विधेयक राज्यसभा आणि लोकसभेच्या संयुक्त निवड समितीसमोर मांडण्यात आले. या समितीने २२ जुलै २०१५ रोजी आपला अहवाल सादर केला. यानंतरच्या घडामोडींनी वेग घेतला. मतैक्यानंतर, सुधारित घटनादुरुस्ती विधेयक १ ऑगस्ट २०१६ रोजी मांडण्यात आले. राज्यसभेत हे विधेयक ३ ऑगस्ट २०१६ रोजी संमत केले तर लोकसभेत ८ ऑगस्ट २०१६ रोजी संमत करण्यात आले. राज्य विधानसभांच्या आणि राष्ट्रपतींच्या मंजूरीनंतर ८ सप्टेंबर २०१६ रोजी राज्यघटनेत दुरुस्ती कायदा २०१६ करण्यात आला (१०१ वी घटनादुरुस्ती). राज्यघटनेतील दुरुस्तीनंतर वस्तू आणि सेवा कराची देशभर अंमलबजावणी करण्याचा मार्ग मोकळा झाला.

घटनादुरुस्ती कायदा (१०१ वी घटनादुरुस्ती) २०१६:

घटनादुरुस्तीमुळे केंद्र आणि राज्य सरकारांना वस्तू आणि सेवा कराच्या आकारणीविषयी अधिकार देण्यात आले आहेत. जीएसटीअंतर्गत वस्तू आणि सेवा किंवा दोन्हीवर करआकारणी निश्चित करण्यात आली आहे. यातून मद्य वगळण्यात आले आहे. तसेच पाच पेट्रोलजन्य पदार्थ यात, कच्चे तेल, पेट्रोल, हाय स्पीड डिझेल, नैसर्गिक वायू आणि हवाई इंधन तुर्तास जीएसटी कक्षेबाहेर ठेवण्यात आले आहे. पेट्रोलजन्य पदार्थ जीएसटीच्या कक्षेत आणण्यासंबंधीचा निर्णय जीएसटी परिषद घेणार आहे. वस्तू आणि सेवांच्या आंतरराज्य पुरवठयासंदर्भात एकात्मिक जीएसटी (आयजीएसटी) लागू करण्यात येईल आणि याची आकारणी केंद्र सरकारकडून केली जाणार आहे. यामुळे एका राज्यातून दुसऱ्या राज्यात वस्तू आणि सेवांची देवाणघेवाण सुलभ होईल, याकडे लक्ष दिले जाणार आहे.

**जीएसटी परिषद** : जीएसटीविषयीच्या घटनात्मक दुरुस्तीचा महत्त्वाचा पैलू म्हणजे जीएसटी परिषदेची स्थापना. केंद्रीय अर्थमंत्री जीएसटी परिषदेचे अध्यक्ष आहेत, केंद्रीय अर्थ राज्यमंत्री (महसूल) आणि २९ राज्यांचे अर्थ/कर मंत्री, दिल्ली आणि पुदुच्चेरी यांचा या परिषदेत समावेश आहे. केंद्र आणि राज्य सरकारांमध्ये जीएसटीविषयी समन्वय राखणे हे परिषदेचे प्रमुख कार्य आहे. जीएसटी परिषद पुढील मुद्यांवर केंद्र आणि राज्य सरकारांना शिफारस करेल.

(i) कर, उपकर आणि केंद्र व राज्य सरकारांकडून जीएसटीअंतर्गत वेळोवेळी आकारण्यात येणारे कर

***घटनात्मक दुरुस्तीने स्पष्ट केले आहे की, जीएसटी परिषदेच्या बैठकीत तीन चतुर्थांश बहुमताने निर्णय झाले पाहिजेत. यात केंद्र सरकारच्या मताचा हिस्सा एक तृतीयांश आहे आणि सर्व राज्यांचा मताचा हिस्सा दोन तृतीयांश राहिल. बैठकीच्या गणपूर्तीसाठी एकूण संख्येच्या अर्धे संख्याबळ असणे आवश्यक आहे. मतदानाची पद्धत अशी आहे की, यामुळे केंद्र सरकार अथवा राज्यांना कोणताही निर्णय सर्वानुमतेच घ्यावा लागणार आहे.***

(ii) जीएसटीमधून वगळण्याची शक्यता असलेले वस्तू आणि सेवा कर

(iii) पेट्रोलजन्य पदार्थ आणि हवाई इंधनाचा जीएसटीमध्ये समावेश करण्याविषयी तारीख निर्धारीत करणे

(iv) आदर्श जीएसटी कायदे, कर आकारणीचे तत्त्व, आयजीएसटीची नियुक्ती

(v) जीएसटीतून किती रक्कमेपर्यंतचे व्यवहार वगळायचे याचा निर्णय

(vi) जीएसटीशी सुसंगत दर निश्चित करणे

(vii) आणखी काही दर जसे नैसर्गिक आपत्ती आणि इतर संकटांदरम्यान निश्चित काळासाठी अतिरिक्त स्रोतांच्या दरांची निश्चिती करणे

(viii) जीएसटीसाठी ईशान्य भारत, जम्मू आणि काश्मीर, हिमाचल प्रदेश आणि उत्तराखंड राज्यांसाठी विशेष तरतुदी करणे

(ix) जीएसटी परिषदेला उचित वाटतील असे वेळोवेळी विचारात घेतले जाणारे मुद्दे

घटनात्मक दुरुस्तीने स्पष्ट केले आहे की, जीएसटी परिषदेच्या बैठकीत तीन चतुर्थांश बहुमताने निर्णय झाले पाहिजेत. यात केंद्र सरकारच्या मताचा हिस्सा एक तृतीयांश आहे आणि सर्व राज्यांचा मताचा हिस्सा दोन तृतीयांश राहिल. बैठकीच्या गणपूर्तीसाठी एकूण संख्येच्या अर्धे संख्याबळ असणे आवश्यक आहे. मतदानाची पद्धत अशी आहे की, यामुळे केंद्र सरकार अथवा राज्यांना कोणताही निर्णय सर्वानुमतेच घ्यावा लागणार आहे. मतदानामध्ये केंद्र सरकारचा वाटा ३३% आहे, त्यामुळे कोणताही निर्णय घेताना राज्यांची भूमिका तेवढीच महत्त्वाची ठरणार आहे. जीएसटी परिषदेने आतापर्यंतचे सर्व निर्णय सर्वानुमते घेतले आहेत. मतदानाची गरज पडली नाही.

**जीएसटी परिषदेचे कार्य**: १ जुलै २०१७ रोजी देशभर जीएसटी लागू होण्यापूर्वी जीएसटी परिषदेच्या १८ बैठका झाल्या. सर्व निर्णय सर्वानुमते घेण्यात आले. जीएसटी परिषदेने केंद्रीय जीएसटी,

राज्य जीएसटी, केंद्रशासित प्रदेश जीएसटी, एकात्मिक जीएसटी आणि राज्यांसंबंधी अनेक निर्णयांचा मसुदा तयार केला. केंद्र आणि राज्य सरकारांमध्ये प्रशासकीय अधिकारांच्या विभागणीचा कठीण असा मुद्दा जीएसटी परिषदेने अतिशय योग्य पद्धतीने हाताळला. जीएसटी परिषद ही नव्या संघराज्याची नांदी म्हणावी लागेल. ज्यात केंद्र आणि राज्य आपले सार्वभौमत्व जपून तसेच आर्थिक मर्यादा पाळून एकमेकांना सहकार्य करण्यास तयार आहेत.

**राज्यांना नूकसान भरपाईची रक्कम** : जीएसटी हा डेस्टिनेशन बेस्ड टॅक्स आहे, त्यामुळे काही वस्तू उत्पादक राज्यांना चिंता आहे की जीएसटीच्या अंमलबजावणीमुळे आपल्या महसूलावर पाणी सोडावे लागेल. म्हणून घटनादुरुस्ती कायदा (एकशे एक वी घटनादुरुस्ती) २०१६ नूसार राज्यांना पाच वर्षाच्या कालावधीसाठी नूकसानभरपाईची तरतूद करण्यात आली आहे. या कायद्यानूसार २०१५-२०१६ हे पायाभूत वर्ष निर्धारीत करण्यात आले आहे. चैनीच्या वस्तूंवर कर आकारून नूकसानभरपाईसाठी लागणारा निधी भरुन काढला जाणार आहे.

**कर दरांची निश्चिती**: कर दरांची निश्चिती करताना, जीएसटी परिषदेने तीन बाबी हाताळण्याचे कठीण काम केले आहे. पहिले म्हणजे समाजातील गरीब आणि असुरक्षित घटकांना संरक्षण देऊन जीवनावश्यक वस्तूंच्या किंमती आवाक्यात ठेवणे. दुसरे म्हणजे, केंद्र आणि राज्यांच्या सर्व महसूल स्रोतांचे जतन करणे. तिसरे म्हणजे, वस्तू आणि सेवांवरील करांच्या प्रमाणात वाढ आणि घट होऊ नये याची काळजी घेणे. या सर्व बाबी विचारात घेऊन जीएसटी परिषदेने ५%, १२%, १८% आणि २८%. असे करांचे प्रमाण निश्चित केले आहे.

**मध्यम आणि लघु उद्योगांना संरक्षण** : जीएसटी प्रणालीत मध्यम आणि लघु उद्योगांच्या समस्या दूर करण्यासाठी अनेक तरतूदी करण्यात आल्या आहेत. आर्थिक वर्षात २० लाखांपेक्षा कमी उलाढाल असलेल्या व्यावसायिकांना जीएसटी नोंदणीतून वगळण्यात आले आहे (काही राज्यांसाठी ही तरतूद दहा लाख आहे). लघु उद्योगांना जीएसटीतून वगळण्यात आले आहे. तसेच जीएसटीअंतर्गत तिमाही रुपये ७५ लाख उलाढाल असलेल्या व्यावसायिकांसाठी नूकसानभरपाईची तरतूद करण्यात आली आहे. यात व्यापारी आणि उत्पादक तसेच हॉटेल व्यावसायिकांना सहभागी होता येते. या योजनेअंतर्गत उत्पादकांना एक टक्के दर, हॉटेल व्यावसायिक अडीच टक्के दर आणि व्यापाऱ्यांना ०.५% दराने एसजीएसटी आणि सीजीएसटीअंतर्गत लाभ मिळेल. मात्र, या योजनेसाठी आंतर-राज्य व्यापार करणारे व्यावसायिक पात्र नाहीत.

**कर गळती आणि भ्रष्टाचारला प्रतिबंध** :

भारतीय जीएसटी प्रणालीही पावत्यांशी (इनव्हाईस) निगडीत आहे. विक्रेता आणि पुरवठादार यांच्या पावत्या जुळल्या तरच इनपूट टॅक्स क्रेडिट होईल. माहिती-तंत्रज्ञानावर आधारीत प्रणालीमुळे दरमहिन्याला तीन अब्ज पावत्यांची पडताळणी केली जाणार आहे. ही एक प्रकारे स्व-नियंत्रित प्रणाली आहे. यामुळे केवळ करचोरी, भ्रष्टाचारास आळा तर घातला जाणारच आहे शिवाय यामुळे अर्थव्यवस्थेत अधिकाधिक व्यवहार होण्यास मदत होईल. नव्या जीएसटी प्रणालीमध्ये करदाता हा एकाच पोर्टलच्या माध्यमातून नोंदणी करु शकतो, रिटर्न फाईल्स करु शकतो, तसेच कर अधिकाऱ्यांशी संवाद साधू शकतो.


**निष्कर्ष**: १ जुलै २०१७ पासून देशभर लागू झालेला जीएसटी ही परिवर्तनाची नांदी ठरणार आहे. प्रत्येक भागधारकाने याचे स्वागत केले आहे. नव्या जीएसटी प्रणालीमुळे अर्थव्यवस्थेत अधिकाधिक व्यवसायवृद्धी होणार आहे. हा तीव्र बदल काही काळासाठी त्रासदायक ठरेल. पण, केंद्र आणि राज्य सरकारमधील कर अधिकारी याच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी कार्यरत आहे. कमी काळासाठी सहन केलेल्या वेदनेचे फळ भारतीय अर्थव्यवस्थेच्या वृद्धीत असणार आहे.

■ ■ ■

*लेखक भारतीय प्रशासकीय सेवेत कार्यरत असून सध्या ते जीएसटी परिषदेचे अतिरिक्त सचिव आहेत.*
*Email : arun.59goyal@gmail.com*

# वस्तू व सेवा कर आणि व्यापारी सहजतेवरील प्रभाव

- दानिश ए. हाशिम व वर्षा कुमारी




***करचुकवेगिरीला आळा घातला जावा म्हणून या सुधारणेला सर्वप्रथम प्रत्यक्षात आणणारा देश म्हणजे फ्रान्स होय. फ्रान्सने ही सुधारणा सन १९५४ मध्ये केली होती. भारतामध्ये ही सुधारणा लागू होणे हे व्यापारी सहजतेच्या दृष्टीने एक गंभीर पाऊल आहे.जागतिक बँकेच्या क्रमवारीत व्यापार करणाऱ्या देशांच्या २०१७ च्या अहवालात १९० देशांच्या यादीमध्ये सध्या भारताच्या १३० वा क्रमांक आहे.***

देशाच्या सर्वांत महत्वाच्या करसुधारणेच्या प्रवासास तब्बल १७ वर्षे लागली. त्या ओघाने वादविवाद सत्रे, चर्चा, बैठका, सल्लामसलती आणि मतभेद आलेच. मात्र या साऱ्यानंतरही वस्तू व सेवा कायदा आपल्या भारत देशात १ जुलै २०१७ रोजी लागू झाला. अटल बिहारी वाजपेयींच्या शासनात सन २००० मध्ये एक समिती जीएसटीचा आराखडा नमुना मांडण्यासाठी स्थापली होती, आणि त्यामध्ये संमत झालेल्या निर्णयांच्या अंमलबजावणीसाठी सन २००३ मध्ये कृतीदल नेमण्यात आले. त्याचे अध्यक्षपद श्री. विजय केळकर यांचेकडे होते. या घटनेनंतर मागे वळूनही न पाहता केंद्र शासनाने यावर राज्य शासनांच्या मदतीने कायद्यातील सुधारणा लवकरात लवकर व्हावी याकरीता सातत्याने काम केले.

वस्तू व सेवा कायद्याच्या अंमलबजावणीने, १६० पेक्षा जास्त देशांच्या समुहाशी भारत जोडला गेला आहे. ज्यात जर्मनी, इटली, ब्रिटन, दक्षिण कोरिया, जपान, कॅनडा, ऑस्ट्रेलिया, रशिया, चीन, सिंगापूर आणि मलेशिया यांचा समावेश आहे. या देशांनी जीएसटी अंमलात आणला आहे. करचुकवेगिरीला आळा घातला जावा म्हणून या सुधारणेला सर्वप्रथम प्रत्यक्षात आणणारा देश म्हणजे फ्रान्स होय. फ्रान्सने ही सुधारणा सन १९५४ मध्ये केली होती. भारतामध्ये ही सुधारणा लागू होणे हे व्यापारी सहजतेच्या दृष्टीने एक गंभीर पाऊल आहे.जागतिक बँकेच्या क्रमवारीत व्यापार करणाऱ्या देशांच्या २०१७ च्या अहवालात १९० देशांच्या यादीमध्ये सध्या भारताच्या १३० वा क्रमांक आहे.

**जीएसटी समजून घेताना:-** जीएसटी हा निश्चित स्वरुपाचा वस्तू व सेवांवर आधारित उत्पादक ते ग्राहक अशा प्रवासातील एकमेव कर असून केंद्र तसेच राज्य शासनांच्या अप्रत्यक्ष करांना तो पर्याय असून देशभर एकच बाजारपेठ उभारणारा कर आहे. (तक्ता क्र.१) जीएसटीच्या अनेक फायद्यांपैकी एक फायदा असा की, करसंदर्भातील सुधारणा करताना

व्यवसाय करण्याची सुलभता यामुळे येणार आहे. करपध्दतीची पूर्तता होणार आहे. करांवर कर मोडीत निघणार असून कराचे ओझे कमी होणार आहे. करप्रशासनात सुधारणा होणार आहे, करचुवेगिरीलाही आळा बसणार आहे, करपध्दतीचा पाया अर्थशास्त्राीय परिभाषेत विस्तृत होणार असून कररुपी उत्पन्नामध्ये भरीव वाढ होणार आहे. औद्योगिक उत्पादनावर पूर्वीच्या २५ ते २८ % इतका कर आकारला जायचा तो आता १८% पर्यंत खाली येणार आहे.

जीएसटी या करप्रणालीमुळे सतरा अप्रत्यक्ष कर (आठ केंद्र सरकारचे तर नऊ राज्यसरकारचे) बदलले जाणार आहेत. त्याचप्रमाणे केंद्र व राज्य सरकारचे मिळून २३ उपकरही बदलले जाणार आहे. विविध प्रकारची रिर्टन्स (परतावे) भरावे लागणार नाही आणि त्याप्रकारच्या करतपासणीला ही सामोरे जावे लागणार नाही.

जीएसटी हा केंद्रांच्या सीजीएसटी आणि राज्यांचा एसजीएसटी करांचा मिलाफ आहे. यापूर्वी केंद्रशासन तसेच राज्यशासन आपापल्या अधिकारकक्षेत अशा तऱ्हेचे कर आकारत असत. जीएसटी (सीजीएसटी व एसजीएसटी) हा विविध स्तरावर आकारला जाणार असून उत्पादकाने वापरात आणलेल्या मालाच्या प्रत्येक पायरीवर 'सेट ऑफ' मिळणार आहे, तो वस्तू पुरवठा करणाऱ्या शेवटच्या दुव्यापर्यंत म्हणजेच ग्राहकांपर्यंत जीएसटी पोहचवणार आहे. ज्यामुळे जीएसटी च्या साखळीमध्ये इनपुट क्रेडीट ची उपलब्धता असल्याने कराधारित कर वा करांच्या संदिग्धतेला वगळण्यात येईल. या आधीच्या पध्दतींमध्ये, उपरोक्त मुद्दा ही फार मोठी अडचण होती. ज्यामुळे उत्पादनमूल्य निष्कारण वाढत असे. उदा. एक उत्पादक १०० रु. मूल्य असलेल्या शर्टावर रु.१२ केंद्रीय उत्पादन शुल्क आकारत असे. यापुढील टप्प्यावर राज्य सरकार मूल्याधारित कराची आकारणी करे. हा कर १५% असून रु. १०० या मूळ किमतीवर न आकारता रु. ११२ या सद्यस्थितीतील किमतीवर लागू होई. अशाने करावर कर आकारले जात.

**तक्ता १**

| अनुक्रमांक | केंद्र शासन | राज्य शासन |
|---|---|---|
| १ | केंद्रीय उत्पादन शुल्क | राज्य मुल्यावर्धित कर |
| २ | अबकारी कर (वैद्यकीय आणि शौचालय बांधणीकरिता) | केंद्रीय विक्री कर |
| ३ | विशेष वस्तूंच्या उत्पादनावरील अतिरिक्त शुल्क | विलासी कर |
| ४ | वस्त्र आणि वस्त्रोद्योगावरील अतिरिक्त शुल्क | प्रवेशकर (सर्व प्रकारचा) |
| ५ | सीमाशुल्कावरील अतिरिक्त कर (सीव्हीडी) | मनोरंजन कर (स्थानिक प्रशासनाकडून असल्यास वगळला जावा) |
| ६ | सीमाशुल्कावरील विशेष अतिरिक्त कर (एसएडी) | जाहिरातींवरील |
| ७ | सेवा कर | खरेदी कर |
| ८ | वस्तू व सेवांच्या पुरवठ्यासंदर्भात असल्यास केंद्रीय अधिभार आणि उपकर | सोडत (लॉटरी), सट्टेबाजी आणि जुगार यांवरील कर |
| ९ | | वस्तू व सेवांच्या पुरवठ्यासंदर्भात असल्यास केंद्रीय अधिभार आणि उपकर |

राज्यांच्या सीमावर्ती भागात वस्तू व सेवा विषयक कर प्रणालीमध्ये सुलभता यावी म्हणून जीएसटीने आंतरराज्य व्यवहारांवरील करांची बंधने काढून टाकली आहेत. त्याच बरोबर केंद्राने एकात्मिक जीएसटी ही कल्पना राबवली आहे. जेणेकरुन आंतरराज्यीय व्यवहार करताना दुहेरी करप्रणालीवर आपोआपच मर्यादा आली. थोडक्यात दोन दोन ठिकाणी कर भरावा लागणार नाही. त्याचबरोबर, कर पुर्ततेचे ओझे हलके होणार आहे. त्यामुळे अशी अपेक्षा आहे की व्यवहारावरील खर्चामध्ये चांगलीच बचत होणार आहे. आंतरराज्यीय तपासणी नाक्यांवर जे कालहरण होते ते थांबू शकते. एका अंदाजानुसार मालवाहतुकीच्या एकूण प्रवासातील ६०% इतका वेळ या प्रक्रियेत जात असे.

जीएसटी ही चारस्तरीय कर प्रणाली आहे. त्यामध्ये ५,१२,१८ आणि २४ टक्के अशी आखणी केलेली आहे. जीवनावश्यक अशा वस्तूंवर सर्वांत कमी म्हणजे ५% इतका कर तर, विलासी वस्तूंवर सर्वाधिक म्हणजे २८% कर ठरवला गेला आहे. अप्रत्यक्ष कर महसुलामध्ये जी काही घट येऊ शकते. त्याची भरपाई म्हणून, गैरवाजवी वस्तूवर अधिक अधिभार लावण्यात आला आहे. ग्राहक किंमत निर्देशाकांच्या अखत्यारीतील सुमारे ३० ते ३५% वस्तू या करमुक्त ठेवण्यात आलेल्या आहेत. यामुळे गरजू वस्तूंच्या किंमती नियंत्रणात ठेवण्यात यश मिळणार आहे. निर्यात करावयाच्या वस्तूंचा विचार करण्यात आला असून या करिता पुरवठा केला जात आहे. त्या वस्तू शून्य टक्के दराने आकारल्या जातील. थोडक्यात जी.एस.टी आकारला जाणार नाही. केंद्राच्या तसेच राज्यांच्या महसुलावर कोणताही विपरीत परिणाम घडणार नाही, हे पाहिले जात आहे. जीएसटीच्या अखत्यारीत येणाऱ्या सुमारे ६०% वस्तूंवर १८% ते २८% कर आकारण्यात आला आहे. आणि सुमारे २०% वस्तूंवर २८%

**जीएसटी ही चारस्तरीय कर प्रणाली आहे. त्यामध्ये ५,१२,१८ आणि २४ टक्के अशी आखणी केलेली आहे. जीवनावश्यक अशा वस्तूंवर सर्वांत कमी म्हणजे ५% इतका कर तर, विलासी वस्तूंवर सर्वाधिक म्हणजे २८% कर ठरवला गेला आहे. अप्रत्यक्ष कर महसुलामध्ये जी काही घट येऊ शकते. त्याची भरपाई म्हणून, गैरवाजवी वस्तूवर अधिक अधिभार लावण्यात आला आहे.**

कर आकारला जात आहे. या वस्तू सुखवस्तू आहेत. किंवा नकारात्मक वस्तू आहेत. या वस्तूमध्ये चॉकलेट, चुइंगगम, शांपू, डिओड्रण्ट, पेंट इ. वस्तू आहेत.वीजकर, स्टँप ड्युटी, केंद्रीय उत्पादन कर आणि व्हॅट इ. कर, अंमली पदार्थ (मद्य इ.) पेट्रोलियम उत्पादने (उदा. क्रूड, नैसर्गिक वायू, पेट्रोल, डिझेल) सद्यस्थितीत जीएसटीच्या परिघाबाहेर ठेवलेल्या आहेत. त्याचबरोबर करमुक्त असणारी व्यावसायिक देवघेव किंवा वर्षाखेर २० लाखाच्या आत मात्र आंतरराज्य व्यवसायात न गुंतलेले व्यवसाय यांना जीएसटीचे रिटर्न भरावे लागणार नाही.

व्यापक प्रमाणात आढावा घेतला तर जीएसटीचा परिणाम उद्योगांमधील मोठ्या क्षेत्रात (उदा. कंझ्युमर डयुरेबल्स बांधकाम साहित्य दैनंदिन वापरातल्या ग्राहकोपयोगी वस्तू) आदीं वस्तूंच्या किंमतीवर थोडयाफार काळासाठी दिसेल. याचे कारण म्हणजे पूर्वी ज्या पद्धतीने अशा वस्तूंवर कर आकारणी केली जायची, त्याच पद्धतीने किंवा दराने आताही कर आकारणी केली जाणार आहे. ग्राहकोपयोगी वस्तूंवर याचा परिणाम राज्यानुसार बदलता दिसणार आहे. कारण पूर्वी व्हॅट दरांमध्ये तफावत होती. पूर्वी ज्या वस्तूंवर जीएसटीचे प्रमाण अधिक होते. अशा उद्योग धंद्यामध्ये (आंतरराज्य वस्तू विनिमयामुळे) त्यांना २% इतका फायदा होऊढ शकतो. ॲटोमोबाइल क्षेत्रात तुलनात्मक विचार करता करबचतीला खूपच लाभदायक बाब आहे. कारण पूर्वी ५०% इतपत असलेला कर ४३% इतका (२८% जीएसटी अधिक १५% उपकर) नीचांकी पातळीवर आला आहे. एकूण आढावा घेता ग्राहकोपयोगी वस्तू तसेच ॲटोमोबाइल क्षेत्रातील वस्तूंच्या किंमती जीएसटी नंतर कमी दरांनी मिळू शकणार आहेत.

## जीएसटीचा सुलभ व्यवसाय करण्यावर होणारा परिणाम

अप्रत्यक्ष करासंदर्भात उद्योग धंदे, व्यवसाय आदि सुलभतेने

करण्यामध्ये अप्रत्यक्ष करांच्या कोणत्या उणीवा व काठिण्य आहे यावर प्रकाश टाकण्याकरिता सीआयआय - केपीएम सिक्स (२०१४) यांनी संयुक्तपणे अभ्यास केला होता आणि त्यांच्या निदर्शेनास आले की मूल्यवर्धित करांची नोंदणा, केंद्रीय उत्पादनशुल्क नोंदणी, जकातकर नोंदणी, सेवाकर मालाची उलाढाल, करविषयक अधिकाऱ्यांशी आलेला कटू अनुभव कर परतव्याच्या वेळी होत असलेले तणाव, करपरतावा न मिळणे आदिबाबत मोठ्याप्रमाणावर त्रास होतो. यापूर्वीचे सत्ताधीश त्याचबरोबर राज्ये वेगवेगळ्या पध्दतीने करआकारणी करीत असत. त्याचा परिणाम ज्या राज्यांमध्ये अधिक करआकारणी केली जात होती. तेथे व्यवसाय करणे मुश्कील जात होते. सीमावर्ती भागात दुहेरी करआकारणीला तोंड द्यावे लागत असे. त्याची पूर्तता करणेही कठीण जाई. करआकारणीच्या संदर्भात एकवाक्यता नसल्याने सीमावर्ती भागातील उद्योगधंद्यांना निर्णय वेणे कठीण जात असे. गोंधळाची परिस्थिती आणि अनिश्चितता यांना तोंड द्यावे लागत असे.लागू पडलेल्या करांना कोणतीही स्पष्टता नसल्याने उत्पादित मालाच्या साखळीत करावर कर आकारणीसारख्या प्रसंगांना सामोरे जावे लागत होते.

जीएसटी च्या अंमलबजावणीमुळे उद्योगधंद्याना एक मंच मिळणार असून करपूर्ततेमध्ये सुटसुटीतपणा येणार आहे. आंतरराज्यीय मालवाहतूकीवरची बंधने कमी होणार आहेत. कराचे ओझे कमी होणार आहे. त्याचप्रमाणे करपरताव्याची प्रक्रियाही सुलभ होणार आहे. अजून बरेच काही सांगता येईल. या साऱ्याचा एकत्रित परिणाम म्हणून आंतरराष्ट्रीय स्तरावर घसरलेल्या भारताच्या क्रमांकामध्ये तातडीने सुधार घडून येण्याची शक्यता तर दिसतेच आणि जागतिक बँकेच्या व्यवसाय संदर्भातील अहवालामध्ये १९० देशांच्या सहभागातील आपला १३० वा क्रमांक आहे, अशी पिछाडीची प्रतिमा सहज पुसली जाऊ शकते.

व्यवसाय सुलभीकरणाच्या संदर्भात जीएसटीचे योगदान खालीलप्रमाणे सांगता येईल.

- सोपी पूर्तता- पूर्वीच्या सत्ताधीशांच्या काळात उद्योगधंद्यांना विविध प्रकारची अनेकविध करासंबंधी रिर्टन्स भरावी लागत असत. अनेक प्राधिकरणाला तोंड द्यावे लागत असे. अप्रत्यक्ष करासंदर्भातील दाखल केलेल्या रिटर्न्स संदर्भात नोकरशहांनी केलेल्या विलंबाला बळी पडावे लागत असे. जीएसटीमध्ये अप्रत्यक्ष कर समाविष्ट झाल्यामुळे व आता एकच कर आकारणी होत असल्याने व्यवसायासंबंधी कर आकारणीची पूर्तता करणे सुलभ होत आहे. यामध्ये माहिती व तंत्रज्ञानाचा अधिकाधिक उपयोग करुन घेता येईल. जीएसटी नेटवर्कच्या माध्यमातून जो मंच आयटी इन्फास्ट्रक्चरने शेअर केला आहे. त्यामुळे केंद्र तसेच राज्यांना त्यांच्या दैनंदिन कामकाजासाठी प्रभावी माध्यम मिळणार असून जीएसटी करदाते स्वतच त्यासाठी नोंदणी करु शकतात, करपरतावा मागू शकतात आणि हे सारे कधीही कोठेही कोणत्याही प्रकारच्या कर अधिकाऱ्याशी संबंध येऊ न देता सोप्या तऱ्हेने होऊ शकते. अर्थातच उत्पादकता वाढून शकते आणि उद्योगधंदे प्रभावीपणे मार्गक्रमण करु शकतात.

**यापूर्वीचे सत्ताधीश त्याचबरोबर राज्ये वेगवेगळ्या पध्दतीने करआकारणी करीत असत. त्याचा परिणाम ज्या राज्यांमध्ये अधिक करआकारणी केली जात होती. तेथे व्यवसाय करणे मुश्कील जात होते. सीमावर्ती भागात दुहेरी करआकारणीला तोंड द्यावे लागत असे. त्याची पूर्तता करणेही कठीण जाई. करआकारणीच्या संदर्भात एकवाक्यता नसल्याने सीमावर्ती भागातील उद्योगधंद्यांना निर्णय वेणे कठीण जात असे.**

- आंतरराज्यीय माल वाहतूकीचे सुलभीकरण पूर्वी आंतरराज्यीय मालवाहतूक करताना वाहतूकीच्या साधनांना अतिशय विलंब लागत असे. कारण सीमावर्ती भागातील तपासणी नाक्यावर करभरणा करावा लागत असे. जीएसटीच्या अनेकविध कर एकत्रित

केल्यामुळे, ज्यामध्ये प्रवेशकर किंवा जकातकर आदिंचा समावेश असल्यामुळे अशा प्रकारच्या करभरणेला थाराच उरला नाही. यामुळे कच्च्या मालांच्या किंमतीत घट येणार असून (पैसा व त्याचप्रमाणे वाचलेला वेळ) ग्राहकांना मालासाठी कमी किंमत द्यावी लागणार आहे. जीएसटी लागू झाल्यानंतर सीमावर्ती नाक्यावरील चेक पोस्ट (तपासणी नाके) बंद झालेले आहेत. मालवाहतूक वाहनांच्या वाहतुकीच्या वेळात घट आली असून तसे पुरावे उपलब्ध आहेत.

- सर्वांसाठी एकच इंटरफेस: जीएसटी संदर्भातील तक्रारनिवारण्यासाठी जीएसटीने करदाते आणि करअधिकारी या सर्वांसाठी एकच इंटरफेस उपलब्ध करुन दिला आहे. मालपुरवठादार, ग्राहक, करअधिकारी या सर्वांना महत्वपूर्ण माहितीसाठी एक ॲक्सेस दिला जातो. यामुळे बिलासंबंधीची माहिती सोप्या पध्दतीने तपासून पाहिली जाऊ शकते. या संदर्भातील क्रेडीट घेण्यासाठी सर्व बिलांची जुळवाजुळव आवश्यक असते आणि एकच इंटरफेस असल्यामुळे क्रेडीट घेण्याची संधी मिळते. त्याचबरोबर या साऱ्याकरिता पुरवठादार रिर्टन फाइल करुन आपला कर वेळेवर भरु शकतात.

- कराच्या ओझ्यामध्ये कमतरता:- पूर्वीच्या राजवटीप्रमाणे न करता जीएसटीने कच्च्या मालावर क्रेडीट घेण्याकरिता परवानगी दिली आहे. त्याचप्रमाणे मालउत्पादित करताना त्या अगोदरच्या पायरीवर देखील वापरलेल्या घटकांवरील क्रेडीट घेण्यास परवानगी दिल्यामुळे करावर कर हा आपोआपच नाहीसा होतो. माल उत्पादित करणारा माल उत्पादित करतानाच एकाच वेळी कर भरत असल्यामुळे कराचे ओझे आपोआपच कमी होते.

**जीएसटी नेटवर्कच्या माध्यमातून जो मंच आयटी इन्फास्ट्रक्चरने शेअर केला आहे. त्यामुळे केंद्र तसेच राज्यांना त्यांच्या दैनंदिन कामकाजासाठी प्रभावी माध्यम मिळणार असून जीएसटी करदाते स्वतच त्यासाठी नोंदणी करु शकतात, करपरतावा मागू शकतात आणि हे सारे कधीही कोठेही कोणत्याही प्रकारच्या करअधिकाऱ्याशी संबंध येऊ न देता सोप्या तऱ्हेने होऊ शकते. अर्थातच उत्पादकता वाढून शकते**

- सार्वत्रिक बाजारपेठेची उभारणी- जीएसटीच्या परिणामकारक अंमलबजावणीमुळे भारत एक स्वतंत्र बाजारपेठ म्हणून उदयाला येत आहे. यापुढे उत्पादक उद्योगपती सोयीस्कर निर्णय घेऊ शकतात आणि कच्च्या मालाचा शोध घेणे, माल उत्पादित करण्याची ठिकाणे ठरविणे, साठवणूकीची केंद्रे ठरविणे किंवा विक्रिची केंद्रे ठरविणे या प्रक्रियेत एकसंधपणा आणि मध्यवर्ती नोंदणी यामुळे व्यवसायांचा आंतरराज्यीय विस्तार करणे सोपे होणार आहे.

- निर्यातवाढीसाठी वाव पूर्वीच्या कर‍राजवटीमध्ये आपण व्दिस्तरीय करप्रणालीमुळे निर्यातीतील काही भाग कररुपी निर्यात केला आहे. यामध्ये व्यवहाराबरोबरच कररुपी पूर्तताही समाविष्ट होती. यामुळेच जागतिक बाजारपेठेत भारत स्पर्धात्मकदृष्ट्या कमकुवत ठरला आहे. जीएसटीमुळे आपण दुहेरी टॅक्सपध्दती टाळू शकतो त्याचबरोबर करांचे ओझेही कमी होईल. यामुळेच निर्यातीला चालना मिळेल न्यूझीलंड तसेच ऑस्ट्रेलिया या देशांमध्ये अशा तऱ्हेच्या गोष्टी प्रत्यक्ष घडलेल्या आहेत. उदाहरण द्यायचे झाले तर जीएसटी १९८६ साली लागू केल्यानंतर न्यूझीलंड या देशाची निर्यात २२% नी वाढलेली दिसली.

- स्त्रोतांचे वाटप होताना होणारा पक्षपात टाळणे: स्त्रोतांचे वाटप करताना राज्यांमध्ये किंवा क्षेत्रीय विभागात, व्यवसायांची अशी प्रवृत्ती असते जेथे करपूर्तता होउढ शकते अशा जागा खात्रीशीर वाटतात तुलनेने

अप्रत्यक्ष घटकांना दुय्यम दर्जा मिळतो. याप्रकारातून स्त्रोतांचे वाटप करताना विपर्यास होऊ शकतो. त्याचबरोबर पुरवठा दारांची साखळी विस्कळीत होऊ शकते आणि याचा सार्वत्रिक परिणाम व्यवसायांवर होत असतो. जीएसटी लागू झाल्यामुळे व्यवसाय करताना, कर सुलभता येत असल्यामुळे उद्योगांना मदत मिळणार आहे. उद्योग कोठेही असो, तेथे सुलभता येणार आहे. जीएसटीमध्ये, यावर भाष्य असून क्षेत्रीय आकारमान घटणार असून दरांबाबत राज्यस्तरीय पूर्तता लाभणार आहे.

- एमएसएमईच्या व्यवसाय सुधारणेची संधी : या पूर्वीच्या करराजवटीमध्ये ५ लाखांपर्यंत उलाढाल असलेले लघु व मध्यम उत्पादकांना, व्हॅट करिता नोंदणी आवश्यक होती. जर अशा उद्योगपतींची आंतरराज्य उत्पादन केंद्रे असतील तर त्यांना अनेकविध करांची पूर्तता करावी लागत असे, नियमांचे तसेच पध्दतींचे पालन, राज्यांमध्ये जेथे जेथे त्यांचा उद्योग असेल तेथे हे सोपस्कार करावे लागत असत. यामुळे कर पूर्ततेचे मोठे ओझेच वाहावे लागत होते असे नव्हते तर, कर सल्लागारांची मदत घेऊन करासंबंधातील सर्व पूर्तता कराव्या लागत असत. जीएसटीने एकसंधता, ऑनलाइन, जलद आणि पारदर्शक असे कर प्रशासन आणले आहे. यामुळे करपूर्तता कमी वेळेत, अत्यंत सोपी आणि पैशांची बचत करणारी होणार आहे. जीएसटीमुळे या उद्योगपतीना इनपुट क्रेडीट घेणे सोपे होणार आहे. त्याचा व्यवसाय अधिक स्पर्धात्मक होणार आहे.

---

**व्यवसाय सुलभीकरणासाठी जीएसटी वचनबद्ध आहे. दोन्ही उत्पादक आणि ग्राहक यांचे करांचे ओझे कमी करण्याची वचनबद्धता आहे. त्याचप्रमाणे शासनाचा करमहसूल वाढवण्यासाठीही हा प्रयत्न आहे. हा महत्वपूर्ण बदल अर्थशास्त्रातील तीन मोठ्या शक्तींना स्पर्श करतो. व्यापक स्वरुपात या तीन शक्ती म्हणजे ग्राहक, उत्पादक आणि शासन. त्याचबरोबर विविध राज्यशासने आणि केंद्रशासित प्रदेश यांच्यामध्ये सहकार्याची, सामंजस्याची, एकात्मतेची भावना वाढविण्यासाठी प्रयत्नशील आहे.**

---

## पुढील मार्गक्रमण

व्यवसाय सुलभीकरणासाठी जीएसटी वचनबद्ध आहे. दोन्ही उत्पादक आणि ग्राहक यांचे करांचे ओझे कमी करण्याची वचनबद्धता आहे. त्याचप्रमाणे शासनाचा करमहसूल वाढवण्यासाठीही हा प्रयत्न आहे.हा महत्वपूर्ण बदल अर्थशास्त्रातील तीन मोठ्या शक्तींना स्पर्श करतो. व्यापक स्वरुपात या तीन शक्ती म्हणजे ग्राहक, उत्पादक आणि शासन. त्याचबरोबर विविध राज्यशासने आणि केंद्रशासित प्रदेश यांच्यामध्ये सहकार्याची, सामंजस्याची, एकात्मतेची भावना वाढविण्यासाठी प्रयत्नशील आहे. मा. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील भारत सरकार सर्व महत्वपूर्ण घटकांना एकाच व्यासपीठावर एकत्रितपणे काम करण्यासाठी प्रवृत्त करत असल्यामुळे अभिनंदनाला पात्र आहेत आणि शाश्वत अशा करप्रणालीमध्ये विजयी होण्याचा मंत्र प्रत्येकाला देण्यात जीएसटी यशस्वी होणार आहे.

व्यवसायाच्या सुलभीकरणामध्ये जीएसटीचे सकारात्मक चांगले परिणाम दिसून येतील. यात कोणीही शंका बाळगू नये. जीएसटीचे व्यवसायामध्ये प्रत्यक्ष फायदे असे की, करप्रणाली पूर्ततेचा खर्च कमी होणे, कराचे ओझे कमी होणे आंतरराज्य मालवाहतूक सुलभ होणे असे अनेक आहेत. इतर अनेक फायदेही आहेत. यशस्वीरित्या जीएसटी लागू केल्यानंतर तो अधिकाधिक सक्षम करण्यासाठी प्रयत्न करायला हवेत. जीएसटीच्या माध्यमातून खऱ्या अर्थाने एक देश- एक कर हे सर्वांच्या मनावर बिंबविण्याच्या दृष्टीने आपण प्रयत्नशील असायला हवे. सद्यस्थितीत विविध स्तरावर करआकारणी केली जात आहे.

त्याचबरोबर अनेकविध वस्तूवर करमाफीही दिली जात आहे. यासाठी एक स्वतंत्र व्यासपीठ उभारुन एका विशिष्ट पध्दतीने सर्व संबंधित त्याचप्रमाणे उद्योगक्षेत्राकडून घेत राहणे उचित होईल व त्याचा फायदाही करुन घेता येउढ शकेल. त्याचबरोबर राज्यशासन आणि स्थानिक प्रशासनसंस्था यांनी कोणतेही अप्रत्यक्ष कर लावणे उचित ठरणार नाही. त्यांनी जीएसटीचे सकारात्मक फायदे समजून घेणे आवश्यक आहे. जीएसटीचा पाया विस्तारावयास हवा. असंघटित क्षेत्राला यामध्ये सामावून घेण्यासाठी त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी आपण सातत्याने प्रयत्न करायला हवेत आणि तसे आपले उद्दीष्ट्य असायला हवे.

सिंगापूर आणि मलेशिया या देशांमध्ये जीएसटीचा दर अनुक्रमे ७% व ६% असा आहे. भारतानेही वेगाने कार्यवाही करुन एक दर प्रणाली आणण्याचा प्रयत्न करायला हवा. असा दर जो कमीतकमी असेल त्याचबरोबर कमीतकमी वस्तूंवर सूट देणारा असेल. त्याचबरोबर हे ही महत्वाचे आहे की आपण मार्गक्रमण करत असताना नोंदणीकरणाची आणि करपरतावे भरण्यासाठी आदर्श व्यवस्था निर्माण करायला हवी. ज्यामुळे भिन्न भिन्न राज्यांमध्ये व्यवसाय करणे सोपे जाईल. या साऱ्याचा फायदा 'मेक इन इंडिया' अर्थात 'भारताच्या स्वावलंबनाच्या' या मोहिमेला पूरक ठरेल यासाठी योग्य ती पावले उचलायला हवीत. व्यवसायाचे सुलभीकरण केल्यामुळे स्पर्धात्मकता वाढीला लागून आपण जागतिक बाजारपेठेत प्रवेश करु शकू. जीएसटीचा दीर्घकालीन प्रवास आपण संपवलेला आहे. त्याची अंमलबजावणीही सुरु केली आहे. जीएसटी ही करप्रणाली अधिकाधिक उपयुक्त ठरेल या दिशेने प्रवास करायला हवा. आपली ही करप्रणाली जगातील इतर देशांच्या बरोबरीने कार्यरत असावयास हवी.

■ ■ ■

*लेखक हाशिम कॅान्फिडरेशन ऑफ 'इंडियन इंडस्ट्रीच्या ईझ ऑफ डुईंग बिझिनेस अॅन्ड ईकॉनॉमिक अफेअर्स' विभागाचे प्रमुख आहेत.*

*लेखिका वर्षा कुमारी त्याच विभागामधे sसल्लागार पदी कार्यरत आहेत.*

*Email:Danish_hashim@yahoo.com*

*Varshak.kumari44@gmail.com*




विकास समर्पित
मासिक
**योजना**
नियमित वाचा,
वर्गणीदार व्हा.

## लेखकांना आवाहन

योजना मासिकासाठी लेख पाठवितांना लेखकांनी UNICODE (Mangal) or KRUTI DEV या फॉन्ट मध्येच आपले लेख पाठवावेत,

हे नम्र आवाहन.

# वस्तू आणि सेवा कर - काही वैशिष्टये

**- रेश्मा घाणेकर**




***राज्य पातळीवर महाराष्ट्रामध्ये १९९५ मध्ये प्रथम मूल्यवर्धित कर प्रणाली आणली गेली. त्यानंतर १९९९ मध्ये परत*** *first point tax system* ***आणली गेली. सन २००० मध्ये*** *Uniform floor rate* ***ची संकल्पना राबवून राज्या राज्यांनी कर दरात समानता आणली एप्रिल २००५ पासून मूल्यवर्धित करपद्धती अंमलात आणली गेली आणि आता ही नवीन करप्रणाली देशात लागू झाली आहे.***

एक देश एक कर एक बाजारपेठ या अत्यंत महत्त्वाच्या घोशणेला भारतात एक जुलै २०१७ पासून मूर्त स्वरुप आले आहे. वस्तू व सेवा कराची या दिवसापासून अंमलबजावणी सुरु झाली आहे.

स्वातंत्र्यानंतर आपल्या देशतील करपद्धतीमध्ये अनेक सुधारणा झाल्या. या सर्व सुधारणांमधील अत्यंत मूलगामी विचार म्हणजे वस्तू व सेवा कर देशात सर्वत्र लागू करण्याचा विचार. वस्तू व सेवांचा उपयोग जेथे होतो तेथे कर मिळावा म्हणजेच Destination based consumption tax असावा व करावर कर लागू नये या तत्त्वावर आधारित हा विचार आहे.

आजपर्यंत वस्तूसाठी वेगळा, कर सेवांसाठी वेगळा कर होता त्याऐवजी आता ही एक करपद्धती आहे.

राज्य पातळीवर महाराष्ट्रामध्ये १९९५ मध्ये प्रथम मूल्यवर्धित कर प्रणाली आणली गेली. त्यानंतर १९९९ मध्ये परत first point tax system आणली गेली. सन २००० मध्ये Uniform floor rate ची संकल्पना राबवून राज्या राज्यांनी कर दरात समानता आणली एप्रिल २००५ पासून मूल्यवर्धित करपद्धती अंमलात आणली गेली आणि आता ही नवीन करप्रणाली देशात लागू झाली आहे.

हे विधेयक सर्वप्रथम लोकसभेत मांडण्यात आले आणि दिनांक ६ मे २०१५ रोजी पारीत केले. यात राज्यसभेने काही बदल सुचवले जे लोकसभेने स्वीकारले. याचे कायद्यात रुपांतर करण्याकरता आवश्यकतेपेक्षा जास्त राज्यांच्या विधीमंडळाने मान्यता दिली त्यानंतर मा. राष्ट्रपती यांनी दिनांक ८ सप्टेंबर २०१६ रोजी संमती दिल्यानंतर हा कायदा अस्तित्वात आला आहे.

कोणत्याही राष्ट्राला विकासयोजनांसाठी निधी लागतो जो महसुलाद्वारे मिळतो. हा महसूल निर्माण करण्याचे काम मुख्यत: अप्रत्यक्ष कर आणि प्रत्यक्ष कर करतात. या दोन करांपैकी अप्रत्यक्ष कर प्रणालीतील ही दूरदृष्टीची सुधारणा आहे.

तत्पूर्वी केंद्र शासन काही अप्रत्यक्ष कर लावत होते आणि राज्य शासन काही अप्रत्यक्ष कर लावत होते. उदा. केंद्रीय उत्पादन शुल्क, अतिरिक्त उत्पादन शुल्क सेवाकर, अतिरिक्त सीमाशुल्क (CVD) विशेष अतिरिक्त सेवाशुल्क (SAD) अधिभार आणि सेस तर मूल्यवर्धित कर (VAT), केंद्रीय विक्रीकर (CST), करमणूक कर, ऐषाराम कर, लॉटरी कर, ऊस खरेदी कर, प्रवेश कर, स्थानिक संस्था कर, जकात इ. कर राज्य शासनातर्फे लावले जात होते.

मात्र आता हे साधारण १७ प्रकारचे कर विलीन होऊन एकच कर सर्व देशभर लावला जात आहे.

बहुतांश अप्रत्यक्ष कर एकत्र आल्याने करप्रणाली सोपी व सुटसुटीत होईल. करांची वारंवारिता कमी झाल्याने एकंदर प्रशासकीय पूर्ततेचा वेळ कमी होणार आहे. नोंदी ठेवायचा खर्च आणि त्रास कमी झाल्याने व्यवसाय चालवण्याचा खर्च कमी होणार आणि Ease of doing business या तत्त्वाशी हे अगदी सुसंगत आहे. जाचक व भरमसाठ करांच्या तुलनेत कमी व अल्प दराच्या करातून अधिक महसूल गोळा होतो याची प्रचिती म्हणूनही जीएसटीकडे पाहिले जात आहे.

आता जकात/Check post इ. तरतुदी न राहिल्याने देशांतर्गत मालाच्या वाहतुकीत लक्षणीय सुधारणा होत आहे. मुंबईसारख्या शहराच्या बाहेर जकात बंद झाल्यानंतर दिसून येत असलेले चित्र बोलके आहे. भारतात रेल्वेपेक्षाही जास्त मालवाहतूक ट्रकने केली जाते. भारतात ट्रक वाहतुकीची कार्यक्षमता विकसित देषांच्या तुलनेत फार थोडी आहे. अमेरिकेत एका दिवसात सरासरी ८०० किमी अंतर कापले जाते. भारतात हे प्रमाण त्याच्या ३०% होते पण जकात नाके Check post इ. न राहिल्याने जीएस्टी करांतर्गत हा पल्ला प्रतिदिन ४०० किमीच्या पुढे जाईल. वाहतुकीचा खर्च कमी तर होईलच पण अधिक साठा करण्याची निकड कमी झाल्यामुळे खेळत्या भांडवलाची कार्यक्षमता मोठया प्रमाणात वाढेल. उद्योगांच्या परताव्याच्या (Returns) दरात घसघशीत वाढ होईल.

**जागतिक स्तरावर विचार केला तर एक मोठया स्तरावरची ग्राहक बाजारपेठ म्हणून भारत हा आकर्षणबिंदू ठरेल. अनेक विदेशी उद्योगांना भारतात येताना वेगवेगळया राज्यांच्या वेगवेगळया करप्रणालींबाबत धाकधूक उरणार नाही तर एक कर दर असलेली सव्वाशे कोटी भारतीयांची एकसंध बाजारपेठ अशी प्रतिमा निर्माण करण्यात आपण यशस्वी होऊ.**

सर्वसमावेशकता, एकसंधता ही या कराची प्रमुख वैशिष्टये आहेत. सर्व देशात एका वस्तूला एकच कर दर असल्याने ग्राहक व लघुउद्योजकांची केवळ शेजारच्या राज्यात कमी कर दर म्हणून तेथून माल मागवण्याची तसदी टळेल. सर्वत्र सारखा कर त्यामुळे व्यापाराला अडथळा नाही. व्यापार वाढीला अनुकूल स्थिती होईल.

राज्या राज्यात कर तफावत म्हणून टक्क्या दोन टक्क्यांचा फरक टाळण्यासाठी एकच उत्पादन अनेक राज्यातून विखुरलेल्या पद्धतीने घेणे इ. युक्त्या मोठे उद्योजक करणार नाहीत. शिवाय साठेबाजी, कृत्रिम टंचाई, आकस्मिक महागाईचा भडका यापासून ग्राहकांची सुटका होईल.

शिवाय जागतिक स्तरावर विचार केला तर एक मोठया स्तरावरची ग्राहक बाजारपेठ म्हणून भारत हा आकर्षणबिंदू ठरेल. अनेक विदेशी उद्योगांना भारतात येताना वेगवेगळया राज्यांच्या वेगवेगळया करप्रणालींबाबत धाकधूक उरणार नाही तर एक कर दर असलेली सव्वाशे कोटी भारतीयांची एकसंध बाजारपेठ अशी प्रतिमा निर्माण करण्यात आपण यशस्वी होऊ.

यापूर्वी अप्रत्यक्ष कर प्रणालीमध्ये करावर कराची आकारणी होत असे. उदाहरणार्थ ३० जून २०१७ पर्यंत उत्पादित वस्तूंवर केंद्रशासन उत्पादन शुल्काची आकारणी करत असे. या उत्पादन शुल्काला मालाच्या किंमतीचा भाग म्हणून राज्यशासन त्यावर विक्रीकराची आकारणी करत असे. यालाच करांवर कर म्हणजे Cascading of tax म्हटले जाते.

हे दोन्ही कर केंद्र व राज्यशासनाकडून पूर्वी स्वतंत्रपणे आकारले जात असल्याने एका कराची वजावट दुसरा कर भरताना

मिळत नसे. मात्र आता वस्तू व सेवा कर लागू झाल्यावर इनपुट टॅक्स केडिट मालाच्या तसेच सेवांच्या प्रत्येक पातळीवर घेण्याची सोय उपलब्ध आहे.

त्याचप्रमाणे पूर्वी आंतरराज्यीय माल विक्रीवर २% केंद्रीय विक्रीकर लावला जायचा. परंतु ज्या राज्यांमध्ये वस्तूंची खरेदी झाली आहे त्या राज्यामध्ये आकारण्यात आलेल्या केंद्रीय विक्रीकराची वजावट मिळत नव्हती. कराची वजावट मिळत नसल्याने कराचा भाग मूळ किंमतीत येऊन किंमत वाढायची. शिवाय अप्रत्यक्ष कराची साखळी तुटायची. मात्र हा प्रश्न वस्तू व सेवा करप्रणालीत सोडवला आहे. या करप्रणालीत आयजीएसटी कराची आकारणी केंद्र शासनामार्फत

**पूर्वी आंतरराज्यीय माल विक्रीवर २% केंद्रीय विक्रीकर लावला जायचा. परंतु ज्या राज्यांमध्ये वस्तूंची खरेदी झाली आहे त्या राज्यामध्ये आकारण्यात आलेल्या केंद्रीय विक्रीकराची वजावट मिळत नव्हती. कराची वजावट मिळत नसल्याने कराचा भाग मूळ किंमतीत येऊन किंमत वाढायची. शिवाय अप्रत्यक्ष कराची साखळी तुटायची. मात्र हा प्रश्न वस्तू व सेवा करप्रणालीत सोडवला आहे.**

आंतरराज्य पुरवठा करणाऱ्या व्यापाऱ्यांवर करण्यात येईल. मात्र आकारणी झालेल्या कराची पूर्ण वजावट मिळणार असल्याने आंतरराज्य विक्री व्यवहारांवर कराचा बोजा शून्य होईल. तसेच पूर्वी आयातीवर आकारले जाणारे सीव्हीडी (CVD) आणि एसएडी (SAD) हे कर आता लागणार नाहीत. खरेदीवरील कराची पूर्ण वजावट मिळाल्यामुळे वस्तूच्या विक्रीवरील कराचा भार कमी होईल. याचा परिणाम वस्तूच्या व सेवेच्या किंमतीवर होऊन किंमत कमी होईल.

वस्तू व सेवा करामुळे संपूर्ण देशात अप्रत्यक्ष कराची एकच पद्धत अंमलात येईल. निर्यातदाराला त्याने निर्यातीसाठी वापरलेल्या सर्व खरेदीमालावर दिलेल्या कराचा परतावा मिळणार असल्याने तसेच निर्यातीवर कुठलीही कर आकारणी होणार नसल्याने (Zero rating of


## Subscription Coupon

**[For New Membership / Renewal / Change of Address]**

I want to subscribe to :
**Yojana** : 1 Yr. **Rs. 230/-;** 2 Yrs. **Rs. 430/-;** 3 Yrs. **Rs. 610/-**
(Circle the period of subscription)

DD / MO No. ____________________ date ____________

Name (in block letters) : ____________________

Subscriber profile : Student / Academician / Institution / Others

Address : ____________________

Phone No. / email : ____________________

PIN : ☐☐☐☐☐☐

Please allow us 4 to 6 weeks to the despatch of the first issue.

P.S. : For Renewal / change in address, please quote your subscription number.

**सभासद शुल्क मनी ऑर्डर किंवा डिमांड ड्राफटद्वारे पाठवावे,**
**अथवा** www.bharatkosh.gov.in/product **येथे ऑनलाईन भरावे.**

export) आंतरराष्ट्रीय पातळीवर त्याला आपल्या मालाची किंमत स्पर्धात्मक ठेवता येईल. त्यामुळे निर्यातीला चालना मिळेल आणि त्याचा राष्ट्रीय विकासावर अनुकूल परिणाम होईल.

मोठया कंपन्यांना छोटया व्यवसायांशी स्पर्धा करताना पूर्वी एक गोष्ट सतावायची. सगळे कर भरत नसल्यामुळे छोटे उद्योग कमी किंमतीत माल देऊ शकायचे .मात्र आता असे कर चुकवता येणार नाहीत. पुरवठा करणाऱ्या पूर्ण साखळीलाच कर आकारणे आणि इनपुट केडिट घेणे फायद्याचे ठरणार असल्यामुळे आगामी काळात छोटे व मध्यम उद्योगही कर भरण्यासाठी प्रवृत्त होतील. यामध्ये जास्तीत जास्त उलाढाल वैध मार्गाने केल्यामुळे छोटया व्यवसायांचे ताळेबंद अधिक पारदर्शक होतील. त्यामुळे आज

**मोठया कंपन्यांना छोटया व्यवसायांशी स्पर्धा करताना पूर्वी एक गोष्ट सतावायची. सगळे कर भरत नसल्यामुळे छोटे उद्योग कमी किंमतीत माल देऊ शकायचे. मात्र आता असे कर चुकवता येणार नाहीत. पुरवठा करणाऱ्या पूर्ण साखळीलाच कर आकारणे आणि इनपुट केडिट घेणे फायद्याचे ठरणार असल्यामुळे आगामी काळात छोटे व मध्यम उद्योगही कर भरण्यासाठी प्रवृत्त होतील.**

ज्या उद्योगांना बँकांकडून कमी दराने अधिकृत पतपुरवठा मिळत नाही असे अनेक छोटे उद्योग यासाठी पात्र ठरतील. पतपुरवठा झाल्याने त्यांच्या उद्योगांच्या वाढीला मोठीच चालना मिळेल.

करचुकवेगिरी अत्यंत कमी झाल्याने देशाची अर्थव्यवस्था मजबूत होईल.

प्रशासकीय पातळीवरही ऑनलाईन पद्धतीने काम केल्याने कागदपत्रांची हाताळणी कमी होईल. ऑनलाईन मेळजुळणी करता येणार असल्याने व्यवसायात अधिकाधिक पारदर्शकपणा येणार आहे. माहिती आणि तंत्रज्ञानाचा अधिकाधिक वापर केल्यामुळे व्यापारी/उद्योजक यांना पाठपुरावा करावा न लागता काम सुलभरित्या पूर्ण होईल.


Yojana : Published in Hindi, English, Urdu, Tamil, Telugu, Malayalam, Kannada, Gujarati, Marathi, Punjabi, Bengali, Assamese & Oriya

Send your subscription by DD / MO in the name of Director, Publications Division, addresses to :

**Advertisement & Criculation Manager, Publications Division, Ministry of Information & Broadcasting Room No. 48 to 53, Soochna Bhavan, CGO Complex, Lodhi Road, New Delhi - 110003.**

**Subscriptions will arise also be accepted at our sales emporia:**

● Hall No.196, Old Secretariat, **Delhi-110054,** Ph.011-2389 0205 ● A-wing, Rajaji Bhavan, Besant Nagar, **Chennai-600090,** Ph.: 044-2491 7673 ● 8, Esplande East, **Kolkata - 700069,** Ph: 033-2248 8030 ● Bihar State Co-operative Bank Building, Ashoka Rajpath, Patna-800004. Ph.: 0612-268 3407 ● Press Road, Near Govt., Press **Thiruvananthapuram-695001,** Ph.: 0471-2330 650 ● Hall No. 1, 2nd floor, Kendriya Bhawan, Sector - H, Aliganj, **Lucknow-226024,** Ph.: 0522-232 5455 ● 701, C-Wing, 7th Floor, Kendriya Sadan, C.B.D. Belapur, **Navi Mumbai-400614,** Ph.: 022-2756 6582 ● Block 4, 1st Floor, Gruhakalpa Complex, M.G. Road, Nampally, **Hyderabad - 500001.** Ph.: 040-2460 5383 ● 1st Floor, F-Wing, Kendriya Sadan, Koramangala **Bangalore-560034.** Ph.: 080-2553 7244 ● KKB Road, New Colony, House No.7, Chenikuthi, Guwahati-781003, Ph.: 0361-2665 090 ● Ambica Complex, 1st Floor, Paldi, **Ahmedabad - 380007.** Ph.: 079-2658 8669.

**For Yojana Tamil, Telugu, Malayalam, Kannada, Gujarati, Marathi, Bengali, Assamese, Oriya, Urdu and English, Hindi - please enrol yourself with Editors of the respective at the addressess given Below;**

Editor, Yojana (Marathi), B-701, Kendriaya Sadan, C.B.D. Belapur, Navi Mumbai-400614. Ph.: 022-2756 6582
Editor, Yojana (Gujarati), Ambika Complex, 1st Floor, Paldi, Ahemdabad-380007. Ph.: 079-2658 8669
Editor, Yojana (Assamese), KKB Road, New Colony, House No. 7, Chenikuthi, Guwahati-781003. Ph.: 0361-266 5090
Editor, Yojana (Bengali), 8, Esplanade East, Ground Floor, Kolkata-700069. Ph.: 033-2248 2576
Editor, Yojana (Tamil), 'A' Wing, Rajaji Bhawan, Basant Nagar, Chennai-600090. Ph: 044-2491 7673
Editor, Yoajna (Telugu), Block No. 4, 1st Flr., Gruhakalpa Complex, M.G.Rd, Nampally, Hyderabad-500001. Ph.:040-2460 5383
Editor, Yojana (Malayalam), Press Road, Near Govt. Press, Thiruvananthapuram-695001, Ph: 0471-233 0650
Editor, Yojana (Kannada), 1st Floor, 'F' Wing, Kendriya Sadan, Koramangala, Bangalore-560034, Ph: 080-2553 7244.

नोंदणी ऑनलाईन दिली जाईल आणि कर प्रशासनाकडून तीन कामकाजाच्या दिवसात अर्जदारास अर्जातील कमतरता कळवली नाही तर अर्ज योग्य आहे असे समजून नोंदणी आपोआप दिली जाईल. यामुळे प्रशासन आणि कामकाज अधिक गतिमान होईल.

करदाता स्वत: ची निर्धारणा स्वत: करून देयकर शासनाच्या खात्यावर जमा करेल यामुळे प्रक्रिया सुलभ होईल. कर प्राधिकाऱ्याशी कोणताही प्रत्यक्ष संवाद न साधता करदाता केलेल्या पुरवठयाचा (Outward supply) तपशील देवू शकेल. करदात्याकडे आलेल्या पुरवठयाचा (Inward supply) तपशील संबंधित पुरवठादाराकडून दाखल करण्यात आलेल्या माहितीद्वारे तयार केला जाईल.

विवरणाद्वारा इलेक्ट्रॉनिक माध्यमातून दाखल करेल. आपसमेळाखालील (Composition) त्रैमासिक विवरणे ही इलेक्ट्रॉनिक माध्यमातून दाखल करेल. करदात्यास चुकून राहिलेला/अयोग्य तपशील स्वत: दुरुस्त करता येईल. करदात्यास लेखापुस्तके आणि इतर नोंदी इलेक्ट्रॉनिक माध्यमातून ठेवण्याची आणि जतन करण्याची परवानगी राहील.

जीएसटी मधील दरासोबतच सर्व महत्त्वपूर्ण विषयांवर निर्णय घेण्याचा पूर्ण अधिकार जीएसटी परिषदेला दिला आहे त्यातील एक प्रमुख निर्णय म्हणजे सर्व वस्तूंवर ०%, ३%, ५%, १२/१८ तसेच २८% यापैकी एक दर लागेल.

होती तर जीएसटी मध्ये विशेष श्रेणीतील पर्वतीय राज्ये सोडली तर बाकी राज्यातही मर्यादा २० लाख केली आहे.

### जीएसटी कार्यक्षेत्राबाहेरील वस्तू

जीएसटी करप्रणालीत सर्व वस्तू आणि सेवांवर कर लावण्याचे प्रयोजन आहे मात्र मद्याचा समावेश यात केलेला नाही. तसेच कच्चे तेल (Petroleum Crude), डिझेल, पेट्रोल, नॅचरल गॅस, विमानाचे इंधन यांचा जीएसटीमध्ये अंतर्भाव करण्यात आलेला नाही. व्यवसाय कर, मुद्रांक शुल्क मालमत्ता कर यासारखे कर हे प्रत्यक्ष कर असून ते जीएसटी आल्यावरही चालू राहणार आहेत.

**कर दर संरचना**

| प्रकार | कराचा दर | वस्तू व सेवा प्रकार |
|---|---|---|
| शून्याधारित | 0% | जीवानवश्यक वस्तू (अन्नधान्यासह) |
| निम्नदर | ५% | सर्वसाधारणपणे वापरात असणाऱ्या वस्तू व सेवा |
| दोन प्रमाण दर | १२%<br>१८% | ग्राहकोपयोगी वस्तू व सेवा (मोठ्या प्रमाणात समावेश) |
| उच्चतम दर | २८% | लक्झरी मोटार, तंबाखू उत्पादने व शीतपेये |
| अतिरिक्त सेस | – | लक्झरी मोटार, तंबाखू उत्पादने, शीतपेये व इतर |

करदाता जावक पुरवठयाचा (Outward supply) तपशील, आवक पुरवठयांचे इनपुट क्रेडिट, भरलेला कर इ. माहिती मासिक

जीएसटी करप्रणालीत सर्वात मोठा फायदा हा लहान व्यापाऱ्यांना दिला गेला आहे. व्हॅटप्रणालीमध्ये १० लाख ही उलाढालीची मर्यादा

जीएसटीमध्ये ज्या राज्यामध्ये वस्तू किंवा सेवा यांचा उपभोग घेतला जाईल तेथे कर जमा होईल. वस्तू व सेवेच्या प्रत्येक पुरवठा व्यवहारांवर

(करमाफ वस्तू व सेवा व्यतिरिक्त) दोन कर लावण्यात येतील. एक कर केंद्र शासनामार्फत लावण्यात येईल व त्यास केंद्रीय वस्तू व सेवा कर (GST) असे नामकरण असेल व दुसरा कर राज्यशासनामार्फत लावण्यात येईल व त्यास राज्य वस्तू व सेवा कर असे म्हणण्यात येईल. आंतरराज्य वस्तू व सेवांच्या पुरवठयावर तसेच आयातीवर सुद्धा केंद्र शासनामार्फत एकात्मिक वस्तू व सेवा कर लावण्यात येईल.

भारतात अप्रत्यक्ष कर कायद्यानुसार साधारणत: ८३, ५०, ४९९ करदाते आहेत यापैकी ८,०३,२६१ करदाते एकटया महाराष्ट्रात आहेत. भारताच्या एकंदर लोकसंख्येपैकी साधारणत: १०% लोक महाराष्ट्रात राहतात. त्याचप्रमाणे भारताच्या करदात्यांच्या संख्येच्या १०% करदाते हे महाराष्ट्रात आहेत. आज अंदाजे २.५ लाख कोटी रुपये महाराष्ट्राचे उत्पन्न आहे. हे उत्पन्न नवीन कायद्यामुळे दुप्पट होईल असा अंदाज आहे.




महाराष्ट्रात सेवा क्षेत्रातील उद्योगांचा पुष्कळ विस्तार आहे पूर्वी सेवा क्षेत्रावरील कर हा केंद्र सरकार लावत असे. मात्र आता वस्तू व सेवा कर पद्धतीमध्ये सेवा क्षेत्र हे महाराष्ट्राला कर महसूल देण्यात अग्रभागी राहील.

**भारतातील एकूण करांचे राष्ट्रीय उत्पन्नाच्या तुलनेत फक्त १६% इतके कमी संकलन आहे. नवीन बदल स्थिरावल्यावर हे २०% इतके वर जाणे अपेक्षित आहे. राष्ट्रीय उत्पन्नात १.५ ते २% वाढ संभवते. वाढीचा दर ७% वरून ८.५% च्या वर नेण्याची क्षमता या बदलात आहे. कर संकलनाचे प्रमाण वाढल्यामुळे केंद्र सरकार आणि मुख्य म्हणजे राज्य सरकारांची वित्तीय तूट कमी होईल.**

भारतातील एकूण करांचे राष्ट्रीय उत्पन्नाच्या तुलनेत फक्त १६% इतके कमी संकलन आहे. नवीन बदल स्थिरावल्यावर हे २०% इतके वर जाणे अपेक्षित आहे. राष्ट्रीय उत्पन्नात १.५ ते २% वाढ संभवते. वाढीचा दर ७% वरून ८.५% च्या वर नेण्याची क्षमता या बदलात आहे. कर संकलनाचे प्रमाण वाढल्यामुळे केंद्र सरकार आणि मुख्य म्हणजे राज्य सरकारांची वित्तीय तूट कमी होईल. यामुळे विकासकामांसाठी अधिक तरतूद करणे शक्य होईल. विदेशी गुंतवणुकीला प्रोत्साहन तसेच मेक इन इंडिया मोहिमेला चालना यातून मिळेल.

थोडक्यात ग्राहकाला या करप्रणालीमुळे बहुसंख्य वस्तू व सेवा स्वस्त मिळतील कारण पूर्वीच्या अनेक करांच्या एकत्रित दरापेक्षा आत्ताचा एकच कर हा बहुतांश कमी आहे.

कर पद्धतीचे पालन सोपे होणार आहे कारण जीएसटी मध्ये अनेक कर विलीन झाले आहेत. त्यामुळे व्यावसायिकाला त्याचा लाभ होणार आहे.

सरकारचे करप्रशासन सोपे होणार आहे. कारण करचुकवेगिरी करणे व्यावसायिकाला अवघड जाणार आहे. त्याचप्रमाणे ऑनलाईन मेळजुळणीमुळे व्यवसायांचा आढावा सोपा होईल. करचुकवेगिरी अवघड झाल्याने कराचा भरणा व करदाते यात दोन्हीही वाढ होणार आहे.

ग्राहक, उद्योजक, सरकार असा सर्वांना लाभदायी होणारा वस्तू व सेवा कर भारताच्या विकासात मोलाची भूमिका बजावेल.

■ ■ ■

*लेखिका पुणे येथे राज्यकर उपायुक्त, आहेत.*

*Email: rbgonline@gmail.com*

# तंत्रज्ञान आणि वस्तू सेवा करप्रणाली

- प्रकाश कुमार




**संपूर्ण देशाला या करद्वारे एका बाजारपेठेखाली आणण्यात येत असून त्यामुळे देशाच्या अर्थव्यवस्थेला नवसामर्थ्य प्राप्त होईल, असा विश्वास सरकारतर्फे व्यक्त करण्यात आला आहे. बाहेरील जगासाठी आपल्या देशाची अर्थव्यवस्था खुली करून देण्याच्या घटनेला २६ वर्षे पूर्ण झाल्यानंतर भारताने ही आणखी एक महत्त्वपूर्ण आर्थिक सुधारणा केली आहे. यामुळे उदारीकरणाचे लाभ तसेच पुढे चालू राहून ते आणखी दृढ होण्यास मदत होणार आहे.**

सुधारणेबाबत १जुलै, २०१७ हा दिवस आतिशय क्रांतिकारी ठरला, कारण या दिवशी वस्तू आणि सेवा कर (जी एस टी) देशात लागू करण्यात आला. संपूर्ण देशाला या करद्वारे एका बाजारपेठेखाली आणण्यात येत असून त्यामुळे देशाच्या अर्थव्यवस्थेला नवसामर्थ्य प्राप्त होईल, असा विश्वास सरकारतर्फे व्यक्त करण्यात आला आहे. बाहेरील जगासाठी आपल्या देशाची अर्थव्यवस्था खुली करून देण्याच्या घटनेला २६ वर्षे पूर्ण झाल्यानंतर भारताने ही आणखी एक महत्त्वपूर्ण आर्थिक सुधारणा केली आहे.यामुळे उदारीकरणाचे लाभ तसेच पुढे चालू राहून ते आणखी दृढ होण्यास मदत होणार आहे.

नव्या वस्तू आणि सेवा करात, केंद्र आणि राज्य सरकारचे १७ कर आणि इतर २२प्रकारचे उपकर एकाच करामध्ये अंतर्भूत करण्यात आले आहेत. बहुविध करांमुळे होणारी गुंतागुंत, करांचा वर्षाव आता नाहीसा होणार आहे आणि त्यामुळे प्रत्यक्ष करपद्धती मध्ये अत्यंत सोपेपणा आणि सुबोधता येणार आहे.३४ राज्यांच्या मूल्यवर्धित करामध्ये(VATs),९७ विविध प्रकारची विवरणपत्रे होती.त्याच्या समर्थनार्थ ३१७ प्रकारची जोडपत्रे आणि २८घोषणापत्रे जोडावी लागत होती. त्याचप्रमाणे केंद्रीय अबकारी करासोबत १३ विवरणपत्रे आणि त्याच्या समर्थनासाठी एक घोषणापत्र जोडावे लागत होते.यासाठी वापरण्यात येणारी चलनेसुद्धा १२ प्रकारची होती.आता नव्या करपद्धती मध्ये हे सगळे बदलण्यात आले असून संपूर्ण देशात सगळीकडे एकच पद्धत अवलंबण्यात येत आहे.यामध्ये आता १२ अर्ज आणि एक चलन भरावे लागणार आहे.जी एस टी मुळे कर भरणे आणि विवरणपत्रे भरणे,सोपे आणि सोयीस्कर तर झाले आहेच. पण एखादयाला जर नवीन व्यवसाय सुरु करायचा असेल तर त्याची मंजुरी मिळवण्यासाठी लागणाऱ्या अनेक बाबींचे ओझे कमी होण्याची आणि या प्रक्रियेत मूलगामी सुधारणा घडून येणार असल्याची हमीही यामध्ये देण्यात आली आहे. जेणेकरून त्या

व्यक्तीला नवीन व्यवसाय सहजपणे सुरु करता येईल.

वस्तू आणि सेवा करामुळे माहिती संग्रहित करण्याची आणि त्यावर प्रक्रिया करण्याची मोठी यंत्रणा विकसित करण्यात आली आहे. त्यामध्ये असलेली इनपुट टॅक्स क्रेडीट पद्धत महत्त्वपूर्ण आहे. सुमारे ८० लाख करदात्यांनी, त्यांची मासिक विवरणपत्रे भरली की दहा दिवसांच्या आत त्याच्यावर प्रक्रिया केली जाणार असून त्यामध्ये एका व्यवसायातून दुसऱ्या व्यवसायासाठी उपयुक्त अशी २.६ ते ३.० अब्ज इनव्हॉइस(चलन)च्या माहितीचा समावेश असणे अपेक्षित आहे. हे सगळे अचाट काम माहिती तंत्रज्ञानाच्या पायाभूत सुविधांशिवाय होणे अशक्य होते. म्हणूनच माहिती तंत्रज्ञानाच्या भक्कम आधाराशिवाय वस्तू आणि सेवा कराचा विचार करणे अपूर्ण आहे,असे म्हणणे अयोग्य ठरणार नाही. माहिती तंत्रज्ञान हा जी एस टीचा कणा आहे.

माहिती तंत्रज्ञानाचा हा आधारस्तंभ वस्तू आणि सेवा करपद्धतीच्या रुपात अस्तित्वात आला. जी एस टी पोर्टल आणि माहिती तंत्रज्ञानाचा भक्कम पाया यांच्या आधारावर जी एस टी ची ही इमारत उभी आहे.या अशा अतिशय प्रगत तांत्रिक पायाभूत सुविधांमुळेच ही नवी करपद्धती वेळेवर सुरु करणे शक्य झाले आहे. वस्तू आणि सेवा करप्रणालीने,जी एस टी पोर्टल यशस्वीपणे विकसित केले.त्यामुळे अप्रत्यक्ष कर पद्धतीमध्ये समावेश असलेल्या सर्व व्यावसायिकांना, करदात्यांना आणि इतर भागधारकांना कराबाबतच्या सर्व सुविधा एकाच थांब्यावर मिळण्याची सुविधा उपलब्ध झाली. हा लेख लिहिला जात असतानाच सध्या अस्तित्वात असलेले सुमारे ६९ लाख करदाते जी एस टी एन पोर्टलवर नाव नोंदणी करून नव्या वस्तू आणि सेवा करपद्धतीमध्ये अगोदरच दाखल झाले आहेत. २५जून,२०१७ रोजी पोर्टलवर नव्या व्यवसायासाठी नव्याने नोंदणी करण्याची सुविधाही सुरु करण्यात आली आहे. याचबरोबर यावेळी प्रथमच कर पद्धतीचीही (टॅक्स मॅट्रिक्स) नोंद केली जाईल.सुमारे पाच लाखांपेक्षा जास्त जणांनी नव्या नोंदणीसाठी अर्ज केले आहेत. त्यापैकी तीन लाखाहून अधिक जणांच्या नोंदणीला मंजुरीही देण्यात आली आहे.

**सध्या अस्तित्वात असलेले सुमारे ६९ लाख करदाते जी एस टी एन पोर्टलवर नाव नोंदणी करून नव्या वस्तू आणि सेवा करपद्धतीमध्ये अगोदरच दाखल झाले आहेत. २५जून,२०१७ रोजी पोर्टलवर नव्या व्यवसायासाठी नव्याने नोंदणी करण्याची सुविधाही सुरु करण्यात आली आहे. याचबरोबर यावेळी प्रथमच कर पद्धतीचीही (टॅक्स मॅट्रिक्स) नोंद केली जाईल. सुमारे पाच लाखांपेक्षा जास्त जणांनी नव्या नोंदणीसाठी अर्ज केले आहेत.**

**वस्तू आणि सेवा कर प्रणाली (जी एस टी एन) : वस्तू आणि सेवा कर कायद्याचा माहिती तंत्रज्ञान विषयक आधारस्तंभ**

वस्तू आणि सेवा कर प्रणाली (जी एस टी एन) हा वस्तू आणि सेवा कर कायद्याचा माहिती तंत्रज्ञान विषयक आधारस्तंभ असेल, असा विचार करूनच त्याचे नियोजन करण्यात आले.जी एस टी एन ही एक संस्था असेल आणि नव्या पद्धतीसाठी ती माहिती तंत्रज्ञानाच्या पायाभूत सुविधा उपलब्ध करून देईल.करदात्यांना सध्या अस्तित्वात असलेल्या बहुविध पद्धतीकडून एकाच करपद्धतीकडे संक्रमण करणे सोपे जाईल, असा उद्देश यामागे होता. या विशेष कारणासाठी केंद्र आणि राज्य सरकारांनी एकत्र येऊन वस्तू आणि सेवा करप्रणाली या अशासकीय आणि ना-नफा तत्वावर चालणाऱ्या कंपनीची निर्मिती केली. यामध्ये केंद्राचा २४.५ टक्के हिस्सा आहे तर सर्व राज्यांचा एकत्रितपणे २४.५ टक्के हिस्सा असेल. उरलेला सर्व हिस्सा पाच खाजगी आर्थिक संस्थांचा राहील. या रचनेमुळे खाजगी क्षेत्रात तर लवचिकता येईलच.पण त्याचबरोबर सरकारचे यावर धोरणात्मक नियंत्रण राहील,अशीही तरतूद करण्यात आली.

प्रशासनाच्या विविध पातळ्यांवर कार्यरत असणाऱ्या अनेक प्रकारच्या करपद्धतींना अचूकपणे एका

छत्राखाली आणण्याचे काम हे काही लहानसहान काम नव्हे. वस्तू आणि सेवा कर पद्धती प्रकल्प हा अद्वितीय आणि गुंतागुंतीचा माहिती तंत्रज्ञानविषयक उपक्रम आहे. देशात पहिल्यांदाच करदात्यासाठी एकाच प्रकारचा,समान आणि त्यातील माहितीची केंद्र आणि राज्यांमध्ये देवाणघेवाण करता येणारा, असा हा माहिती तंत्रज्ञानविषयक विलक्षण असा प्रकल्प आहे.परिपक्वतेच्या विविध पातळ्यांवर काम करणाऱ्या ३६ वेगवेगळ्या पद्धतींना एकत्र आणणे हे अतिशय जटिल काम आहे. याशिवाय वस्तू आणि सेवा कर हा अंतिम स्थानावर आधारित असा कर असल्याने आंतरराज्य वस्तू आणि सेवा व्यापार(आय जी एस टी) होण्यासाठी केंद्र आणि राज्यांमध्ये मजबूत अशी समझोता यंत्रणा असणे आवश्यक आहे.या सर्व बाबी लक्षात घेता यासाठी खंबीर अशी माहिती तंत्रज्ञान सुविधा असणे आणि तिने करदाते,केंद्र आणि राज्य सरकारे,लेखा कार्यालये,बँका आणि भारतीय रिझर्व्ह बँक अशा सर्व प्रकारच्या भागधारकांमध्ये माहिती मिळवणे,तिच्यावर प्रक्रिया करणे आणि तिची परस्परांना देवाणघेवाण करणे यासाठी लागणाऱ्या सेवा-सुविधा पुरवणे याशिवाय हे शक्य होणार नाही,हे आपल्या लक्षात येते.

वस्तू आणि सेवा करप्रणाली यासाठीच गेली काही वर्षे अविरतपणे काम करत आहे. कराविषयीचे नियोजन,धोरण,अंमलबजावणी आणि सर्वांसाठी समान जी एस टी पोर्टल विकसित करणे असे सर्व प्रकारचे काम ही करप्रणाली करते.एकूणच वस्तू आणि सेवा कराची माहिती तंत्रज्ञानविषयक व्यवस्था म्हणून ती काम करते.यासाठी लागणारे उपयोजन सॉफ्टवेअर विकसित करण्यासाठी इन्फोसिस ही कंपनी पुढील पाच वर्षांसाठी व्यवस्थापित सेवा पुरवठादार(एम एस पी)आणि भागीदार म्हणून जी एस टी एन बरोबर काम करत आहे.

**देशातील कोणत्याही भागातील सर्व करदात्यांसाठी जीएसटी पोर्टल ही समान आणि एकमेव यंत्रणा आहे. क्वचित एखादया प्रकरणात करदात्याच्या व्यवहाराची छाननी किंवा लेखापरीक्षण चालू असेल तर मात्र,त्या करदात्याला संबंधित कर अधिकाऱ्याच्या चौकशीला सामोरे जावे लागेल. उर्वरित सर्व प्रकरणांमध्ये,जी सुमारे ९५% आहेत,त्यामध्ये सर्व करदात्यांना जी एस टी पोर्टल हे एकच माध्यम वापरायला उपलब्ध असेल**

देशातील कोणत्याही भागातील सर्व करदात्यांसाठी जीएसटी पोर्टल ही समान आणि एकमेव यंत्रणा आहे.क्वचित एखादया प्रकरणात करदात्याच्या व्यवहाराची छाननी किंवा लेखापरीक्षण चालू असेल तर मात्र,त्या करदात्याला संबंधित कर अधिकाऱ्याच्या चौकशीला सामोरे जावे लागेल. उर्वरित सर्व प्रकरणांमध्ये, जी सुमारे ९५% आहेत,त्यामध्ये सर्व करदात्यांनाजी एस टी पोर्टल हे एकच माध्यम वापरायला उपलब्ध असेल.

### जी एस टी एन कसे काम करते

अप्रत्यक्ष कर भरणाऱ्या सर्व भागधारकांना सर्व प्रकारच्या सेवा-सुविधा एकाच ठिकाणी अथवा एकाच थांब्यावर मिळतील या दृष्टिकोनातूनच वस्तू आणि सेवा करप्रणालीची रचना करण्यात आली आहे. यामध्ये नोंदणी, नियुक्त केलेल्या बँकांमध्ये देयके भरण्यासाठी चलन निर्मिती, एका व्यवसायाची चलनविषयक माहिती दुसऱ्या व्यवसायाला देण्यासाठी ती अपलोड करणे आणि विवरणपत्रांची निर्मिती करणे, अशा सर्व प्रकारच्या समान सेवा या प्रणालीद्वारे पुरविण्याची सोय यामध्ये करण्यात आली आहे. याशिवाय २७ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांना, मूल्यांकन, आव्हान (अपील), सक्तवसुली यांसारख्या बाबींचे नमुने (मोड्यूल्स) पुरवावेत अशा सूचना या प्रणालीला देण्यात आल्या आहेत. वस्तू आणि सेवा करप्रणालीद्वारे ८ नोव्हेंबर,२०१६ला ऑनलाईन नोंदणी अर्जाचा नमुना प्रकाशित करण्यात आला.यामुळे ज्या करदात्यांनी मूल्यवर्धित कर (व्हॅट), सेवा कर,केंद्रीय अबकारी कर आणि इतर करांसाठी ऑनलाइन नोंदणी केलेली आहे त्यांचा अंतर्भाव वस्तू आणि सेवा करामध्ये करण्यात आला

आहे. सर्वांसाठी समान असे पोर्टल तेव्हापासून कार्यरत झाले आणि सर्व करदात्यांना एक समान व्यासपीठ उपलब्ध झाले.आलेल्या अर्जांची तपासणी करताना त्यांनी दिलेली माहिती इतर संस्थांच्या कडून प्रमाणित केली जाते.त्याची वैधता तपासली जाते.उदाहरणार्थ – पॅन (PAN) ची वैधता केंद्रीय प्रत्यक्ष कर नियंत्रण मंडळा (CBDT) कडून,आधारची भारतीय विशेष ओळख प्राधिकरणा (UIDAI) कडून,तर कॉर्पोरेट कामकाज मंत्रालयाकडून थेट ओळख क्रमांक(DIN) आणि कॉर्पोरेट ओळख क्रमांक (CIN) प्रमाणित केली जाते.

याशिवाय सर्व प्रकारच्या करांसाठी एकच चलन भरण्याची सोय जी एस टी पोर्टलवर करून देण्यात आली आहे, त्यानुसार आता कर भरता येतो.वस्तू आणि सेवा कर प्रणालीद्वारे एकदा का चलन काढण्यात आले की करदात्याचे नाव,विविध करांच्या अंतर्गत किती रक्कम भरायची त्याची माहिती उपलब्ध होते आणि करदात्यापुढे कर भरण्यासाठी दोन पर्याय उपलब्ध करून दिले जातात. एक म्हणजे तो, २५ अधिकृत बँकांपैकी एका बँकेची नेट बँकिंग सुविधा वापरू शकतो किंवा दुसरा पर्याय म्हणजे करदाता चलनाची छापील प्रत घेऊन अधिकृत बँकेत काउंटरवर जाऊन पैसे भरू शकतो. अशा प्रकारे करदाता दर महिन्याला १०,०००/- रुपयांपर्यन्तचा कर भरू शकतो.किंवा करदाता जी एस टी पोर्टलवर चलन काढून देशात कार्यरत असलेल्या कोणत्याही बँकेत जाऊन राष्ट्रीय इलेक्ट्रॉनिक निधी हस्तांतरण (NEFT) किंवा रियल टाइम ग्रॉस सेटलमेंट(RTGS) द्वारा कर भरू शकतो.बँकांकडून आलेल्या कर भरणा विषयक माहितीच्या आधारे दिवस अखेर जी एस टी पोर्टल,सारांश बनवते आणि संबंधित अधिकाऱ्यांकडे ताळमेळ राखण्यासाठी पाठवते. लेखा अधिकाऱ्यांना भारतीय रिझर्व्ह बँकेकडून किती पैसे भरले गेले याची तपशीलवार माहिती मिळते शिवाय हीच माहिती त्यांना बँकांकडून रोजच्या रोजही मिळते. पैसे मिळाल्याची पावती बँकेकडून करदात्याला मिळते, त्याची नोंद करदात्याच्या रोख खातेवही (कॅश लेजर) मध्ये होते. त्यामुळे त्याला ती पाहिजे त्यावेळी पुरावा म्हणून सादर करता येते.

**लेखा अधिकाऱ्यांना भारतीय रिझर्व्ह बँकेकडून किती पैसे भरले गेले याची तपशीलवार माहिती मिळते शिवाय हीच माहिती त्यांना बँकांकडून रोजच्या रोजही मिळते. पैसे मिळाल्याची पावती बँकेकडून करदात्याला मिळते, त्याची नोंद करदात्याच्या रोख खातेवही (कॅश लेजर) मध्ये होते. त्यामुळे त्याला ती पाहिजे त्यावेळी पुरावा म्हणून सादर करता येते.**

### करपालन सोपे आणि सहज करताना

कर भरणे हे करदात्यांचे कर्तव्य आहे, पण त्यांना ते भरणे,त्यासाठी विवरणपत्र दाखल करणे सोपे आणि सोयीस्कर जावे तसेच कर पालनासाठी लागणारा वेळ कमी व्हावा ही जबाबदारी कर आकारणी अधिकाऱ्यांची आहे.करदात्यांना कर भरणे सोयीस्कर जावे, हाच खरा विचार कर सुधारणा करण्यामागे आहे. सामान्यातल्या सामान्य, अगदी शेवटच्या व्यक्तीला देखील कर भरणे, विवरणपत्र दाखल करणे सोयीस्कर व्हावे,या उद्देशाने,वस्तू आणि सेवा करप्रणाली मध्ये मोठया कौशल्याने विविध सेवांची मालिका आणि तांत्रिक साधने विकसित करण्यात आली आहेत.

वस्तू आणि सेवा कर पद्धतीमध्ये नेहमीच्या आणि किरकोळ करदात्यांनी त्यांच्या बाहेर केल्या जाणाऱ्या पुरवठ्याबाबतची तपशीलवार माहिती प्रत्येक महिन्यानंतर लगेचच येणाऱ्या दुसऱ्या महिन्याच्या १० तारखेपर्यंत जी एस टी आर फॉर्मच्या स्वरुपात सादर करणे आवश्यक आहे.याच प्रयत्नाचा एक भाग म्हणून जी एस टी करप्रणालीने एक ऑफलाईन साधन (टूल) आणि साधे एक्सेलवर आधारित टेम्पलेट विकसित केले आहे. त्यामुळे करदात्यांना मासिक विवरणपत्र तयार करणे आणि ते दाखल करणे,ही सुविधा जास्तीत जास्त सोप्या, सहज पद्धतीने आणि

कमीत कमी खर्चात उपलब्ध होणार आहे.

जी एस टीच्या सार्वजनिक पोर्टलवरून एक्सेल वर्कबुक टेम्पलेट मोफत डाऊनलोड करता येते, www.gst.gov.in हे त्याचे संकेतस्थळ आहे.यामुळे करदात्यांना चलनविषयक माहिती नियमितपणे पडताळून पाहता येऊ शकते. ऑफलाईन साधनामुळे, एक्सेल पानावरील माहिती मागवता येऊन ती वापरता येऊ शकते.त्यानंतर जावा स्क्रिप्ट ऑब्जेक्ट नोटेशन(JSON) फाईल निर्माण करता येते.ती मात्र इंटरनेटशी जोडल्यानंतर जी एस टी पोर्टलवरून अपलोड करावी लागते. फक्त याचवेळी करदात्याला इंटरनेट कनेक्टीव्हिटीची जरुरी भासते.

केवळ ग्राहकांना विक्री करणाऱ्या लहान करदात्यांचा व्यवसाय ते व्यवसाय असा व्यवहार नसल्याने त्यांचे विवरणपत्र केवळ पाच ओळींचे,पाच कर दरांचा उल्लेख करणारे असते.

त्याचबरोबर ज्या लहान करदात्यांची उलाढाल ७५ लाख किंवा त्यापेक्षा कमी असते त्यांना पर्याय दिला जातो. या रचनेनुसार त्यांना तीन महिन्यातून एकदा म्हणजे त्रैमासिक विवरणपत्र दाखल करावे लागते आणि तेही अगदी सरळ,सोपे असते.

विवरणपत्राची तयारी सहज आणि सोपी करणे हे आमचे उद्दिष्ट आहे. विविध विभागांन्तर्गत विविध प्रकारची माहिती जतन करून ठेवण्यासाठी उद्योगव्यवसायांना एक्सेल फॉरमॅटचा वापर करता येऊ शकतो. करदाता त्याची व्यापारविषयक किंवा बाह्य पुरवठा-विषयक तपशीलवार माहिती दर आठवडयाला किंवा त्याला योग्य वाटेल अशा पद्धतीने ठराविक काळानंतर नियमितपणे तयार करू शकतो आणि नंतर ती जी एस टी पोर्टलवर अपलोड करू शकतो. नवीन तयार करण्यात आलेले साधन(टूल) एक्सेल पानावरच्या १९००० ओळी ओढून घेऊन ५ एम बी ची फाईल एकावेळी तयार करू शकतो.आवश्यकता भासल्यास या साधनाचा जी एस टी आर -१ निर्माण करण्यासाठी जी माहिती अपलोड करावी लागते त्यासाठी अनेक वेळा वापर करता येऊ शकतो. मध्यम स्वरूपाचे,व्यवसायातून व्यवसायाशी विक्री व्यवहार करणारे बहुसंख्य करदातेही अशा प्रकारे विवरणपत्र निर्माण करून ते दाखल करू शकतात.जी एस टी आर १ हे विवरणपत्र तयार करण्यासाठी जी एस टी आर १ एक्सेल टेम्पलेट वर्कबुकचा इंटरनेट न जोडता ऑफलाईन मोडवर ठेवून वापर करता येऊ शकतो.दुर्गम भागात कदाचित इंटरनेट कनेक्टीव्हिटी एवढया चांगल्या प्रकारे मिळण्याची शक्यता नसते, अशा वेळी या भागातील करदात्यांनाही याचा फायदा होऊ शकतो.

**वस्तू आणि सेवा कर प्रणालीचा उद्देश केवळ करपालनाचे काम सोपे करणे हा नाही,तर त्याचबरोबर कर भरण्याची प्रक्रिया सोपी आणि सोयीस्कर करणे हा ही आहे. केवळ या एकाच निदर्शकात सुधारणा करून आपण 'सहजपणे व्यवसाय करण्यासाठी' या जागतिक मापदंडात भारताचे, देशाचे स्थान आणि दर्जामध्ये लक्षणीय सुधारणा घडवून आणू शकतो.**

### व्यवसाय सहजपणे करण्याच्या परिस्थितीत सुधारणा घडवून आणताना

'सहजपणे व्यवसाय करण्यासाठी' हाच अर्थव्यवस्थेचा खुलेपणा आणि व्यवसायांबाबतचा सौम्यपणा मोजण्याचा मापदंड आहे. जागतिक अर्थव्यवस्थेचा विचार करता भारत याबाबत कायम मागे राहिला आहे, असे दुर्दैवाने म्हणावे लागेल.जागतिक बँकेने 'सहजपणे व्यवसाय करण्यासाठी'याबाबतचा एक अहवाल प्रसिद्ध केला.यामध्ये नवीन व्यवसाय सुरु करताना किंवा व्यवसाय करणे चालू ठेवताना उद्योजकांना, त्याला अथवा तिला, त्यांच्या या प्रवासात, कोणत्या बाबी सहज, सोप्या वाटतात आणि कोणत्या अडचणींना सामोरे जाणे अवघड वाटते, अशा काही निदर्शकांची यादी देण्यात आली आहे. या मूल्यांकनात

कर भरण्यामध्ये किती सहजता आहे, हा एक महत्त्वाचा निदर्शक मानण्यात आला आहे.


वस्तू आणि सेवा कर प्रणालीचा उद्देश केवळ करपालनाचे काम सोपे करणे हा नाही,तर त्याचबरोबर कर भरण्याची प्रक्रिया सोपी आणि सोयीस्कर करणे हा ही आहे. केवळ या एकाच निदर्शकात सुधारणा करून आपण 'सहजपणे व्यवसाय करण्यासाठी' या जागतिक मापदंडात भारताचे, देशाचे स्थान आणि दर्जामध्ये लक्षणीय सुधारणा घडवून आणू शकतो. स्वयं-सेवा या पद्धतीने या कर पद्धतीची रचना करण्यात आली आहे. ती मोबाईल सिस्टीमसाठी सोपी, सहज स्वीकारता येण्याजोगी आणि बदलाभिमुख आहे.ही कर पद्धत व्यवसाय आणि उद्योजकांना सक्षम बनवण्यात आणि त्यांची कर भरण्याची प्रक्रिया सोपी करण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावेल.

वस्तू आणि सेवा कर प्रणालीने शक्तिशाली आणि परिणामकारक बनवलेल्या वस्तू आणि सेवा कराच्या यशस्वी अंमलबजावणीनंतर भारत आता 'सहजपणे व्यवसाय करण्यासाठी' या मापदंडामध्ये महत्त्वपूर्ण कामगिरी करू इच्छितो. नव्या कराची ही अंमलबजावणी, व्यापार-व्यवसायांना आणि भारतीय अर्थव्यवस्थेला चालना देणारी ठरेल, अशी अपेक्षा आहे.

■ ■ ■

*लेखक जीएसटीएन चे मुख्य कार्यकारी अधिकारी आहेत.*

*Email: prakash@gstn.org.in*



# जीएसटी : नव्या युगाची पहाट

- उपेंद्र गुप्ता




***निरनिराळ्या अर्जांचा साचा आणि अवज़ड आणि त्रासदायक नियमन, जोडीला यंत्रणेची सुस्त व अकार्यक्षम कार्यपद्धती यामुळे भारतात व्यवसाय करणे हे बहुतेक व्यापार व उद्योगासाठी दुखाचे कारण बनले आहे. हे वेदनादायक अनुभव आता वाईट स्वप्न म्हणून विसरले जाणार असून आता आपल्याला स्मार्ट, नैतिकदृष्ट्या जबाबदार, प्रतिसादात्मक आणि पारदर्शक जीएसटी राजवट हे गुणधर्म असलेले सुशासन अवतरल्याचे पहायला मिळणार आहे.***

संसदेत ३० जून २०१७ च्या मध्यरात्रीच्या ठोक्याला जी घंटा वाजली तिच्या आवाजाचा प्रतिध्वनी जगात भारताची राजकीय परिपक्वता आणि एकजुटीची तुतारी म्हणून उमटला. हा भारतीय अर्थव्यवस्थेसाठी नियतीशी केलेल्या कराराचा तोच क्षण होता जेव्हा संपूर्ण देश अनागोंदीने त्रस्त आणि गुंतागुंतीच्या अप्रत्यक्ष कर राजवटीचे रुपांतर चांगल्या आणि साध्या करपद्धतीत (गुड अँड सिंपल टॅक्स) करण्यासाठी एकजुटीने पुढे आला. भारतीय राजकारण्यांच्या वर्गासाठी जीएसटी हा यशाचा नवा बालेकिल्ला म्हणून आणि असंख्य गुंतागुंतीच्या करांच्या घोटाळ्यांच्या चक्रव्यूहात अडकलेल्या भारतीय अर्थव्यवस्थेसाठी रक्षक म्हणून पुढे आला आहे. ज्या चक्रव्यूहामुळे आतापर्यंत व्यापार व उद्योग आणि त्याद्वारे सामान्य माणसाला नुकसान सहन करावे लागत होते.

भारत हा राज्यांचा संघ आहे आणि १९४७ पासून राजकीय दृष्ट्या आम्ही एक आहोत, पण आर्थिक संघ म्हणून आम्ही एक आहोत काय? प्रत्येक राज्यातील करांची पर्वा न करता तामिळनाडूतील एखादा व्यापारी हिमाचल प्रदेशात आपला माल विकू शकतो काय? जम्मू आणि काश्मीरमधील एखादा ट्रक प्रत्येक राज्याच्या सीमांवरील तपासणी नाक्यांवर न थांबवला जाता कन्याकुमारीपर्यंत जाऊ शकतो काय? हे सर्व अडथळे दूर करण्याची व भारताला एका अशा आर्थिक राज्यात किंवा सामायिक राष्ट्रीय बाजारपेठेत पुढे नेण्याची क्षमता जीएसटीमध्ये आहे. जेथे कोणतीही भीती अथवा अनुग्रहाशिवाय खरोखर व्यापार केला जाऊ शकतो.

आता जीएसटी काय आहे, हे पालुपद पुन्हा पुन्हा आळवण्याची गरज नाही. जागृतीच्या लाटा देशभरात उसळल्या आहेत आणि अगदी एखाद्या लहान मुलालाही जीएसटी म्हणजे काय याची कल्पना आहे असे म्हटल्यास ते वावगे ठरणार नाही. पण त्याला कदाचित हे माहीत नसेल की ही विराट सुधारणा देशात करण्याची गरज कशामुळे तयार झाली? नव्या युगाची पहाट उजाडण्यासाठी देशाला दहा वर्षे

का लागली? या प्रश्नाचे उत्तर इतिहासाच्या पार्श्वभूमीत आहे जिला आपली पूर्वीची करपद्धती फारच अनुकूल होती. ऐतिहासिक दृष्ट्या केंद्र सरकार आकारत असलेले उत्पादन (केंद्रीय अबकारी शुल्क), सेवा तरतूद (सेवा कर), मालाची आंतरराज्य विक्री कर (सीएसटी- केंद्राकडून आकारला जाणारा पण राज्यांकडून वसूल केला जाणारा व मान्यता दिला जाणारा) आणि राज्य सरकार आकारत असणारे किरकोळ विक्रीवरील कर (व्हॅट), राज्यात मालाचा प्रवेश झाल्यावर आकारला जाणारा (प्रवेश कर), आराम कर, खरेदी कर, इत्यादी असे कर होते. या करांची निव्वळ संख्याच करदात्यांसाठी मनाचा गोंधळ उडवणारी आहेच असे नाही तर ते भरण्यासाठीची यंत्रणाही त्यांच्यासाठी एखाद्या दुस्वप्नासारखी आहे. या समस्येची गुंतागुंत अधिक वाढवणारी गोष्ट म्हणजे हे कर एखाद्या उंच ढिगासारखे आहेत म्हणजे केंद्र सरकार किंवा राज्य सरकारला दिल्या जाणाऱ्या करांबद्दल कोणत्याही प्रकारची सवलत देण्याची साखळी नाही. परिणामी करांची व्यापक आकारणी, आंतरराज्य आणि राज्यांतर्गत मनमानीपणे विक्रीवरील कर आकारणी तसेच अनैतिक तत्वांचा एक भोवरा तयार केला जातो. ज्याचा परिणाम त्यांच्याकडून या कृत्रिम अडथळ्यांचा गैरफायदा उठवण्यात होतो. त्याबरोबरीने निरनिराळ्या अर्जांचा साचा आणि अवज़ड आणि त्रासदायक नियमन, जोडीला यंत्रणेची सुस्त व अकार्यक्षम कार्यपद्धती यामुळे भारतात व्यवसाय करणे हे बहुतेक व्यापार व उद्योगासाठी दुखाचे कारण बनले आहे.

हे वेदनादायक अनुभव आता वाईट स्वप्न म्हणून विसरले जाणार असून आता आपल्याला स्मार्ट, नैतिकदृष्ट्या जबाबदार, प्रतिसादात्मक आणि पारदर्शक जीएसटी राजवट हे गुणधर्म असलेले सुशासन अवतरल्याचे पहायला मिळणार आहे. विविध कर एकाच करामध्ये म्हणजे वस्तु व सेवा करात एकत्र केले जाणार असून माल किंवा सेवेचा अथवा दोन्हींचा पुरवठा यावर पुरवठा साखळीच्या प्रत्येक अवस्थेत म्हणजे उत्पादन किंवा आयातीपासून ते शेवटच्या किरकोळ स्तरापर्यंत आकारला जाणार आहे. भारतात संघराज्य रचना असल्याने केंद्र व राज्यांना कर आकारण्याचे स्वतंत्र अधिकार आहेत. जीएसटी ही दुहेरी करआकारणी पद्धत असून केंद्र सरकार केंद्रीय जीएसटी (जिथे याचा यापुढे सीजीएसटी अथवा केंद्रीय कर म्हणून उल्लेख केला आहे) आकारून तो वसूल करेल आणि राज्य सरकारे राज्यांतर्गत वस्तु व सेवा पुरवठ्यावर राज्य जीएसटी आकारून वसूल करतील. (ज्यांचा उल्लेख यापुढे एसजीएसटी अथवा राज्य कर म्हणून केला असेल.) वस्तु व सेवांच्या आंतरराज्य विक्रीवर केंद्र सरकार एकात्मिक जीएसटी (यापुढे याचा उल्लेख आयजीएसटी अथवा एकात्मिक कर म्हणून केला आहे) कर आकारून तो वसूल करेल. याशिवाय केंद्रशासित प्रदेश जीएसटी (युटीजीएसटी अथवा केंद्रशासित प्रदेश कर) असाही एक जीएसटी असेल जो केंद्रशासित प्रदेशांत होणाऱ्या केंद्रशासित प्रदेशातील पुरवठ्यावर आकारला जाईल. त्याशिवाय जीएसटी लागू केल्यामुळे राज्यांचे जे नुकसान होईल त्याची भरपाई केंद्र सरकारकडून त्यांना देण्यासाठी जीएसटी भरपाई निधी उभारला जाणार असून त्यासाठी विशिष्ट आरामदायी वस्तु आणि सेवांवर कर लावला जाणार आहे.

**भारतात संघराज्य रचना असल्याने केंद्र व राज्यांना कर आकारण्याचे स्वतंत्र अधिकार आहेत. जीएसटी ही दुहेरी करआकारणी पद्धत असून केंद्र सरकार केंद्रीय जीएसटी (जिथे याचा यापुढे सीजीएसटी अथवा केंद्रीय कर म्हणून उल्लेख केला आहे) आकारून तो वसूल करेल आणि राज्य सरकारे राज्यांतर्गत वस्तु व सेवा पुरवठ्यावर राज्य जीएसटी आकारून वसूल करतील.**

### जीएसटीची प्रमुख वैशिष्ट्ये

जीएसटी समजून घेण्याच्या दृष्टीने भारतातील जीएसटी मॉडेलची प्रमुख वैशिष्ट्ये तपशीलवार सांगणे उत्तम होईल, जी पुढीलप्रमाणे आहेत.

अ) जीएसटीचा प्रादेशिक विस्तार हा संपूर्ण देशभर असून त्यात जम्मू आणि काश्मीरचाही समावेश आहे.

आ) जीएसटी हा वस्तु अथवा सेवेच्या पुरवठ्यावर लागू आहे जी सध्याच्या वस्तु अथवा सेवेच्या उत्पादनावर कर लागू करण्याच्या कल्पनेच्या विरोधात किंवा वस्तु अथवा सेवेच्या विक्रीवर आधारित आहे.

इ) जीएसटी सध्याच्या मूळ ठिकाणावर आधारित (origin based) कररचनेच्या तत्वाच्या ऐवजी गंतव्य ठिकाण (destination based) उपभोगावर आधारित कररचनेच्या तत्वावर आधारित आहे. याचा अर्थ जेथे वस्तु अथवा सेवेचा उपभोग घेतला जातो त्यावर आधारित कर लावला जातो. मूळ ठिकाण आधारित करव्यवस्थेत कर हा वस्तु अथवा सेवा जिथे उत्पादित होतात तेथे लावला जातो.

ई) माल आयात करण हे आंतर राज्य पुरवठ्याप्रमाणे समजले जाणार असून त्यावर लागू असलेल्या सीमा शुल्काव्यतिरिक्त आयजीएसटी आकारला जाणार आहे.

उ) आयात सेवा या आंतरराज्य पुरवठ्याप्रमाणे समजल्या जातील आणि त्यावर आयजीएसटी रिव्हर्स चार्ज आधारित लावला जाईल.

ऊ) सीजीएसटी, एसजीएसटी/ युटीजीएसटी आणि आयजीएसटी केंद्र व राज्य सरकार जीएसटी मंडळाच्या छताखाली या दोघांनीही एकमताने मान्य केलेल्या दरांवर आकारले जातील.

ए) सर्व प्रकारच्या वस्तु आणि सेवांसाठी चार प्रकारचे कर ५ टक्के, १२ टक्के, १८ टक्के आणि २८ टक्के असे आहेत. मौल्यवान धातूंवर ३ टक्के कर असेल तर खडबडीत मौल्यवान धातूंवरील कर ०.२५ टक्के असेल. काही विशिष्ट वस्तु किंवा सेवा याना वगळण्यात आले आहे.

ऐ) जीएसटीमध्ये वस्तु व सेवांचा संपूर्ण विस्तार समाविष्ट असून फक्त मानवी सेवनासाठी असलेल्या अल्कोहोलचा समावेश त्यात नाही जे घटनेनेच जीएसटीच्या कक्षेबाहेर ठेवले आहे. तसेच सध्याच्या घडीला पाच पेट्रोलियम उत्पादने (कच्चे तेल, पेट्रोल, डिझेल, एटीएफ आणि नैसर्गिक वायु) जीएसटीच्या कक्षेबाहेर असून जीएसटीसीने शिफारस केल्यानंतर ते जीएसटीच्या अंतर्गत आणता येऊ शकतात.

---

**जीएसटी सध्याच्या मूळ ठिकाणावर आधारित (origin based) कररचनेच्या तत्वाच्या ऐवजी गंतव्य ठिकाण (destination based) उपभोगावर आधारित कररचनेच्या तत्वावर आधारित आहे. याचा अर्थ जेथे वस्तु अथवा सेवेचा उपभोग घेतला जातो त्यावर आधारित कर लावला जातो. मूळ ठिकाण आधारित करव्यवस्थेत कर हा वस्तु अथवा सेवा जिथे उत्पादित होतात तेथे लावला जातो.**

---

ओ) सीजीएसटी आणि एसजीएसटी/यूटीजीएसटी या दोन्हीसाठी सवलतीची एकच सामायिक कमाल मर्यादा २० लाख रुपयांची (जम्मू आणि काश्मीर वगळता संविधानाच्या परिच्छेद २७९ अ अनुसार निश्चित केलेल्या विशेष वर्गवारीतील राज्यांसाठी १० लाख रुपये) तरतूद केली आहे. त्याशिवाय मुद्रायोजन योजनेंतर्गत करभरणा करण्याचा पर्यायही (म्हणजे एकाच दराने कर चुकता करण्याची सोय)

लहान करदात्यांना ज्यांची वार्षिक उलाढाल ७५ लाख रुपये आहे (जम्मू आणि काश्मीर आणि उत्तराखंड वगळून संविधानाच्या परिच्छेद २७९ अ अनुसार निर्देशित केलेल्या विशेष वर्गातील राज्यांसाठी ५० लाख रुपये) उपलब्ध आहे (उत्पादक आणि सेवा पुरवठादारांचा विशेष वर्ग वगळून).

औ) सेझसाठी निर्यात आणि पुरवठा शून्य दराने

क) कच्च्या मालावरील (inputs) भरलेल्या सीजीएसटीच्या रकमेवर टॅक्स क्रेडिटवर दावा करताना ती रक्कम केवळ तयार मालावरील (output) सीजीएसटी अदा करण्यासाठीच वापरता येईल आणि कच्च्या मालावरील एसजीएसटी/ यूटीजीएसटीवरील टॅक्स क्रेडिट केवळ एसजीएसटी/ यूटीजीएसटी अदा करण्यासाठीच वापरली जाईल. दुसऱ्या शब्दांत सांगायचे तर कच्च्या मालावरील टॅक्स क्रेडिटचे दोन्ही स्त्रोत एकमेकांसाठी वापरता येणार

नाहीत. फक्त आयजीएसटीची टॅक्स क्रेडिटसाठी आंतर-राज्य पुरवठ्याच्या विशिष्ट परिस्थितीला यातून वगळण्यात आले आहे. ही जमा केलेली रक्कम खालील पद्धतीने वापरण्यास परवानगी देण्यात आली आहे.

ए) सीजीएसटीचे इनपुट टॅक्स क्रेडिट सीजीएसटी आणि आयजीएसटी अदा करण्यासाठीच त्याच क्रमानुसार वापरता येईल. बी) एसजीएसटीचे इनपुट टॅक्स क्रेडिट एसजीएसटी आणि आयजीएसटी अदा करण्यासाठीच त्याच क्रमानुसार वापरता येणार सी) यूटीजीएसटीचे इनपुट टॅक्स क्रेडिट यूटीजीएसटी आणि आयजीएसटी रक्कम अदा करण्यासाठी त्याच क्रमाने वापरता येईल.

डी) आयजीएसटीचे इनपुट टॅक्स क्रेडिट हे आयजीएसटी, सीजीएसटी आणि एसजीएसटी/यूटीजीएसटीची रक्कम अदा करण्यासाठी त्याच क्रमाने वापरता येईल. सीजीएसटीचे इनपुट टॅक्स क्रेडिट एसजीएसटी/ यूटीजीएसटासाठी किंवा त्या उलट पद्धतीने रक्कम अदा करण्याची परवानगी नाही.

ख) विवरणपत्रांचे इलेक्ट्रॉनिक दाखलीकरण वेगवेगळ्या ठिकाणी वेगवेगळ्या वर्गातील लोकांकडून केले जाईल.

ग) कर अदा करण्यासाठी करदात्याला कर भरण्याच्या विविध पद्धती उपलब्ध असून त्यात इंटरनेट बँकिंग, डेबिट/क्रेडिट कार्ड, नॅशनल इलेक्ट्रॉनिक फंड्स ट्रान्स्फर आणि रिअल टाईम ग्रॉस सेटलमेंट यांचा समावेश आहे.

घ) कराची रक्कम परत घ्यायची असल्यास करदात्याने किंवा ज्याने कर भरला असेल त्याने कर भरल्याच्या दिवसापासून दोन वर्षांच्या आत तशी मागणी केली पाहिजे.

त) नोंदणीकृत व्यक्तींनी देय असलेल्या करांबाबत स्वमूल्यांकनाची तरतूद पुरवण्यात आली आहे.

**कायद्यातील तरतुदींचे पालन केले आहे की नाही याची तपासणी करण्यासाठी नोंदणीकृत व्यक्तींकडून ऑडिट केले जाईल. याच कायद्यात नफेखोरीविरोधात कलमाचीही तरतूद केली असून त्यानुसार व्यवसायांना वस्तु अथवा सेवा विक्रीवरील करातील घट झाल्याचा फायदा ग्राहकांपर्यंत पोहचवला जाईल, याची हमी दिली आहे.**

थ) कायद्यातील तरतुदींचे पालन केले आहे की नाही याची तपासणी करण्यासाठी नोंदणीकृत व्यक्तींकडून ऑडिट केले जाईल.

द) याच कायद्यात नफेखोरीविरोधात कलमाचीही तरतूद केली असून त्यानुसार व्यवसायांना वस्तु अथवा सेवा विक्रीवरील करातील घट झाल्याचा फायदा ग्राहकांपर्यंत पोहचवला जाईल, याची हमी दिली आहे.

ध) विद्यमान करदात्यांना जीएसटी राजवटीत सुलभपणे संक्रमित करण्यासाठी विस्तृत संक्रमक तरतुदी करण्यात आल्या आहेत. जीएसटीचे फायदे;

(ए) मेक इन इंडिया

१) भारतासाठी एकच सामायिक राष्ट्रीय बाजारपेठ निर्माण करण्यासाठी मदत होणार असून परदेशी गुंतवणूक व मेक इन इंडिया मोहीमेला मोठी चालना मिळणार आहे

२) पुरवठ्याच्या प्रत्येक अवस्थेत सर्व वस्तु व सेवांसाठी इनपुट टॅक्स क्रेडिट उपलब्ध असल्याने करांचे व्यापकत्व सौम्य होणार आहे

३) कायदे, कामकाज आणि करांच्या दरात सलोखा

४) खास करुन निर्यातीसाठी उत्पादनांवरील करांचे अधिक परिणामकारक प्रभावलोपन होणार असल्याने उत्पादने आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत अधिक स्पर्धात्मक होतील आणि भारतीय निर्यातीला चालना मिळेल

५) कंपन्यांवरील करांचा सरासरी बोजा कमी होण्याची शक्यता असून त्यामुळे किमती खाली येण्याची अपेक्षा आहे आणि कमी किमती म्हणजे अधिक उपभोग हे समीकरण आहेच. परिणामी अधिक उत्पादन होऊन त्याद्वारे उद्योगांच्या वाढीला मदत होणार आहे. त्यातून भारत हा उत्पादनाचा अड्डा म्हणून उदयास येईल.

(ब) व्यवसायस्नेही धोरण

१) थोड्या मोकळीकींसह सुलभ कर राजवट

२) सध्याच्या घडीला आमच्या अप्रत्यक्ष करांवर राज्य करणाऱ्या अनेक प्रकारच्या करांच्या संख्येत घट होऊन सुलभीकरण व एकसारखेपणा येईल

३) कायद्याचे पालन करण्याच्या खर्चात घट - विविध करांसाठी अनेक प्रकारच्या नोंदी ठेवण्याची गरज नसल्याने स्त्रोतांमध्ये गुंतवणूक कमी होणार आणि नोंदी ठेवण्यासाठी कमी मनुष्यबळाची आवश्यकता

४) नोंदणी, परतावा, विवरणपत्र, करांची रक्कम अदा करणे यासारख्या विविध प्रक्रियांसाठी सुलभ आणि स्वयंचलित कामकाज

५) सर्व संवाद हा सामायिक जीएसटीएन या पोर्टलच्या माध्यमातून होणार - करदाता आणि कर प्रशासन यांच्यात किमान संवादाची गरज

६) करदात्यांची नोंदणी, करांचा परतावा, कर विवरणपत्रांचा एकसारखा नमुना, सामायिक कराचा पाया, वस्तु व सेवांचे वर्गीकरण करण्याची सामायिक पद्धती करव्यवस्थेला निश्चितता प्रदान करणार आहे.

**(क) ग्राहकांना फायदा**

१) उत्पादक, दुकानदार आणि सेवा पुरवठादार यांना सातत्याने इनपुट टॅक्स क्रेडिटच्या अखंड ओघाचा लाभ होणार असल्याने वस्तुंची अंतिम किंमत कमी राहण्याची अपेक्षा

२) कंपन्यांवरील सरासरी कराचा बोजा कमी येण्याची शक्यता असल्याने त्यातून किमती कमी होण्याची अपेक्षा आहे. कमी किमती म्हणजेच अधिक उपभोग असा अर्थ आहे.

**सारांश**

जीएसटीकडे लघुदृष्टीने पाहिले असता केवळ अप्रत्यक्ष करांतील सुधारणेच्या छटाच फक्त दिसतील. या संक्रमणात्मक सुधारणेकडे आपण व्यापक दृष्टीकोनातून पाहिले तर व्यवसायातील बदल, सामाजिक पुनर्निमिती असेही दिसेल. एक क्रांती जी आमच्या आर्थिक वाढीने पुन्हा उर्जा देणारी आहे, जागतिक घडामोडींच्या अनिश्चिततांची लागण करून घेण्याच्या आमच्या अर्थव्यवस्थेला चालना देणारा डोस आणि शेवटी परंतु अत्यंत महत्वाचे म्हणजे असे भविष्य की ज्यात आमची मान ताठ असेल आणि मने मुक्त असतील.

■ ■ ■

*लेखक आयुक्त (जीएसटी) या पदावर कार्यरत आहेत.*
*Email: gst-cbec@nic.in*




**प्रकाशन विभागाची नवी पुस्तके**

**एका पुस्तकाची किरकोळ विक्री**
**किंमत ३० रुपये प्रत्येकी**
**चार पुस्तकांचा संच १०० रु.**

# जीएसटी आणि राज्य सरकारे

**- जयंत रॉय चौधरी**




***वस्तू आणि सेवा कराविषयीची मुख्य समस्या म्हणजे सर्व कर अर्थव्यवस्थेच्या सुदृढपणावर अवलंबून आहेत. म्हणूनच वस्तू आणि सेवा कराने आपल्या कर बेसचा विस्तार करावयास हवा. टॅक्स जीडीपी प्रमाण सध्याच्या दहा टक्क्यांवरुन वाढून १६ टक्क्यांपर्यंत पोहचेल. मात्र, यासाठी एक वर्ष वाट पाहावी लागेल. सरकार आणि उद्योगजगत एकत्रितरित्या कसे कार्य करतात, त्यावर हे अवलंबून आहे.***

राज्य सरकारांनी आपल्या कराविषयीचा घटनात्मक अधिकार सोडून दिला आहे. हेच नव्या वस्तू आणि सेवा कर कायद्याचे मोठे यश आहे. तथापी, यासाठी राज्यांनी दीर्घकाळ केंद्र सरकारशी संघर्ष केला आहे आणि त्यातून नूकसानभरपाईसाठी ५०,००० कोटी रुपये उभे करावयाचे आहेत. यामागचा उद्देश असा आहे की, तेलधक्का किंवा जागतिक मंदीमुळे जर अर्थव्यवस्थेवर ताण आला तर देशाची अर्थव्यवस्था ७.५-८ % दराने वाढणार नाही तसेच निर्धारीत केल्याप्रमाणे महसूल प्राप्ती होणार नाही.

वस्तू आणि सेवा कराविषयीची मुख्य समस्या म्हणजे सर्व कर अर्थव्यवस्थेच्या सुदृढपणावर अवलंबून आहेत. म्हणूनच वस्तू आणि सेवा कराने आपल्या कर बेसचा विस्तार करावयास हवा. टॅक्स जीडीपी प्रमाण सध्याच्या दहा टक्क्यांवरुन वाढून १६ टक्क्यांपर्यंत पोहचेल. मात्र, यासाठी एक वर्ष वाट पाहावी लागेल. सरकार आणि उद्योगजगत एकत्रितरित्या कसे कार्य करतात, त्यावर हे अवलंबून आहे.

भारतीय रिझर्व्ह बँकेने राज्यांच्या आर्थिक स्थितीसंदर्भातील आपल्या अहवालात म्हटले आहे की,

'जीएसटीच्या अंमल बजावणीनंतर निर्माण होणाऱ्या महसूलाच्या अनिश्चिततेमुळे राज्यांचा महसूल परतावा अनिश्चित ठरु शकतो.'

दुसरीकडे, राज्यांना वाढत्या खर्चाला तोंड द्यावे लागत आहे. सातव्या वेतन आयोगाच्या अंमलबजावणीनंतर, राज्यांच्या वेतन देयकांमध्ये मोठी वाढ झाली आहे. उत्तर प्रदेश सरकारने शेतकऱ्यांच्या कर्जमाफीचा निर्णय घेतला. त्यानंतर तीन राज्यांनी शेतकऱ्यांच्या कर्जमाफीची घोषणा केली.

राज्य सरकारे आणि केंद्र सरकारची समस्या अशी आहे की, कर्जाचे प्रमाण दिवसेंदिवस वाढतच आहे, त्यामुळे भारताचा ग्रीस होतो की काय अशी भीती निर्माण झाली आहे. भारताचे सार्वजनिक कर्ज, यात राज्य सरकारे आणि केंद्र सरकार मिळून, जीडीपीच्या ६७ % आहे, जे जपान वगळता इतर आशियाई देशांमध्ये सर्वात जास्त आहे.

यावेळी जर सर्व राज्य सरकारांनी शेतकऱ्यांच्या कर्जमाफीचा निर्णय घेतला तर, नवीन कर्जाची रक्कम तीन लाख कोटी रुपयांपर्यंत जाईल, अर्थमंत्रालयाच्या अधिकाऱ्यांनीच ही आकडेवारी दिली आहे. कर्ज घेण्याची पद्धती ही अशाश्वत आहे, पण यावेळी नवीन कर रचनेचा प्रयोग करण्यात आला आहे आणि राज्य सरकारांना याचा कसा लाभ होईल, लाभ होईल की नूकसान होईल हे आताच सांगता येणार नाही. ही सर्वात जोखमीची बाब आहे.

**कायदेपंडितांनी बरोबर म्हटले आहे की, जीएसटीच्या अंमलबजावणीनंतर पूर्णत: जबाबदारी केंद्र सरकारची असेल. जर, राज्यांनी कर वाढवण्याचा अधिकार गमावला तर त्यांच्या महसूलाच्या स्रोतावरही परिणाम होण्याकडे निरीक्षकांनी लक्ष वेधले आहे. तामिळनाडू राज्याने जीएसटीमधील बऱ्याच तरतूदींना आक्षेप घेतला होता, त्यांचे असे म्हणणे होते की, करप्रणालीतून मिळणाऱ्या महसूलातूनच त्यांनी मोठ्या प्रमाणावर सामाजिक क्षेत्रातील सुधारणा हाती घेतल्या होत्या.**

भारतीय रिझर्व्ह बँकेच्या अहवालात म्हटले आहे, राज्यांच्या कर्जाचे जीडीपीशी असलेल्या प्रमाणात गेल्या वर्षात सतरा राज्यांची भर पडली आहे. तसेच २०१६-१७ च्या अर्थसंकल्पात २५ राज्यांनी अर्थव्यवस्था सुधारत असल्याचे सांगितले आहे. पण, वास्तवात हे शक्य नाही. २०१५-१६ चे जीडीपी प्रमाण-सकल वित्तीय तूट हे प्रमाण बिघडले आहे. ते आताच तीन टक्क्यांपर्यंत पोहचले आहे. २००४-०५ नंतरचे हे सर्वाधिक प्रमाण आहे. अशा परिस्थितीत राज्य सरकारांसाठी वेतनासाठी लागणारी रोकड, विकासकामांवरील खर्च आणि कर्जमाफीच्या घोषणा यामुळे राज्य केंद्र सरकारशी लढ्याच्या पावित्र्यात आहेत.

तथापी, अधिकाऱ्यांनी असेही निदर्शनास आणून दिले की, वस्तू आणि सेवा करामुळे (जीएसटी) एकूण ४५ % अप्रत्यक्ष करांची वसूली होणार नाही. रिअल इस्टेच, पेट्रोलिअम पदार्थ, मद्य इ. यावर कर आकारणीचा अधिकार राज्य सरकारांना आहे तसेच कर वाढवण्याचाही.

जीएसटी विधेयकात आश्वस्त करण्यात आले आहे की, जीएसटी परिषद यांनाही लवकरच जीएसटीच्या कक्षेत आणेल. दरम्यानच्या काळात राज्यांनाही जाणीव होईल की, त्यांना आर्थिक स्वातंत्र्यासाठी इतर काही निर्णय घ्यावे लागतील.

याठिकाणी एक बाब लक्षात घेण्याजोगी आहे ती म्हणजे, जेंव्हा केंद्र आणि राज्य सरकारांमध्ये आर्थिक शक्तीच्या विभागणीचा विषय संविधान सभेसमोर आला तेंव्हा, बऱ्याच खासदारांनी ज्यात काँग्रेस खासदारांचीही समावेश होता, त्यांनी मागणी केली की, राज्यांना जास्तीचे अधिकार द्यायला पाहिजे. मात्र, जास्तीचे अधिकार एक देश या संकल्पनेला छेद ठरेल. म्हणून कायदेविषयक आणि करविषयक अधिकार केंद्र सरकारकडे देण्यात आले आहेत.

कायदेपंडितांनी बरोबर म्हटले आहे की, जीएसटीच्या अंमलबजावणीनंतर पूर्णत: जबाबदारी केंद्र सरकारची असेल. जर, राज्यांनी कर वाढवण्याचा अधिकार गमावला तर त्यांच्या महसूलाच्या स्रोतावरही परिणाम होण्याकडे निरीक्षकांनी लक्ष वेधले आहे. तामिळनाडू राज्याने जीएसटीमधील बऱ्याच तरतूदींना आक्षेप घेतला होता, त्यांचे असे म्हणणे होते की, करप्रणालीतून मिळणाऱ्या महसूलातूनच त्यांनी मोठ्या प्रमाणावर सामाजिक क्षेत्रातील सुधारणा हाती घेतल्या होत्या.

ही बाब सत्य आहे की, बऱ्याच दाक्षिणात्य राज्यांनी सामाजिक क्षेत्रात चांगली कामगिरी केली आहे- यात आरोग्य आणि शिक्षणातील कामगिरी ओईसीडी देशांपेक्षाही सरस असल्याचे दिसून येते. जीन द्रेझी या अर्थशास्त्रज्ञाच्या मते 'केरळ आणि तामिळनाडू ही राज्ये विकास निर्देशांकात आणि सुधारणेच्या वेगात इतर राज्यांपेक्षा बरीच पुढे आहेत.'

कायद्याने जीएसटी परिषदेला करविषयक सर्वाधिकार बहाल करण्यात आले आहेत. यात करनिर्धारण करण्याचा अधिकार संसदेपासून ते विधीमंडळापर्यंत असून तो देशभर राबवण्यात येतो. जीएसटी

परिषद ही निर्णय घेणारी सर्वोच्च परिषद आहे. राज्यांनाही वाटते की काही अधिकार आपल्याकडे असावेत, जसे महापालिका इ.

स्थानिक प्राधिकरणांकडून आकारला जाणारा कर, स्टॅम्प डयुटी, मद्य आणि पेट्रोलिअम पदार्थ याचा समावेश अद्याप जीएसटीच्या कक्षेत नाही.

बऱ्याच देशांमध्ये अप्रत्यक्ष करांविषयी निर्णय घेण्याचा अधिकार स्थानिक प्राधिकरणाला आहेत, तर प्रांतांना प्रत्यक्ष कराविषयीचे अधिकार आहेत. कॅनडामध्ये गेल्या दशकातच जीएसटी लागू करण्यात आला. याठिकाणीही प्रांतांना प्रत्यक्ष कराचे अधिकार आहेत तर संघराज्यांना (फेडरल) अप्रत्यक्ष कराविषयी अधिकार आहेत. भारतात, प्रत्यक्ष कराविषयीचे सर्व अधिकार केंद्र सरकारला आहेत, ज्यातला काही हिस्सा राज्यांना दिला जातो. आता जीएसटीविषयी अर्ध्यापेक्षाही जास्त अधिकार केंद्र सरकारकडे आहेत.

वस्तू आणि सेवा कराच्या अंमलबजावणीला देशातील राजकारण कशा पद्धतीने सामोरे जाते, हे दिसून येईल. राज्य सरकारे ऑस्ट्रेलियन प्रतिमानाप्रमाणे ७५% कर केंद्र सरकारकडून तर काही महसूल स्वत: निर्माण करु शकतील. भारतीय कर रचना आणि केंद्र आणि राज्य सरकारमधील सत्तेचा समतोल कसा साधला जातो हे नजीकच्या भविष्यात दिसून येईल. तसेच जीएसटी आणि राज्यांच्या महसूलांसदर्भात लवकरच कायदेविषयक तरतूद केली जाईल हे निश्चित.

■ ■ ■

*लेखक द टेलिग्राफ या दैनिकाचे व्यापार संपादक असून मागील पंचविस वर्षांपासून पत्रकारितेत आहेत. आर्थिक तसेच राजकीय - आर्थिक विषयावर त्यांनी विपूल लेखन केले आहे.*

Email: jrchowdhury@yahoo.com

**"Give a book instead of bouquet....
Such a move can make a big difference"**
– Hon'ble Prime Minister

Publications Division has rich repository of a range of books
from Art & Culture, Freedom Struggle, History, Biographies and Gandhian Literature
...to Children's Books



Gift our books
To your dear ones....
*because*
"There is no **friend** as loyal as a **book**"

**Publications Division**
Ministry of Information and Broadcasting
Government of India

For purchase of books, find details at **publicationsdivision.nic.in**
To buy eBooks visit **kobo.com, play.google.com, amazon.in**

# जीएसटी- भारतीय कर इतिहासातील महत्वाचा टप्पा

- टी.एन. अशोक



***१९४७ मध्ये राजकीय स्वातंत्र्य मिळाले होते तर आता आर्थिक स्वातंत्र्य मिळाले आहे. भारत सरकारने एक देश एक कर या शीर्षकाखाली जीएसटीचा मुद्दा लोकांपुढे प्रभावीपणे मांडला. या जीएसटी करामुळे देशात एक बाजारपेठ एक कर असे चित्र असणार आहे. त्यामुळे उत्पादक व गुंतवणूकदार यांचे व्यवहार सोपे होणार आहेत. जीएसटी हा भारतीय करप्रणालीला अपरिचित असला तरी त्या कराला जागतिक मानके व निकष आहेत.***

एक देश एक कर असलेल्या जीएसटी पद्धतीमुळे उद्योग सुरू करण्यास अनुकूल वातावरण तयार होणार असल्याने गुंतवणूक वाढणार आहे.

तीस जून व एक जुलै २०१७ च्या मध्यरात्री एक इतिहास घडताना आपण पाहिला. २०१७ व १९४७ त्या मध्यरात्री यांची तुलना स्वातंत्र्याच्या जल्लोषाशी करता येणार नाही पण जीएसटी लागू करण्याच्या मध्यरात्रीही संसदेच्या मध्यवर्ती सभागृहात त्यावेळी पंतप्रधान व राष्ट्रपती उपस्थित होते. १९४७ मध्ये राजकीय स्वातंत्र्य मिळाले होते तर आता आर्थिक स्वातंत्र्य मिळाले आहे. भारत सरकारने एक देश एक कर या शीर्षकाखाली जीएसटीचा मुद्दा लोकांपुढे प्रभावीपणे मांडला. या जीएसटी करामुळे देशात एक बाजारपेठ एक कर असे चित्र असणार आहे. त्यामुळे उत्पादक व गुंतवणूकदार यांचे व्यवहार सोपे होणार आहेत. जीएसटी हा भारतीय करप्रणालीला अपरिचित असला तरी त्या कराला जागतिक मानके व निकष आहेत. युरोप व अमेरिकेत हा कर आधीच अंमलात आहे. त्यांच्याशी भारताचा व्यापार मोठ्या प्रमाणात आहे. भारतात चार टप्प्यांची कर प्रणाली होती त्यामुळे त्यात अनेक अडचणी होत्या. काही उत्पादने महाग तर काही स्वस्त असे चित्र निर्माण झाले होते. ज्या वस्तू लोकांच्या वापरात जास्त प्रमाणात होत्या त्यांच्या किंमती कमी व श्रीमंत लोक वापरतात त्या वस्तूंच्या किंमती जास्त असे आताचे चित्र आहे. ही नवी करपद्धती समजण्यास काही काळ लागणार आहे. नेहमीच्या वापरातील वस्तूंवर कमी कर दर व ज्या सेवा नेहमी वापरल्या जात नाहीत त्यावर जास्त कर असाही एक दृष्टिकोन यात आहे. जीएसटी लागू करण्याचे श्रेय कुठल्या एका राजकीय पक्षाला देता येणार नाही. कारण या कराच्या अंमलबजावणीच्या प्रत्येक टप्प्यात कुठल्या ना कुठल्या राजकीय पक्षाचा सहभाग होता. तत्कालीन पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग हे आर्थिक सुधारणांचे शिल्पकार मानले जातात. त्यांनी पंतप्रधान नरसिंहराव यांच्या राजवटीत अर्थमंत्री असताना आर्थिक सुधारणा राबवल्या होत्या.

त्यामुळे जीएसटीचा प्रस्ताव सतत पुढे नेण्यात त्यांचा वाटा होता. पण तेव्हाचे काँग्रेस प्रणित युपीए सरकार व आताचे भाजप प्रणित एनडीए सरकार यांच्यात जीएसटी कशा पद्धतीने लागू करावा यावर काही मतभेद होते.आता जीएसटीचा इतिहास व तो कसा अस्तित्वात आला याची माहिती घेऊ. सध्याच्या सरकारने जीएसटीबाबत चार कायद्यांचा संच लोकसभेत मंजूर केला तो राज्यसभेच्या विचारार्थ आधीच ठेवण्यात आला होता. तेथून परत आल्यानंतर तो लोकसभेत मंजुरीसाठी मांडण्यात आला. कुठलेही अर्थविधेयक राज्यसभेत मंजूर होत नाही ते केवळ तेथून परत पाठवले जाते मग ते लोकसभेकडे येते. जीएसटीमुळे चलनवाढ होईल अशी भीती व्यक्त केली जात असताना ही एकसमान कर प्रणाली लागू करण्यात आली. अर्थमंत्र्यांनीही या बाबीचा उल्लेख केला. पाठोपाठच्या केंद्र सरकारांनी जीएसटी लागू करण्याच्या प्रक्रियेत वाटा उचलला त्यात कुणा एका व्यक्तीला श्रेय देता येणार नाही. विरोधी पक्षांनी मांडलेल्या सुधारणा नाकारून हे विधेयक राज्यसभेतून परत लोकसभेकडे आले होते. लोकसभेने यातील विधेयके २९ मार्चला मंजूर केली होती व मेच्या मध्यावधीत त्यातील नियम व करदरांना अंतिम मंजुरी देण्यात आली.

जीएसटीच्या अंमलबजावणीसाठी चार विधेयके मंजूर करण्यात आली. त्यात केंद्रीय जीएसटी विधेयक २०१७, एकात्म जीएसटी विधेयक २०१७, जीएसटी राज्यांना भरपाई विधेयक २०१७, केंद्रशासित प्रदेश जीएसटी विधेयक २०१७ यांचा समावेश होता.

वस्तू व सेवाकर (जीएसटी)- या करपद्धतीत केंद्र व राज्य सरकारांनी लावलेले कर बदलण्यात आले आहेत. राज्यघटनेच्या १०१ वी दुरूस्ती कायदा २०१६ अन्वये जीएसटी लागू करण्यात आला. त्यानंतर १२२ वे घटनादुरूस्ती विधेयक मांडण्यात आले होते.

**आंतरराज्य व्यवहार व वस्तू-सेवा आयात यात केंद्राकडून एकात्मिक जीएसटी लागू होत आहे. जीएसटी हा वापराधिष्ठित कर आहे, यात ज्या राज्यात सेवा किंवा वस्तूची निर्मिती झाली त्यांना कर दिला जाणार नसून ती वस्तू किंवा सेवा ज्या राज्यात विकली गेली किंवा वापरली गेली त्या राज्याला कर मिळणार आहे.**

जीएसटी हा जीएसटी मंडळाच्या अधिपत्याखाली लागू केला असून अर्थमंत्री हे या जीएसटी मंडळाचे अध्यक्ष आहेत. या पद्धतीत वस्तू व सेवांवर ०.२५ टक्के, ५ टक्के, १२ टक्के, १८ टक्के, २८ टक्के असे हे दर आहेत. सोन्यावर ३ टक्के तर मौल्यवान कच्च्या खड्यांवर ०.२५ टक्के कर आहे. जर आपण इतिहासात डोकावण्यात प्रयत्न केला तर १९८६ मध्ये तत्कालीन पंतप्रधान विश्वनाथ प्रताप सिंग यांनी सुधारित मूल्यवर्धित कर म्हणजे मॉडव्हॅट लागू केला होता. आता जीएसटीमुळे अनेक अप्रत्यक्ष कर एकच होणार असून त्यात केंद्रीय अबकारी कर, सेवा कर, अतिरिक्त सीमा शुल्क, अधिभार, राज्याचा मूल्यवर्धित कर व जकात कर तसेच आंतरराज्य वस्तू वाहतूक व्यापारातील काही कर यात एकत्र होणार आहेत. ते कर आता वेगळे असणार नाहीत. त्याऐवजी एकच कर असेल. केंद्रीय अबकारी कर, व्यापार कर, मूल्यवर्धित कर, अन्न कर, केंद्रीय विक्री कर, जकात कर, करमणूक कर, प्रवेश कर, आलिशानता कर, जाहिरात कर यांचा समावेश जीएसटीत करण्यात आला आहे. विक्री, हस्तांतरण, खरेदी, भाड्याने देणे घेणे, आयात व इतर सेवांवर जीएसटी लागू होणार आहे. भारत दुहेरी जीएसटी व्यवस्थापन प्रारूपाचा स्वीकार करीत आहे. एका राज्यातील व्यवहारांवर केंद्रीय जीएसटी व राज्याचा जीएसटी असणार आहे. आंतरराज्य व्यवहार व वस्तू-सेवा आयात यात केंद्राकडून एकात्मिक जीएसटी लागू होत आहे. जीएसटी हा वापराधिष्ठित कर आहे, यात ज्या राज्यात सेवा किंवा वस्तूची निर्मिती झाली त्यांना कर दिला जाणार नसून ती वस्तू किंवा सेवा ज्या राज्यात विकली गेली किंवा वापरली गेली त्या राज्याला कर मिळणार आहे. एकात्मिक जीएसटीत राज्यांना करवसुली अवघड होणार आहे. त्यात त्यांना मिळणे अपेक्षित असलेला कर केंद्र सरकार वसूल करणार आहे. आधीच्या पद्धतीत राज्यांना कर महसूल गोळा करताना

एकाच सरकारला तोंड द्यावे लागत होते. आता राज्यांना मिळणाऱ्या महसुलावर जीएसटीचा परिणाम होणार नाही अशी व्यवस्था केली आहे. केंद्र सरकारने राज्यांना महसूलात होणाऱ्या तोट्याच्या बदल्यात भरपाई देण्याचे कबूल केले आहे. ही भरपाई पाच वर्षे मिळणार आहे. जीएसटीचा परिणाम म्हणून इंधनाच्या किंमती रोज बदलणार आहेत.

एकवीस सदस्यांच्या निवड समितीने जीएसटी प्रस्तावित केला आहे. राज्य व केंद्र शासित प्रदेशांनी जीएसटी विधेयके मंजूर केली आहेत त्यामुळे १ जुलैपासून जीएसटी सुरळित लागू झाला. रोख्यांच्या खरेदी विक्रीवर जीएसटी लागू नाही. त्यावरील कर रोखे व्यवहार मंडळ ठरवील.

समांतर घडामोडीत वस्तू व सेवाकर नेटवर्क ही ना नफा संस्था स्थापन करण्यात आली असून त्यात एकाच ठिकाणी सरकार, करदाते, इतर संबंधित यांच्यात समन्वय घडवला जाईल. या पोर्टलच्या माध्यमातून केंद्र सरकार प्रत्येक व्यवहारावर लक्ष ठेवणार आहे. करदात्यांना यात विवरणपत्रे सादर करणे व नोंदी ठेवणे सोपे जाणार आहे. यासाठी माहिती तंत्रज्ञानाच्या माध्यमातून खास यंत्रणा उभारली जाणआर असून जीएसटीएनचे भांडवल १० कोटी म्हणजे १६ लाख डॉलर्स असणार आहे. त्यात केंद्र सरकार व राज्य सरकारचा वाटा प्रत्येकी २४.५ टक्के राहील तर उर्वरित वाटा खासगी बँकांचा असेल. जीएसटी कायद्याची अंमलबजावणी १ सप्टेंबर २०१७ पर्यंत होणे अपेक्षित आहे. अगदी उशिरात उशीर म्हणजे १२ सप्टेंबर २०१७ पर्यंत ती आवश्यकता असून त्यानंतर मागील कर अस्तित्वात राहणार नाहीत. त्यामुळे सरकारने १ जुलै २०१७ रोजी जीएसटी लागू केला त्यात सर्व कर एकत्र केले व एकच कर लागू केला. देश कराविना राहू शकत नाही. त्यामुळे दिवसरात्र एक करून सरकारने १जुलैला जीएसटी लागू केला.

**समांतर घडामोडीत वस्तू व सेवाकर नेटवर्क ही ना नफा संस्था स्थापन करण्यात आली असून त्यात एकाच ठिकाणी सरकार, करदाते, इतर संबंधित यांच्यात समन्वय घडवला जाईल. या पोर्टलच्या माध्यमातून केंद्र सरकार प्रत्येक व्यवहारावर लक्ष ठेवणार आहे. करदात्यांना यात विवरणपत्रे सादर करणे व नोंदी ठेवणे सोपे जाणार आहे.**

संसद भवनात झालेला त्याबाबतचा कार्यक्रम ऐतिहासिकच होता. काही करांच्या दरांबाबत मतभेद होते, ज्या पद्धतीने जीएसटी लागू केला त्यावर काही उद्योगांनी नवीन कर प्रणाली अंमलात आणताना काही वेळ लागेल असे मत व्यक्त केले होते. नवीन कायद्यामुळे काही प्रमाणात संशय व गोंधळाचे वातावरण असणे स्वाभाविकच होते. काही नागरिकांना अचानक त्यांची बिले वाढलेली दिसली तर काहींना देश डेस्टीनेशन टॅक्सकडे गेल्याचे समजले नाही. हा उपभोक्ता कर आहे, जिथे वस्तूचा वापर किंवा उपभोग झाला तिथे तो कर लागतो. आंध्र प्रदेश, महाराष्ट्र, तामिळनाडू या राज्यात उत्पादित झालेली वस्तू ही दिल्ली, चंडीगड, जयपूर किंवा लखनौ या पैकी कुठेही वापरली जाणार असेल तर तेथे तो कर लागू होईल. उत्पादन करणाऱ्या राज्यात नाही. ८ नोव्हेंबर २०१६ रोजी निश्ललनीकरणानंतर पहिल्याच आठवड्यात लोक गोंधळात पडले तर जीएसटीमुळे १ जुलै २०१७ नंतर काही काळ बिले वाढल्याने लोकांची प्रतिक्रिया धक्का बसल्यासारखी होती. सरकारचा यातील हेतू स्वच्छ व स्पष्ट होता. यामुळे एक देश एक कर उद्दिष्ट साध्य होत आहे. त्याचबरोबर एकात्म बाजारपेठ जागतिक प्रमाणकांशी निगडित होऊन अस्तित्वात येत आहे. ही बाजारपेठ जागतिक बाजारपेठांशी स्पर्धा करू शकेल. जीएसटी हा काळ्या पैशावरील दुसरा लक्ष्यभेद हल्ला आहे कारण प्रत्येक व्यापाऱ्याला आता जीएसटीआयएन नोंदणी क्रमांक घ्यावा लागेल व महिन्याला किंवा तीन महिन्याला जमा विवरणपत्र द्यावे लागेल. आता प्रत्येक व्यापाऱ्याला असा हिशेब देणे अनिवार्य आहे.

जीएसटीमध्ये १५ ते २० कर एकत्र आहेत. त्यात एकात्म बाजारपेठ तयार करण्याचा हेतू असून देशात वस्तूंच्या किंमती एकसमान राहतील.

यात काही वस्तू स्वस्त तर काही महाग असा परिणाम होणार आहे.

जीएसटी हा साधा कर आहे पण त्याची अंमलबजावणी खूप अवघड आहे कारण तो पाच स्तरांचा आहे. प्रत्येक वस्तूवरचे कर पाच स्तरात असतील. आलिशान वस्तू महाग असतील तर सामान्य लोकांच्या वापराच्या वस्तू स्वस्त असतील. यात नवीन काही नाही. अनेक देशात जीएसटीचा वापर हा आंतरराष्ट्रीय स्पर्धात्मकतेसाठी आहे. जीएसटीचा जास्तीत जास्त दर हा जगात २८ टक्के आहे तर ब्रिटन व अमेरिकेत जीएसटी १७ टक्क्यांपेक्षा जास्त नाही.

जीएसटीची संकल्पना वेगळी आहे. त्यात स्त्रोतातच कर नाही. तो उपभोग स्थानाशी निगडित कर आहे. तामिळनाडूत उत्पादन झालेली वस्तू दिल्लीत पोहोचेल तेव्हा तेथे विकत घेणारा ग्राहक त्यावर कर देईल. या करात केंद्र व राज्याचा वाटा असेल. जर हॉटेलचा कर १८ टक्के असेल तर त्यातील ९ टक्के सीजीएसटी म्हणजे केंद्रीय कर असेल तर ९ टक्के एसजीएसटी म्हणजे राज्याचा कर असेल. ते बिलांमध्ये दिसून येईल. आता हॉटेलात जेवणे, विमानाने प्रवास करणे, एसी-फ्रीज- वॉशिंग मशीन वापरणे महाग होणार आहे. म्हणजे काही वस्तू महाग होणार आहेत. किमान १२००वस्तूंवरचा जीएसटी हा १८ टक्के आहे, त्यात एकूण ८१ टक्के वस्तूंचा समावेश आहे.

स्वस्त होणाऱ्या खाद्य वस्तू - दूध पावडर, दही, ताक, मध, दुग्धजन्य उत्पादने. चीज, मसाले, चहा, गहू, तांदूळ, पीठ, शेंगदाणा तेल, पाम तेल, सूर्यफूल तेल, खोबरेल तेल, मोहरीचे तेल, साखर, गूळ, साखरेचे पदार्थ, पास्ता, स्पॅघेटी, मॅक्रोनी, नूडल्स, फळे व भाज्या, लोणची. मुरंबा, चटणी, गोड मिठाई.

**जर हॉटेलचा कर १८ टक्के असेल तर त्यातील ९ टक्के सीजीएसटी म्हणजे केंद्रीय कर असेल तर ९ टक्के एसजीएसटी म्हणजे राज्याचा कर असेल. ते बिलांमध्ये दिसून येईल. आता हॉटेलात जेवणे, विमानाने प्रवास करणे, एसी-फ्रीज- वॉशिंग मशीन वापरणे महाग होणार आहे. म्हणजे काही वस्तू महाग होणार आहेत.**

स्वस्त होणाऱ्या नेहमीच्या वापरातील वस्तू- आंघोळीचा साबण, डिटर्जंट पावडर, साबण, टिश्यू पेपर, नॅपकिन्स, आगपेट्या, मेणबत्त्या, कोळसा, केरोसिन, एलपीजी, चमचे, डोक्याला लावण्याचे तेल, लॅडल्स, स्कीमर्स, केक सर्व्हर, मासा कापण्याचे चाकू, टंग, अगरबत्ती, टूथपेस्ट.

स्वस्त होणारी स्टेशनरी- वह्या, पेन, कागद, आलेख कागद, शाळेच्या बॅग, स्वाध्याय पुस्तिका, चित्रकला वह्या, पार्चमेंट पेपर, कार्बन पेपर, प्रिंटर,

स्वस्त होणारी आरोग्यसाधने- इन्शुलिन, एक्स रे फिल्म, निदान संच, चष्म्याच्या काचा, मधुमेहाची औषधे, कर्करोगाची औषधे.

स्वस्त होणारे कपडे- रेशीम, लोकरी धागे, खादी धागे, गांधी टोपी, ५०० रूपयांखालील चपला, १००० रूपयांपर्यंतचे कपडे.

जीएसटीचे दर कमी असल्याने भाववाढ कमी होईल व आर्थिक वाढ तातडीने सुधारणार नाही असे बोलले जाते पण प्रत्यक्षात याचा कंपन्यांना फायदा होणार आहे. अनेक अर्थतज्ञांनी जीएसटी दरामुळे भाववाढ कमी होण्याचा अंदाज व्यक्त केला आहे. भारतातील उत्पादन प्रकल्पांची आता काही प्रमाणात फेररचना करावी लागणार आहे कारण आपण जीएसटी पद्धत स्वीकारली आहे. आता अनेक लहान कंपन्या जीएसटीच्या जाळ्यात येणार आहेत व त्यांना जीएसटीआयएन नोंदणी करावी लागणार आहे.

यात भाववाढ कमी होणार असली तरी अर्थतज्ञांच्या मते त्याचा परिणाम म्हणून रिझर्व बँक पुढील धोरणात दर कमी करील अशी शक्यता नाही. रिझर्व बँक मान्सूनच्या स्थितीचा आढावा घेईल व नंतरच निर्णय घेईल, शिवाय त्यात जीएसटीचा आढावाही घेतला जाईल, इंडिया रेटिंग्जचे मुख्य अर्थशास्त्रज्ञ सुनील सिन्हा यांच्या मते जीएसटीचे पाच परिणाम नजीकच्या काळात होतील. त्यात पहिला परिणाम म्हणजे कंपन्यांची कामकाज पद्धती बदलेल, यात नवीन करामुळे अनेक




कंपन्यांना त्यांच्या कामकाजाची फेररचना करावी लागेल. आता ते विक्रेते व पुरवठादारांना इनव्हॉइसेस देण्यास सांगतील ती दरपत्रके किंवा बिले असतील, कारण जीएसटीमुळे आता कुणालाच करचुकवेगिरी करता येणार नाही. मोठ्या कंपन्यांचा यात फायदा आहे. त्या पुरवठादारांकडून आलेल्या मालावरील कराचा विचार करतील. लहान उद्योगांना जास्त खर्च करावा लागेल. कारण नियम पालनाचा खर्चच जास्त असेल. उत्पादन प्रकल्प अबकारी कर मुक्त भागात किती आहेत हे यात महत्वाचे असेल. जीएसटीमुळे पुरवठा साखळीत बचत होऊन असंघटित उद्योगांकडून संघटित उद्योगांकडे वाटचाल होईल,असे जेफरीज या आर्थिक आस्थापनेने म्हटले आहे.

कमी झालेल्या कराचा फायदा ग्राहकांना कसा देणार हा एक प्रश्न यात आहे, अर्थमंत्र्यांच्या नेतृत्वाखालील जीएसटी समिती कमी कराचा फायदा ग्राहकांना मिळतो की नाही यावर नजर ठेवणार आहे. पण नफेखोरीविरोधातील या धोरणाच्या अंमलबजावणीबाबत काही जण साशंक आहेत. जीएसटी कर कमी झाल्याने त्याचा फायदा कंपन्या ग्राहकांना देतील असे अपेक्षित आहे पण त्यावर तज्ज्ञात मतैक्य नाही. काही प्रमाणात ते फायद्याची रक्कम राखून ठेवतील त्यात वाहतूक खर्च, व इतर सवलती यांचा लाभ ग्राहकांना दिला जाणार नाही असे नोमुरा या अर्थसेवा कंपनीचे मत आहे. जीएसटीचा भर जरी नफेखोरीविरोधात असला तरी कर कमी झाल्याचा व इनपुट क्रेडिट दर कमी झाल्याचा फायदा ग्राहकांपर्यंत पोहोचवण्याची प्रक्रिया सोपी नाही. घाईने त्याची अंमलबजावणी केली तर ते योग्य होणार नाही ते दर नियंत्रणासारखे होईल. कंपन्या काही प्रमाणात जीएसटी कर कपातीचा फायदा नफ्यासाठी करतील व काही प्रमाणात पैसा नवीन प्रकल्पात गुंतवतील असे सांगितले जाते.

जीएसटी प्रणालीचा परिणाम वर्षभरानंतरच समजेल असे काही कर तज्ज्ञांचे मत आहे पण त्याचा तातडीचा परिणाम काही प्रमाणात ग्राहकांवर होणार आहे. इनपुट क्रेडिटच्या माध्यमातून व्यापाऱ्यांना फायदा होणार आहे. यात सरकारला नेमका किती महसूल मिळणार हे नंतरच कळेल. त्यासाठी काही काळ वाट पहावी लागेल. सेवा, बँकिंग, दूरसंचार या गोष्टी महागणार आहेत तसेच फ्लॅट खरेदी, तयार कपडे (हजार रूपयांच्या पुढील), मोबाईल बिले, शिकवणी शुल्क यात ग्राहकांना फटका बसणार आहे. जीएसटीमुळे फ्लॅट व दुकान खरेदीवर १२ टक्के कर लागणार आहे.परदेशी गुंतवणूकदारांनी जीएसटीचे स्वागत केले असून त्यांना त्यांच्या वस्तू आता २३ राज्यात अडथळ्याविना पाठवता येतील कारण आता कुठलेच तपासणी नाके नसतील. निधी व्यवस्थापक जिम रॉजर्स यांनी भारतीय कंपन्यांतील समभाग विकून २०१५ मध्ये सरकारने गुंतवणूकदारांचा अपेक्षाभंग केल्याचे म्हटले होते. ते आता परत भारतीय बाजारपेठेत येऊ इच्छितात. कारण आता आर्थिक सुधारणेचा जीएसटीचा टप्पा गाठला गेला आहे. आताच्या

**जीएसटी प्रणालीचा परिणाम वर्षभरानंतरच समजेल असे काही कर तज्ज्ञांचे मत आहे पण त्याचा तातडीचा परिणाम काही प्रमाणात ग्राहकांवर होणार आहे. इनपुट क्रेडिटच्या माध्यमातून व्यापाऱ्यांना फायदा होणार आहे. यात सरकारला नेमका किती महसूल मिळणार हे नंतरच कळेल. त्यासाठी काही काळ वाट पहावी लागेल.**

परिस्थितीतही भारतीय बाजारपेठ टिकून आहे हे लक्षणीय असून आपण संधी हुकवली असे ते म्हणतात. जीएसटीमुळे भारतात एकात्मिक बाजारपेठ तयार होईल असे त्यांनी एका चर्चेत सांगितले.

या सगळ्याचा मतितार्थ म्हणजे जीएसटी हा निश्चलनीकरणानंतर काळ्यापैशावरील दुसरा लक्ष्यभेद हल्ला आहे. त्यात कर चुकवेगिरी करणाऱ्यांना फटका बसेल व अनेक व्यापारी कराच्या जाळ्यात ओढले जातील. मालाची आवक-जावक सहज होईल. एकात्मिक बाजारपेठेमुळे परदेशी गुंतवणूकदार आकर्षित होतील, काही बिले वाढल्याने ग्राहकांची अडचण झाली असली तरी काही वस्तू स्वस्तही झाल्या आहेत. किमान ८१ टक्के वस्तूंवरील जीएसटी कर असा आहे की त्या स्वस्त होत आहेत. काही काळ त्रास सहन करावा लागला तरी दीर्घकालीन विचार करता जीएसटीचा फायदा आहे. कुठलेही वळण घेताना होते तसे जीएसटी ही नवी करप्रणाली असताना झाले आहे. थोडा काळ अवघड जाईल ते तर नैसर्गिकच असते.

**एकात्मिक बाजारपेठेमुळे परदेशी गुंतवणूकदार आकर्षित होतील, काही बिले वाढल्याने ग्राहकांची अडचण झाली असली तरी काही वस्तू स्वस्तही झाल्या आहेत. किमान ८१ टक्के वस्तूंवरील जीएसटी कर असा आहे की त्या स्वस्त होत आहेत. काही काळ त्रास सहन करावा लागला तरी दीर्घकालीन विचार करता जीएसटीचा फायदा आहे.**

■ ■ ■

*लेखक पीटीआय वृत्तसंस्थेत आर्थिक विषयाचे संपादक असून ते एलओजी या हॅम्बर्ग येथील नियतकालिकाचे सहयोगी संपादक होते. पत्रकार म्हणून त्यांनी तीस देशात प्रवास केला आहे. सध्या ते पुणे येथील कार्पोरेट टायकून्स व बंगलोरच्या द फ्लॅग पोस्ट या नियतकालिकाचे कार्यकारी संपादक आहेत.*

*Email: feedback@ashoktnex@gmail.com*



# नफेखोरी: जीएसटीच्या अंमलबजावणीतील एक आव्हान

- गिरीश चंद्र प्रसाद



***विविध आर्थिक बाजूंचा विचार करता, ही नवीन करव्यवस्था व्यापारी व गुंतवणूकदारांना फायदेशीर ठरणारी आहे, यात शंका नाही. परंतु, करपध्दतीत बदल करताना देशातील सर्वसामान्य ग्राहकांना वस्तू व सेवा घेताना कमीतकमी कर द्यावा लागेल हा प्रमुख उद्देश धोरणकर्त्यांसमोर होता. वस्तू व सेवा कर हा मुख्यत: ग्राहकांचे हित जोपासण्यासाठी आहे. परंतु करनियमांत पळवाटा शोधून अनेक व्यापारी यातूनही प्रचंड नफा कमवण्याचे मार्ग शोधतात.***

भारत सरकारने नुकतेच केंद्र व राज्य सरकारचे १७ विविध प्रकारचे कर रद्द करत, वस्तू आणि सेवा कर अर्थात goods and service tax (GST) ही एकसामाईक करप्रणाली स्वीकारून २.३ ट्रीलीअन डॉलरची संभाव्य उलाढाल राहिल अशा भक्कम बाजारव्यवस्थेचा पाया रचला. विविध आर्थिक बाजूंचा विचार करता, ही नवीन करव्यवस्था व्यापारी व गुंतवणूकदारांना फायदेशीर ठरणारी आहे, यात शंका नाही. परंतु, करपध्दतीत बदल करताना देशातील सर्वसामान्य ग्राहकांना वस्तू व सेवा घेताना कमीतकमी कर द्यावा लागेल हा प्रमुख उद्देश धोरणकर्त्यांसमोर होता. वस्तू व सेवा कर हा मुख्यत: ग्राहकांचे हित जोपासण्यासाठी आहे. परंतु करनियमांत पळवाटा शोधून अनेक व्यापारी यातूनही प्रचंड नफा कमवण्याचे मार्ग शोधतात. मलेशिया, ऑस्ट्रेलिया सारख्या देशांत जेव्हा वस्तू व सेवा कराची अंमलबजावणी सुरू झाली त्यावेळी तेथील काही व्यापाऱ्यांनी मोठ्या प्रमाणात सट्टेबाजी करून प्रचंड प्रमाणात अतिरिक्त नफा कमवल्याची उदाहरणे समोर आली होती. व्यापारी व उद्योजकांनी एकसामाईक कराचे लाभ ग्राहकांपर्यंत पोहचवावेत, यासाठी भारत सरकार सुरूवातीपासूनच महत्वपूर्ण पाऊले उचलत आहे. यामध्ये काळा बाजार व सट्टेबाजीविरोधी मंडळाची स्थापना करणे, वस्तू व सेवा कर व त्यानुसार वस्तूंचे दर याबाबत सर्व थरातील ग्राहकांना जागरूक करणे व योग्य माहितीद्वारे लबाड व्यापाऱ्यांकडून ग्राहकांची होणारी दिशाभूल रोखणे इ. काही उपाययोजना करण्यात येत आहेत.

आधीच्या गुंतागुंतीच्या व जाचक करप्रणालीच्या तुलनेने वस्तू व सेवा कर ही करपध्दती समजण्यास सोपी व पारदर्शी आहे. अगदी पुरवठा साखळीतील शेवटच्या ग्राहकालाही वस्तू अथवा सेवेवर नेमका किती कर भरावा लागेल, याचा अचूक दर या पध्दतीत निश्चित करण्यात आलेला आहे. आधीच्या करपध्दतीत ग्राहकाला केवळ किरकोळ बाजारातील वस्तू खरेदीवर राज्य सरकार कडून आकारल्या जाणाऱ्या

मूल्य वर्धित कराचा दर किंवा केंद्र सरकारकडून आकारल्या जाणाऱ्या सेवा कराचे मूल्य कळू शकत असे. परंतु, त्या वस्तू अथवा सेवेच्या उत्पादनापासून पुरवठ्यापर्यंतच्या टप्प्यांत येणाऱ्या बाकी करांबाबत मात्र कोणताही खुलासा ग्राहकांना मिळत नसे. उदाहरणार्थ, उत्पादनाच्या कारखान्यातून वस्तू बाहेर जातांना त्यावर लावले जाणारे सीमा शुल्क किंवा दूरसंचार कंपन्यांनी उपकरणांवर लावलेला कर इ.

सर्वसाधारणपणे वस्तू आणि सेवा करामुळे मूळ वस्तू किंवा सेवेची किंमत जास्त वाटते, परंतु प्रत्यक्षात प्रत्येकवेळी तसे नाही. किंबहुना, वस्तू व सेवा कराबाबत सुरूवातीला सर्वत्र महागाई वाढणार असा समज पसरवून काही व्यापारी ग्राहकांकडून जास्त किंमती आकारू शकतात. हा धोका टाळण्यासाठी सरकारने सुरूवातीपासूनच योग्य खबरदारी घेतली आहे.

वस्तू व सेवा करप्रणाली उद्योजकांना त्यांच्या व्यवसायिक उत्पादनावरील कर भरण्यासाठी आधीच्या पुरवठा साखळीच्या टप्प्यांतील देवाणघेवाणीत भरलेल्या करावरील क्रेडीट वापरण्याची मुभा देते. अशी सोय पूर्वीच्या करप्रणालीत नव्हती. उदाहरणार्थ, दूरसंचार सेवा देणाऱ्या कंपन्या त्यांच्या व्यवसायाच्या सुरूवातीला केलेल्या उपकरणांच्या खरेदीच्या वेळी भरलेल्या करावरील सवलत वापरून ग्राहकांना सेवा देतांना लागू होणारा वस्तू व सेवा कर भरण्यास वापरू शकतात. यामुळे जरी वस्तू व सेवा कराचा दर पूर्वीच्या करप्रणालीपेक्षा जास्त असला तरी मूळ वस्तू किंवा सेवेवरील एकूण कराचे ओझे कमी होण्यास मदत होते.

११ जून रोजी वस्तू व सेवा कर परिषदेच्या बैठकीनंतर अर्थमंत्री अरूण जेटली यांनी सांगितले की, परिषदेने अनेक वस्तू व सेवांवरील कराचा दर कमी करण्यासाठी विशेष रचना केली असून पूर्वीच्या करप्रणालीपेक्षाही अत्यावश्यक वस्तू व सेवांचे मूल्य वस्तू व सेवा करप्रणाली लागू झाल्यावर कमी असेल. ग्राहकांच्या खर्च करण्याच्या सवयीं व कल यांतील बदल तसेच अर्थव्यवस्थेतील बदलांचे वास्तव लक्षात घेऊनच वस्तू व सेवा कराच्या दररचनेत योग्य व आवश्यक असे फेरफार वस्तू व सेवा कर परिषदेने जून महिन्यात झालेल्या बैठकीत सुचवले. त्यानुसार ६६ वस्तू व सेवांवरील कराच्या दरात बदल करण्यात आले.

**ग्राहकांच्या खर्च करण्याच्या सवयीं व कल यांतील बदल तसेच अर्थव्यवस्थेतील बदलांचे वास्तव लक्षात घेऊनच वस्तू व सेवा कराच्या दररचनेत योग्य व आवश्यक असे फेरफार वस्तू व सेवा कर परिषदेने जून महिन्यात झालेल्या बैठकीत सुचवले. त्यानुसार ६६ वस्तू व सेवांवरील कराच्या दरात बदल करण्यात आले.**

वस्तू व सेवा कर लागू करतांनाच व्यापाऱ्यांकडून होणाऱ्या सट्टेबाजी व अतिरिक्त नफा मिळवण्याच्या विरोधी कलमाची तरतूद करण्यात आली आहे. यामागचा उद्देश व्यापाऱ्यांकडून होणारी नफेखोरी रोखणे व ग्राहकांना वस्तू व सेवा कराचे सर्व लाभ मिळवून देणे हा आहे.

केंद्रिय वस्तू व सेवा कर कायद्यातील तरतूदीनुसार, कोणत्याही वस्तू वा सेवेच्या पुरवठ्यात करातील कमी दराचा लाभ हा ती वस्तू वा सेवा घेणाऱ्या ग्राहकाला त्या वस्तू वा सेवेसाठी कमी किंमत द्यावी लागून मिळावा. नफेखोरी विरोधात स्थापन करण्यात येणाऱ्या केंद्रिय समितीत अध्यक्ष पदावर सचिव पातळीवरील अधिकारी असेल. या समितीमार्फत वस्तू व सेवा करासंबंधीत नफेखोरीच्या घटनांची दखल घेतली जाई व केंद्रिय अबकारी व सीमाशुल्क मंडळाच्या संचालकांतर्फे या घटनांची सखोल चौकशी करण्यात येईल.

चौकशीनंतर सदर वस्तू वा सेवेचा पुरवठा करणाऱ्या व्यापाऱ्यास कमी दरात ती वस्तू वा सेवा देणे किंवा ग्राहकाला न मिळालेल्या कराची सर्व किंमत परत देणे यापैकी एक शिक्षा लागू होईल. तसेच वस्तू वा सेवेचा पुरवठादार नफेखोरी करतांना दोषी आढळल्यास, त्यांना ग्राहकांपर्यंत न दिलेल्या कराच्या लाभाच्या किंमतीवर १८ टक्के व्याजाची रक्कम भरावी लागेल. जर ग्राहक वस्तू व सेवा करप्रणालीतून

मिळणाऱ्या करलाभाची मागणी स्वत:हून करत नसेल, तर ही रक्कम थेट पुरवठादाराकडून वस्तू व सेवा कर समितीकडे जमा होण्याची तरतूद करण्यात आली आहे. थोडक्यात, नफेखोरी करण्यातून व्यापाऱ्यांना मोठ्या प्रमाणात रक्कम दंड म्हणून भरावी लागेल शिवाय यामुळे सदर व्यवसायाची नोंदणी रद्द होण्याचीही शिक्षा होऊ शकते. वरील दंडात्मक कारवाई कडक वाटत असली तरिही वस्तू व सेवा करपध्दतीची प्रभावी अंमलबजावणी होऊन त्याचे लाभ सर्वांना मिळावे असा सरकारचा उद्देश आहे. नफेखोरीला आळा बसावा यासाठीची दंडात्मक तरतूद वस्तू व सेवा कराच्या सुरूवातीच्या टप्प्यावर मोठ्या प्रमाणात राबवली जाईल, जेणेकरून नफेखोरीला वचक बसून बाजारव्यवस्थेला भक्कमपणा मिळेल.

एकसमान व प्रभावी अशी करपध्दती लागू करतांना सरकारने आवश्यक ती सर्व खबरदारी घेतली असल्यामुळे वस्तू व सेवा कराच्या अंमलबजावणीतून ग्राहकांना मिळणारे लाभ त्यांच्यापर्यंत पोहचवण्यासाठी आवश्यक ती यंत्रणा कार्यान्वित करतांना आतापर्यंत, देशभरातील सर्व व्यापारीवर्गाकडून सरकारला चांगले सहकार्य लाभले. शुक्रवार १ जुलै च्या मध्यरात्री १२ वाजता नवी दिल्लीच्या संसदिय सभागृहात पार पडलेल्या सोहळ्यात माननीय राष्ट्रपती श्री. प्रणब मुखर्जी व माननीय पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांनी अधिकृतरित्या वस्तू व सेवा कर लागू झाल्याची घोषणा केली. त्यानंतरच्या दिवशी म्हणजे २ जुलैपासूनच ॲपल या जगप्रसिध्द ब्रँड ने आपल्या सर्व वस्तूंचे दर कमी केले. हिंदुस्तान युनिलिवर लिमिटेड या कंपनीच्या काही साबण व धुण्याच्या पावडरींच्या किंमतीही खालावल्या. तसेच हिरो मोटो कॉर्प लिमिटेड या दुचाकी वाहन निर्मिती करणाऱ्या जगप्रसिध्द कंपनीनेही त्यांच्या काही दुचाकींच्या किंमतींत ४०० ते १८०० रूपयांची घट लागू केली.

**अप्रत्यक्ष करांचे ओझे कमी होण्यामुळे वस्तू व सेवांच्या किंमती कमी होऊन घाऊक बाजारातील महागाईला आळा बसण्यास मदत होईल. यामुळे अर्थव्यवस्थेत मागणीचा ओघ वाढेल तसेच करव्यवस्थेला मजबूती मिळेल. केंद्र व राज्य सरकारला मिळणाऱ्या करउत्पन्नातील वाढ शासनास नागरिकांसाठी पायाभूत सोईसुविधांच्या निर्मिती करण्यास प्रोत्साहन देईल.**

वस्तू व सेवा घेताना त्यावरील करसवलतीचे फायदा ग्राहकांना मिळणे महत्वाचे आहे, कारण अप्रत्यक्ष कराचे लाभ गरिब मध्यमवर्गीय अथवा श्रीमंत अशा सर्व आर्थिक स्तरातील लोकांपर्यंत एकसमानपणे पोहचणारे असतात. हा नियम उत्पन्न कराला लागू होत नाही कारण आयकर हा करदात्याच्या उत्पन्नावर आधारित असतो. अप्रत्यक्ष करांचे ओझे कमी होण्यामुळे वस्तू व सेवांच्या किंमती कमी होऊन घाऊक बाजारातील महागाईला आळा बसण्यास मदत होईल. यामुळे अर्थव्यवस्थेत मागणीचा ओघ वाढेल तसेच करव्यवस्थेला मजबूती मिळेल. केंद्र व राज्य सरकारला मिळणाऱ्या करउत्पन्नातील वाढ शासनास नागरिकांसाठी पायाभूत सोईसुविधांच्या निर्मिती करण्यास प्रोत्साहन देईल. कोणत्याही खाजगी उद्योगांसाठीही ही करव्यवस्था व यातून विकसित होणारी बाजारातील स्पर्धात्मकता अप्रत्यक्ष करांचे फायदे ग्राहकांपर्यंत पोहचवण्यास भाग पाडते, कारण कोणत्याही उद्योगासाठी त्याची बाजारातील पत खालावणे व्यावसायिकदृष्ट्या नुकसानदायक ठरणारी बाब असते.

वस्तू व सेवा कराचा कोणताही आर्थिक ताण गरिब जनतेला होऊ नये, यासाठी केंद्रिय अप्रत्यक्ष कर समितीचे अध्यक्ष अर्थमंत्री श्री. अरूण जेटली व समितीच्या सदस्यांनी सर्व वस्तू व सेवांसाठी कर ठरवतांना कराचा एकच दर न ठेवता, ५ टक्के, १२ टक्के, १८ टक्के, आणि २८ टक्के अशा चार वेगवेगळ्या दरांनी वस्तू व सेवानिहाय करांची विभागणी ठरवली. यात सर्वसामान्य व दैनंदिन गरजांच्या वस्तू व सेवांसाठी कमीतकमी करदर असेल अशी रचना केली आहे. त्याउलट हौसेमौजेच्या व उच्च आरामदायी वस्तू व सेवांवर कराचा दर अधिक ठेवण्यात आला आहे. करपध्दतीत समतोल साधत

व आधीच्या कररचनेपेक्षा सुलभ अशीच करपध्दती ठेवण्याची योग्य काळजी घेऊनच आताच्या वस्तू व सेवा कराची रचना करण्यात आली आहे. कापड उद्योगासारख्या काही उद्योगांना वस्तू व सेवा करातून पूर्णपणे सूट दिली जावी अशी मागणी सध्या फार जार धरत आहे, परंतु, कापडउद्योगाला वस्तू व सेवा करातून वगळणे दिर्घकालीनदृष्ट्या चुकीचे धोरण ठरेल. कारण जर एखादे उत्पादन वस्तू व सेवा करातून वगळले गेल्यास, विक्रेता त्या उत्पादनाच्या निर्मितीसाठी लागणाऱ्या कच्च्या मालावर लागणाऱ्या करावर सूट मिळवू शकत नाही, त्यामुळे विक्रेत्यालाही जास्त किंमतीतच ते उत्पादन उत्पादकाकडून घ्यावे लागेल, व त्याअनुषंगाने त्या उत्पादनाचे बाजारमूल्यही अधिक भरते.

उद्योग जगताला वस्तू व सेवा कराबाबत पडलेली एक प्रमुख शंका अशी की, या कराद्वारे काही सेवांवरील कराचे ओझे वाढेल. परंतु, जागतिक स्तरावर मान्य करण्यात आलेल्या पध्दतीप्रमाणेच आपल्या देशातही वस्तू व सेवा कर लावतांना धोरणकर्त्यांनी वस्तूंप्रमाणेच समतोलाचे सूत्र वापरून प्रमुख सेवांवरील कराचा दर निश्चित केला आहे. उदाहरणार्थ, वस्तू व सेवा कर लागू झाल्यापासून दूरसंचार सेवांवरील कराचा दर पूर्वीच्या १५ टक्केएवजी १८ टक्के झाला आहे. यामुळे दूरसंचार सेवा देणाऱ्या कंपन्यांना भीती आहे की, याचा परिणाम म्हणून टेलिफोन बिलाचे दर वाढतील. यावर स्पष्टीकरण देतांना २६ मे रोजी झालेल्या वस्तू सेवा कर परिषदेच्या बैठकीत सांगण्यात आले की, दूरसंचार कंपन्यांना आधी स्पेक्ट्रम खरेदीच्या वेळी भरलेल्या सेवा करावरील व उपकरणांच्या आयातीवरील सेवा करावर मिळालेल्या कर सवलती या आताच्या सेवा करातील दर वाढीच्या तुलनेने जास्त आहेत. त्यामुळे यंदाच्या वर्षी

---

**उद्योग जगताला वस्तू व सेवा कराबाबत पडलेली एक प्रमुख शंका अशी की, या कराद्वारे काही सेवांवरील कराचे ओझे वाढेल. परंतु, जागतिक स्तरावर मान्य करण्यात आलेल्या पध्दतीप्रमाणेच आपल्या देशातही वस्तू व सेवा कर लावतांना धोरणकर्त्यांनी वस्तूंप्रमाणेच समतोलाचे सूत्र वापरून प्रमुख सेवांवरील कराचा दर निश्चित केला आहे.**

---

वस्तू व सेवा कर भरतांना दूरसंचार कंपन्यांना आधीच्या वर्षी भरलेल्या सेवा करावरील सवलतीनुसार या वर्षी रोख भरतांना ८७ टक्के सवलत मिळेल.

केरळ राज्याचे अर्थमंत्री थॉमस ईसाक व जम्मू काश्मिरचे अर्थमंत्री हसीब ध्राबू यांनीही मे महिन्यात झालेल्या वस्तू व सेवा कर परिषदेच्या बैठकीत वस्तू व सेवा कराच्या अंमलबजावणीत कमी झालेल्या कराचे लाभ ग्राहकांपर्यंत पोहचवले जावे, या मुद्याला‍च अधोरेखित केले होते. यावर केंद्रिय महसूल सचिव हसमुख अढिया यांनी स्पष्टीकरण देताना सांगितले की, नफेखोरी विरोधी मंडळ वस्तू व सेवा कर लागू झाल्यापासून सर्व मोठ्या व महत्वाच्या उद्योगांच्या सेवा व उत्पादनांच्या किंमतींचा व व्यावसायिक उलाढालींचा नियमित आढावा घेईल, ज्यातून अतिरिक्त नफेखोरीवर अंकुश ठेवण्यास मदत होईल. बदलाच्या या प्रक्रियेत काही लहानसहान चुकांनी ग्राहकांचे व व्यवस्थेचे फारसे नुकसान होणार नाही याबाबत सरकारला खात्री असून त्यानुसार येणाऱ्या बदलाच्या काळात वस्तू व सेवा कर परिषदेचा व कर अधिकाऱ्यांचा मुख्य भर हा उद्योग जगताला नवीन करप्रणालीशी संगनमत घडवून आणण्यावर राहिल, असेही अढिया यांना स्पष्ट केले.

■ ■ ■

*लेखक नवी दिल्ली स्थित पत्रकार असून व्यापारविषयक पत्रकारितेचा त्यांना सतरा वर्षांचा अनुभव आहे.*

*Email: gureeshchandraprasad@gmail.com*

**आगामी अंक**

**गृहनिर्माण**

***सप्टेंबर २०१७***

# वस्तू व सेवा कर आणि महाराष्ट्राची अर्थव्यवस्था

-प्रा. जीवन बिरादार



***महाराष्ट्र हे प्रगत राज्य तर आहेच पण ते केंद्र सरकारचे कोणतेही कायदे व निर्णय अमलबजावणीमध्ये आघाडीचे म्हणून ओळखले जाते. त्यामुळे महाराष्ट्र आणि वस्तू व सेवा कर या विषयाचा ऊहापोह करणे अत्यंत महत्वाचे आहे.***

देशभरात १ जुलै २०१७ पासून वस्तू व सेवा कर (GST) लागू करण्यात आला. काही दिवसानंतर लगेचच महाराष्ट्र आणि तामिळनाडू सारख्या राज्यांनी काही स्थानिक करामध्ये वाढ केली. या संदर्भात महाराष्ट्र सरकारने खाजगी दुचाकी व चारचाकी वाहन नोंदणी करा मध्ये २ % नी वाढ केली आहे. महाराष्ट्र हे प्रगत राज्य तर आहेच पण ते केंद्र सरकारचे कोणतेही कायदे व निर्णय अमलबजावणीमध्ये आघाडीचे म्हणून ओळखले जाते. त्यामुळे महाराष्ट्र आणि वस्तू व सेवा कर या विषयाचा ऊहापोह करणे अत्यंत महत्वाचे आहे.

कोणत्याही सरकारला प्रशासन चालविण्यासाठी महसुलाची अत्यंत आवश्यकता असते. आजच्या जगात प्रत्येक शासन मग ते राज्यातील जरी असले तरी ते 'कल्याणकारी शासन' या नात्याने संबोधले जात आहे, तेव्हा हे शासन किंवा सरकार हे अर्थव्यवस्थेचे व पर्यायांनी समाजाचे पालकच असते. समाजात व अर्थव्यवस्थेत भरभराट व्हावी या हेतूने सरकार अनेक महत्वाची कार्य पार पडत असते. त्यासाठी लागणारा महसूल जमा करण्याचे एक साधन म्हणजे कर होय.

### कराचे प्रामुख्याने दोन प्रकार पडतात

१. प्रत्यक्ष कर,

२. अप्रत्यक्ष कर.

या दोन्ही करप्रणालीचे काही विशिष्ट असे उद्देश व साधने असतात. प्रत्यक्ष कर अर्थव्यवस्थेत राज्याच्या उत्पन्नाचे विभाजन समान पद्धतीने होण्यास हातभार लावतो तर अप्रत्यक्ष कर हा अर्थव्यवस्थेतील दुर्मिळ अशा नैसर्गिक साधनांचा पर्याप्त वापर व त्यासाठी योग्य दिशा देण्याचे कार्य करतो.

### वस्तू व सेवा कर म्हणजे काय?

वस्तू व सेवा कर हा एक सर्व प्रकारच्या वस्तू व सेवा यावर आकारला जाणारा 'एकच' स्वरूपाचा कर आहे. ही करप्रणाली १ जुलै २०१७ पासून लागू करण्यात आली आहे. हा एक प्रकारचा अप्रत्यक्ष कर आहे. यामुळे देशात वेगवेगळ्या स्वरूपाच्या

कराचे रूपांतर एकच कर प्रणाली मध्ये होणार आहे. यापूर्वी जे केंद्र सरकारचे 1. Excise Duty, 2. Countervailing Duty, 3. Service tax आणि राज्य सरकारचे 1. Value Added Tax (VAT), 2. Octroi and Entry Tax, 3.Luxury Tax हे नाहीसे होऊन एकच प्रकारचा कर द्यावा लागणार आहे तो म्हणजे वस्तू व सेवा कर होय. यामुळेच तर ही करप्रणाली जाहीर करत असताना पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी यांनी असे म्हटले आहे की 'एक राष्ट्र, एक कर, एक बाजारपेठ'! ही GST करप्रणाली आता जरी लागू झाली असली तरी यावर बऱ्याच वर्षांपासून विचारमंथन सुरु होते. यातूनच ही करप्रणाली प्रत्यक्षात अमलबजावणीसाठी तयार झाली आहे.

**कोणत्या 'वस्तू व सेवा' वर किती कर असेल ?**

GST कर प्रणाली अंमलबजावणी करत असताना जरी एक कर अशी घोषणा केली असली तरी 'एकच कर पण त्यांची टक्केवारी वेगवेगळी' असे वर्णन अधिक योग्य आहे असे आपणाला म्हणता येईल. यामध्ये खालील प्रमाणे विभागणी केलेली आहे.

अ) ०% GST- यामध्ये खुले खाद्यान्य, ताज्या भाज्या, अनब्रँडेड आटा, गुळ, दुध, अंडी, दही, लस्सी, खुले पनीर, अनब्रँडेड नैसर्गिक मध, खजूर, मीठ, काजळ, फुलभारी झाडू, मुलांची ड्राइग व कलरिंग पुस्तके, शिक्षण सेवा व आरोग्यविषयक सेवा इत्यादी चा समावेश होतो . या प्रामुख्याने सर्वसामान्य माणसाला जगण्यासाठी लागण्याच्या आवश्यक गोष्टी आहेत ज्यावर ०% GST आहे.

ब) ५% GST- यामध्ये साखर, चहा, भाजलेले कॉफीचे दाणे, खाध्यतेल, काजू, किशमिश, घरगुती गॅस, चप्पल (४०० रु. पर्यंत ), कपडे (१००० रु. पर्यत) अगरबत्ती इ . गोष्टीवर ५% एवढा GST लावण्यात आलेला आहे .

---

**GST कर प्रणाली अंमलबजावणी करत असताना जरी एक कर अशी घोषणा केली असली तरी 'एकच कर पण त्यांची टक्केवारी वेगवेगळी' असे वर्णन अधिक योग्य आहे असे आपणाला म्हणता येईल. यामध्ये खालील प्रमाणे विभागणी केलेली आहे.**

---

क ) १२% GST- यामध्ये मस्का, तूप, बदाम, फळांचा रस, छत्र्या, मोबाइल्स इ. व असे अनेक मध्यम वर्गीय उत्पन्न गटातील उपभोग घेणाऱ्या वस्तूवर १२% GST लावण्यात आला आहे.

ड ) १८ % GST- यामध्ये केसाचे तेल, टूथपेस्ट, साबण, पास्ता, सूप्स, आईस्क्रीम, संगणक, प्रिंटर इ. वस्तूचा समावेश होतो.

इ ) २८% GST- काही वस्तू वर २८% एवढा मोठा कर लावण्यात आला आहे. यामध्ये AC, फ्रिज, लहान कार, महागड्या मोटारसायकल, सिगारेट, BMW, लॉटरी किंवा सट्टा इत्यादी गोष्टीचा समावेश होतो. आशाप्रकारे जरी एक कर प्रणाली असली तरी दर मात्र वेगवेगळे असणार आहेत.

**GST मुळे महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेला होणारे संभ्यावत: फायदे -**

ही कर प्रणाली गेल्या ७० वर्षातील सर्वात मोठी कर सुधारणा आहे. महाराष्ट्र हे देशामध्ये विकसित राज्य असल्यामुळे आणि राज्यामध्ये खुप मोठ्या प्रमाणात आर्थिक उलाढाली चालत असल्यामुळे GST चा अर्थव्यवस्थेवर प्रभावी परिणाम होण्याची शक्यता आहे . या कर प्रणालीमुळे खालील फायदे होण्याची शक्यता आहे.

**१) कररचना सोपी आणि सुलभ होईल-**

GST मूळे राज्यातील कररचना ही सोपी आणि सुलभ होईल. आपल्या अर्थव्यवस्थ्येमध्ये खूप वेगवेगळ्या स्वरूपाचे आणि प्रकारचे कर व्यापारी व सर्वसामान्य जनतेला भरावे लागतात. या कर प्रणालीमुळे हि किचकट आणि गुंतागुंतीची कररचना सोपी, सुलभ, आणि अधिक सक्षम होण्यास मदत होईल. त्यातून करचुकवेगिरीला आळा बसण्यास मदत होईल.

**२) व्यापार व उद्योग क्षेत्रात चालना मिळेल-**

आर्थिक पाहणी अहवाल २०१६-१७ नुसार, उद्योग क्षेत्राचा

राज्याच्या उत्पन्नात ३४% एवढा वाटा आहे. GST मध्ये एकच प्रकारचा कर भरावा लागणार असल्यामुळे व्यापारी वर्गाला अनावश्यक त्रास होणार नाही व या क्षेत्राला चालना मिळेल. उत्पादक/पुरवठादार यांच्याकडून उपभोक्ता/किरकोळ विक्रेते यांच्यापर्यंत कर जमा करण्यासाठी सरळ विनाअडचणीच्या पद्धतीमुळे प्रत्येक स्तरावर कर भरावा लागणार नाही यामुळे व्यापारी व उध्दोग क्षेत्राला अधिक चालना मिळेल, यामुळे पर्यायाने राज्याच्या उत्पन्नात वाढ होण्यास चालना मिळेल.

**३) आर्थिक विकास व वृद्धी होण्यास मदत होईल-**

मागील दोन वर्षामधे राज्याचा वार्षिक विकासाचा दर भारतीय अर्थव्यवस्थेपेक्षा अधिक आहे. एकच प्रकारच्या कर प्रणालीमुळे (GST) मर्यादित व अतिमहत्त्वाच्या नैसर्गिक व मानवी संसाधनाचा पर्याप्त व चांगला वापर होण्यास चालना मिळेल ज्यामुळे राज्याचा आर्थिक विकास व वृद्धी यामध्ये वाढ होण्यास मदत होईल.

**४) सर्वसामान्य नागरिकांना दिलासा-**

GST हा अपत्यक्ष कर असल्यामुळे तो वस्तूची खरेदी करतो त्यावर लागत असतो किंबहुना तो त्याच्यावर ढकलला जातो. पण या GST मध्ये जीवनावश्यक व अत्यंत महत्त्वाच्या अत्यावश्यक वस्तू व सेवा वर ०%कर असल्यामुळं सर्वसामान्य नागरिकांना यांचा फायदा होणार आहे. शिक्षण व आरोग्य सेवा या सर्वसामान्य नागरिकांसाठी अत्यंत महत्त्वाच्या गोष्टी आहेत. यावर ०% कर असल्यामुळे महाराष्ट्रात या सेवा चांगल्या व स्वस्त दरात उपलब्ध होण्यास सुरुवात होईल. जे कि अर्थव्यवस्थेसाठी व राज्यातील समाजाच्या स्वाथ्यासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे असे म्हणता येईल.

**५) सरकारच्या महसूलामध्ये वाढ होईल -**

GST मुळे राज्य सरकारच्या महसुलात वाढ होण्याची शक्यता आहे. वेगवेगळ्या प्रकारच्या दरामुळे अर्थव्यवस्येतील वेगवेगळ्या वस्तू व सेवा यांच्या स्वरूपातून सरकारला महसूल जास्त प्रमाणात मिळेल व एक प्रकारची कर कार्यक्षमता आणि पारदर्शकता या प्रणाली मुळे निर्माण होईल. म्हणून येणाऱ्या काळामध्ये सरकारकडे अधिक महसूल जमा होऊन कल्याणकारी योजनांसाठी जास्त निधी उपलब्ध करून दिला जाईल.

---

GST **हा अपत्यक्ष कर असल्यामुळे तो वस्तूची खरेदी करतो त्यावर लागत असतो किंबहुना तो त्याच्यावर ढकलला जातो. पण या** GST **मध्ये जीवनावश्यक व अत्यंत महत्त्वाच्या अत्यावश्यक वस्तू व सेवा वर ०%कर असल्यामुळं सर्वसामान्य नागरिकांना यांचा फायदा होणार आहे.**

---

**महाराष्ट्र आणि GST-**

महाराष्ट्र हे एक प्रगत विचाराचे राज्य तर आहेच पण केंद्रातील अनेक चांगले कायदे आणि योजना यांची चांगली अंमलबजावणी यासाठी आपल्या राज्याकडे पहिले

| व्यापारी | ग्राहक | अर्थव्यवस्थ्या |
|---|---|---|
| अनेक करांऐवजी एक कर | सोपी व सुटसुटीत कर प्रणाली | एक देश एक कर |
| करावर कर लागण्यापासून मुक्तता | वस्तु व सेवा स्वस्त होण्यामुळे ग्राहकांचा दीर्घकालीन फायदा | महसुलात वाढ |
| निर्यात सुधारणा | देशभर समान कर प्रणाली | रोजगार वृध्दी |
| राष्ट्रीय पातळीवर एका सामाईक बाजार पेठेची निर्मिती | पारदर्शक कर प्रणाली | जीडीपी मध्ये वाढ |
| सोपी व सुटसुटीत कर प्रणाली | | |
| पारदर्शक कर प्रणाली | | |

जाते. GST लागू झाल्यानंतर राज्याच्या अर्थव्यवस्थेला फायदा होणार आहे. नेमके कोणते फायदे कसे आणि किती होतील हे एवढया लवकर सांगणे खुपच कठीण आहे. याठिकाणी एवढे नमूद करावेसे वाटते कि, GST मुळे अर्थव्यवस्थेची भरभराट सुरु झाली आणि सरकारला मिळणाऱ्या महसुलामध्ये वाढ झाली कि तो महसूल राज्याच्या अर्थव्यवस्थेच्या महत्वाचा भागाकडे वळविणे गरजेचे आहे. राज्यातील शेती व शेतकऱ्यांकडे तातडीने लक्ष्य पुरविणे गरजेचे आहे. जर GST मुळे सरकारचा महसूल वाढणार आहे तर तो महसूल भ्रष्टाचार यामुळे काही लोकांच्या हाती न जाता त्याचा उपयोग शेतीसाठी मूलभूत सोई-सुविधा निर्माण करण्यासाठी वापरण्यात यावा जेणेकरून शेती




क्षेत्राचा प्रश्न कायमचा सोडवण्यास मदत होईल.

आज जगात बऱ्याच गोष्टीचे प्रमाणीकरण होत आहे. त्या प्रमाणीकरणाचा एक भाग GST म्हणून याकडे पहिले जाते. 'एक देश, एक कर, एक बाजारपेठ' या उद्गाराने गौरवलेली GST ही कर प्रणाली खरोखरच एक खूप मोठी कर सुधारणा आहे. यामुळे राज्याच्या अर्थव्यवस्येच्या विकास व वृद्धीला चालना नक्कीच प्राप्त होईल. आजपर्यंत जगात अनेक देशात GST कर प्रणाली लागू केलेली आहे व त्याचे फायदे सुद्धा ते देश अनुभवत आहेत. त्यामुळं GST कर प्रणालीमुळे आपल्या देशाच्या व राज्याच्या अर्थव्यवस्थ्ये बद्दलचे जागतिक स्तरावरील मत निश्चितच सकारात्मक स्वरूपाचे होईल. राज्याच्या महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेतील मोठ्या प्रमाणात असलेल्या असंघटित क्षेत्रातील व्यापार व कार्यभार संघटित क्षेत्रामध्ये या कर प्रणालीमुळे बदलण्यास सुरुवात होऊन सरकारच्या महसुलात वाढ होण्यास सुरुवात होईल. अशा प्रकारे बऱ्याच कालावधीनंतर केंद्रातील सरकारकडून चांगल्या सुधारणा होत असल्याचे दिसून येते आहे जे कि राज्यासाठी सुद्धा चांगलेच आहे. GST चे चांगले -वाईट परिणाम मिळून ही कर प्रणाली आपल्या अर्थव्यवस्थ्येला योग्य व सकारात्मक दिशेने घेऊन जाण्यास मदत करेल या बद्दल काही शंका नाही !

**आज जगात बऱ्याच गोष्टीचे प्रमाणीकरण होत आहे. त्या प्रमाणीकरणाचा एक भाग GST म्हणून याकडे पहिले जाते. 'एक देश, एक कर, एक बाजारपेठ' या उद्गाराने गौरवलेली GST ही कर प्रणाली खरोखरच एक खूप मोठी कर सुधारणा आहे. यामुळे राज्याच्या अर्थव्यवस्येच्या विकास व वृद्धीला चालना नक्कीच प्राप्त होईल. आजपर्यंत जगात अनेक देशात GST कर प्रणाली लागू केलेली आहे व त्याचे फायदे सुद्धा ते देश अनुभवत आहेत.**

■ ■ ■

*लेखक एम.आय.टी. वर्ल्ड पीस यूनिवर्सिटी, कोथरूड, पुणे येथे सहाय्यक प्राध्यापक (अर्थशास्त्र) आहेत.*

*Email : jivan.biradar@gmail.com*

# UPSC Foundation Batch 2017



# MPSC Foundation Batch 2017



**Bhagirath IAS Academy**

UPSC • MPSC

ऑफीस १ : मंत्री हाईटस्, २ रा. मजला, शनिवार पेठ, पुणे-३०

ऑफीस २ : २ रा मजला केसरीवाडा, नारायणपेठ, पुणे -३०

**Ph.: 020-64013450 | 9970298197 | 7378406920**

***Web :*** www.bhagirathacademy.com

***E-mail :*** bhagirathacademypune@gmail.com

***Facebook :*** Bhagirath IAS Academy

**RNI No. MAHMAR/2009/32156**
Reg No. NMB/137/2016-18

Published Date: 12th **August,** 2017
Date of Posting : 16th **Augsut,** 2017




Editor - **Umesh Ujgare**
Printed and Published by **Dr. (Ms) Sadhana Rout,** Director General, on behalf of Publication Division
and Printed at **Onlooker Press**, 16, Sassoon Dock, Mumbai - 400 005. Phone : 22183544/2939
Published at - B-701, Kendriya Sadan, C.B.D. Belapur, Navi Mumbai - 400 614.
Posted at - Mumbai - Patrika Channel Sorting Office,GPO, Mumbai - 400 001.